छं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा क्र. २९६४४

# महंत

वि. वा. शिरवाडकर



IRBK-0121644

# महंत

## वि. वा. शिरवाडकर यांची इतर प्रकाशित नाटके

आनंद
ऑथेल्लो
आमचं नाव बाबुराव
एक होती वाघीण
कौंतेय
चंद्र जिथे उगवत नाही
दुसरा पेशवा
दूरचे दिवे
नटसम्राट
बेकेट
मुख्यमंत्री
ययाति आणि देवयानी
राजमुकुट
विदूषक
वीज म्हणाली धरतीला
वैजयती

# महंत

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय विभाग.
वा. क्र. २१६५४ नों. दि. १५.१०.८६
वि. नाटक ...... क्र. ..................

वि. वा. शिरवाडकर

IRBK-0121644
IRBK-0121644

पॉप्युलर प्रकाशन
मुंबई

महंत
पॉप्युलर प्रकाशन
( म–५३२ )

Mahant
( Marathi Play )
V. V. Shirwadkar

© पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.

पहिली आवृत्ती : १९८६/१९०८

आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगी आणि परवानगी-मूल्य या संबंधात पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. ३५ सी, पंडित मदनमोहन मालवीय मार्ग, ताडदेव, मुंबई ४०० ०३४ या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव,
मुंबई ४०००३४

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती
टिळक रोड
पुणे ४११०३०

लेखनाच्या प्रारंभावस्थेत मला
निरपेक्ष आणि प्रेमळ प्रोत्साहन देणारे
**देवदत्त नारायण टिळक**
यांच्या स्मृतीस—

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ....
वा. क्र. २९६८८ नों. दि. १५/१०/८६
वि. नाटक ...... क्र. ..................

# प्रास्ताविक

ज्यॉं अनुईचे बेकेट हे नाटक, माणसातील प्रभुत्व आणि माणसातील साधुत्व यांच्यातील चिरंतन संघर्षाच्या सूत्रावर आधारलेले आहे. या नाटकाचे सरळ भाषांतर मी काही वर्षांपूर्वी केले होते. सतीश दुभाषी यांनी ते उत्तम प्रकारे प्रयोगितही केले होते. परंतु धर्मकल्पनेचा पार्श्वपट कायम ठेवून, प्राचीन भारतीय वातावरणात हे सूत्र नाट्यरूपाने उभे करावे, अशी इच्छा अनेक वर्षं माझ्या मनात होती. तिच्यातून ' महंत 'चा जन्म. हे नाटक म्हणजे बेकेटचे रूपांतर नव्हे, अनुवादही नव्हे. मूळ सूत्राचा आधार घेऊन आणि जरूर तेथे मुळातील घटना प्रसंगांचा अंतर्भाव करून हे वेगळे नाटक लिहिले आहे.

नाटकाचा प्रयोग सादर केल्याबद्दल श्री. मोहन वाघ, श्री. अरविंद देशपांडे, सर्व कलावंत, संगीतकार, प्रकाशकार, आणि इतर सर्व संबंधित यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

वि. वा. शिरवाडकर

या नाटकाचा पहिला प्रयोग 'चंद्रलेखा' व 'संतोषी थिएटर्स'
यांच्या सहयोगाने १६ ऑक्टोबर १९८५ रोजी दुपारी ४ वाजता
दीनानाथ नाट्यगृह, मुंबई येथे झाला.

दिग्दर्शक : अरविंद देशपांडे
नेपथ्य / प्रकाश : मोहन वाघ
पार्श्वसंगीत : अनंत अमेंबल
रंगभूषा : कृष्णा बोरकर, दिलीप कुडतरकर

## पात्र - परिचय

शिवानंद : बाळ धुरी
धर्माध्यक्ष : जनार्दन सोहनी
मानकरी : सिताराम खैरे, चंद्रमोहन आगरकर
सुरेश ताम्हाणे
रंधवा : सुनील जोशी
भिल्ल : ताराचंद जाधव
संन्यासी : गणपत परब, ताता नाईक
महाराणी : स्मिता तळवलकर
दासी . स्मिता बने
लीलावती : अश्विनी भावे
राजा : रवींद्र मंकणी

क्र. २१६४४ १५.१०.९९
वि. नाटक

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

घंटांच्या आवाजात धर्माध्यक्षांचा मठ दृश्य होतो.
आतील दालन.
समोर एक उंच आसन. त्यावर मठाधीश मृगाजिनावर बसलेले आहेत.
समोर चार-पाच शिष्य संन्यासी प्रार्थनेच्या पवित्र्यात हात जोडून उभे आहेत.
वेळ दुपारची.
मठाधीश वयोवृद्ध पण तेजस्वी. ते प्रार्थना मंत्र सांगत आहेत.
आणि संन्यासी तिचा पुनरुच्चार करीत आहेत.
घंटांचे आवाज थांबतात.
प्रार्थना चालू असता एक संन्यासी—द्वाररक्षक—प्रवेश करतो.

**संन्यासी** : आचार्य, क्षमा करा. संथा चालू असताना कोणी आत यायचं नाही वा कोणालाही आत सोडायचं नाही हे मी जाणतो.
**आचार्य** : मग का आलास आत?
**संन्यासी** : एरव्ही आलो नसतो आचार्य. पण स्वतः राजाधिराज—
**आचार्य** : विशालदेव?
**संन्यासी** : होय, आचार्य. स्वतः राजाधिराज आपल्या भेटीला आले आहेत. विनाविलंब भेट हवी आहे त्यांना.
**आचार्य** : राजा असो वा रंक असो, आमच्या कालबद्ध कार्यक्रमात कोणीही व्यत्यय आणू शकत नाही.
**संन्यासी** : आचार्य, मी परोपरीनं सांगितलं... विनवणी केली... पण...
**आचार्य** : राजा एकटाच आहे?
**संन्यासी** : नाही. त्यांच्याबरोबर त्यांचे ते...
**आचार्य** : त्यांच्या पादत्राणासारखा त्यांच्याबरोबर वावरणारा तो शिवानंदही असेल.
**संन्यासी** : होय आचार्य.
**आचार्य** : म्हणूनच धीर झाला राजाला. मद्याच्या नशेसारखी दुर्जनांची संगतही माणसाला सभ्याचार सोडायला धैर्य देते. जा, सांग त्यांना, तुम्हाला संथा संपेपर्यंत, अर्धा घटका बाहेर प्रतीक्षालयात थांबावं लागेल... हं... [शिष्यांना] प्रार्थना चालू

करा पुढे... ( मंत्रोच्चार ) तुला जा म्हणून सांगितलं ना ?

**संन्यासी :** आचार्य, मी हे सर्व त्यांना सांगितलं. पण ते ऐकायला तयार नाहीत.

**आचार्य :** ( संतापाने ) ऐकायला तयार नाहीत ? त्यांना सांग... या आश्रमात अंतिम अधिकार माझा आहे. राजाचा नाही किंवा त्याची पायपूजा करीत फिरणाऱ्या त्याच्या मानकऱ्यांचाही नाही.

[ राजा आणि शिवानंद येतात ]

**राजा :** प्रणाम असो, आचार्य.

**शिवानंद :** अभिवादन आचार्य.

**आचार्य :** ( जरबेनं ) द्वारपालानं तुम्हाला सांगितलं होतं...

**राजा :** होय, सांगितलं होतं, आचार्य. पण द्वारपालाचे आदेश राजा मानायला लागला तर.... हे होईल... काय रे ते शिवा ?

**शिवानंद :** अराजक.

**राजा :** बरोबर, अराजक होईल.

**आचार्य :** आदेश द्वारपालाचा नव्हता. माझा होता... मठाधीशाचा.

**शिवानंद :** राजाला त्याच्या राज्यामध्ये कोणीही आदेश देऊ शकत नाही, आचार्य.

**आचार्य :** हे तू बोलतो आहेस, शिवानंद ? एका काळी याच आश्रमात दीक्षार्थी म्हणून राहत होतास तू.

**शिवानंद :** होय, आचार्य, पण मी आता राजाचा सेवक आहे.

**आचार्य :** सेवक नाही, उद्या राजाचा महामंत्री झालास तरी तुला विसरता येणार नाही की, या आश्रमात सहा वर्षे तू दीक्षार्थी म्हणून काढली आहेस. या राजधानीच्या रस्त्यावरून तू बेघर होऊन भटकत होतास, अन्नाविना आणि ज्ञानाविना. त्या चिखलातून आम्ही, या आश्रमानं तुला बाहेर काढलं आहे.

**राजा :** मग त्यात कौतुक करण्यासारखं काय आहे ? भुकेल्यांना अन्न देणं आणि अडाण्यांना ज्ञान देणं हे धर्माचं आणि धर्माधिकाऱ्यांचं काम आहे. पण मूलभूत प्रश्न असा आहे... [ शिवानंदाला ] मूलभूत बरोबर आहे ना ? का भूतमूल ?

**शिवानंद :** बरोबर आहे, महाराज.

**राजा :** तर मूलभूत प्रश्न हा आहे... आम्हाला पाहिल्याबरोबर तुमचं पित्त इतकं खवळलं का ? तुम्ही इतके भडकलात का ?

**आचार्य :** तुम्ही दांडगाईनं असे इथे आत घुसलात म्हणून. हे माझ्या आश्रमातलं दीक्षालय आहे. इथे कोणालाही येता येत नाही.

**राजा :** परमेश्वरालादेखील ?

**आचार्य :** त्याचीच प्रार्थना आम्ही करीत आहोत.

**राजा ;** मग राजा हा परमेश्वरच असतो. म्हणजे मी म्हणत नाही. पूर्वीच्या ऋषिमुनीं-

नीच सांगितलं आहे... शिवा, काय रे ते वाक्य ?

**शिवानंद :** ना विष्णुः पृथिवीपतिः

**राजा :** ऐका, संस्कृत आहे, म्हणजे ते खरं असलं पाहिजे. तुमच्या प्रार्थना ऐकून परमेश्वर प्रसन्न झाला आहे आणि तुम्हाला भेटायला आला आहे असं समजा. परमेश्वर समोर उभा राहिल्यावर प्रार्थनेची गरजच नाही...( बाजूला उभ्या असलेल्या दीक्षार्थींना ) बालकांनो, तुम्ही जाऊ शकता, तुम्हाला मी सुटी दिली आहे...

**आचार्य :** ते बालक नाहीत आणि त्यांना आज्ञा फक्त मी देऊ शकतो.

**राजा :** राजा दीक्षार्थींनाच नव्हे तर तुम्हालाही आज्ञा देऊ शकतो. कारण आता यानं सांगितल्याप्रमाणे...ना विष्णुः...काय रे पुढे ?

**शिवानंद :** पृथिवीपति :

**राजा :** पृथिवीपतिः...

**शिवानंद :** महाराज, प्रार्थना अर्धवट राहू नये. ती पुरी होऊ द्या. मठाचे संकेत आपण पाळायला हवेत.

**राजा :** ठीक आहे...चालू द्या.

**आचार्य :** महाराज, आपण असे इकडे तिकडे फिरू शकत नाही...इथे थांबणार असाल तर हात जोडून उभे राहा...दोघेही.

**राजा :** अवश्य.

**आचार्य :** हं...दीक्षार्थींनो...म्हणा...

[ दीक्षार्थी पुढे येऊन उभे राहतात. आचार्य प्रार्थना सांगतात. दीक्षार्थी त्याप्रमाणे म्हणतात ]

**आचार्य :** आता निःशब्द स्तवन. सर्व प्राणशक्ती हृदयात केंद्रित करून प्रारंभ.

[ सर्व स्तब्ध. डोळे मिटून मनातल्या मनात प्रार्थना करतात ]

**राजा :** ( शिवानंदाला हलक्या स्वरात ) शिवा, माझी प्राणशक्ती भलतीकडेच केंद्रित व्हायला लागली आहे.

**शिवानंद :** म्हणजे ?

**राजा :** म्हणजे गाढवा, मला बाहेर जायचं आहे. काल रात्री आपण जरा जास्तीच प्यायलो.

**शिवानंद :** आपण नव्हे...तुम्ही.

**राजा :** बरं बरं. मी ! मला माहीत आहे, तू म्हणजे संयमाचा सुळका आहेस... बर्फानं झाकलेला. पण कुठे जाऊ ? हे सगळे गुरुमहाराज कुठे झाडाखाली बसतात का ?

**शिवानंद :** नाही...प्रतीक्षालयाजवळच सर्व सोय आहे. आपण बाहेर जा आणि द्वार-पालाला विचारा...का मी येऊ ?

**राजा :** नको...सगळ्यांचे डोळे मिटलेले आहेत तोपर्यंत मी जाऊन येतो. तू थांब इथे...

[ बाहेर जातो. ]

**आचार्य :** ( क्षणभराने ) इत्यलम्! जा तुम्ही... ( संन्यासी जातात ) महाराज बाहेर गेले आहेत. प्रार्थना पुरी होईपर्यंत ते थांबू शकणार नाहीत, हे जाणून होतो मी.

**शिवानंद :** नाही, आचार्य, प्रार्थनेचा अधिक्षेप करावा अशी त्यांची इच्छा नव्हती. पण निसर्गानं अशा काही गोष्टी निर्माण केल्या आहेत की ज्यांची निकड प्रार्थनेपेक्षाही जास्त असते.

**आचार्य :** शिवानंद, मी मघाशी रागाच्या भरात वेडंवाकडं बोललो ते तू विसरून जावंस अशी माझी इच्छा आहे.

**शिवानंद :** मी विसरलो आहे. पण आपण खरंच बोललात, आचार्य. आपल्याला खेद वाटायचं काहीच कारण नाही. खरोखर, मी कोण होतो? ना जातीचा ठावठिकाणा, ना आईबापांचा. मूल नको असलेल्या स्त्री पुरुषांचा एक पोरका मुलगा. या आश्रमानंच मला उकिरड्यातून उचललं आणि पंथाची दीक्षा देऊन जीवनातील प्रकाश दाखवला.

**आचार्य :** आणि आता आपण पुन्हा काळोखाकडे जात नाही असा विश्वास आहे तुला?

**शिवानंद :** होय आचार्य, मला विश्वास आहे. मी आता राजाच्या सेवेत आहे आणि जे काम स्वीकारायच्या पात्रतेचं असतं, ते उत्तम रीतीनं करायच्याही पात्रतेचं असतं, एवढंच मी जाणतो.

[ राजा हे ऐकत आत येतो ]

**राजा :** वा! वा! काय सुंदर वाक्य आहे! मला पाठ करून ठेवलं पाहिजे. जे काम स्वीकारायच्या पात्रतेचं असतं..ते....पुढे काय?

**शिवानंद :** ( स्मित करीत ) उत्तम रीतीनं करायच्याही पात्रतेचं असतं.

**राजा :** फारच छान! मीसुद्धा असंच करीत असतो. म्हणजे मद्याचा पेला हातात घ्यायच्या पात्रतेचा असला तर तो रिकामाही करायच्या पात्रतेचा असतो....एक आपलं उदाहरण .. असंच ना?

**शिवानंद :** होय, राजन्.

**राजा :** ठीक आहे...आचार्य...ज्या कामासाठी मी इथे आलो आहे ते स्वीकारायच्या पात्रतेचं आहे...आणि म्हणून ते उत्तम रीतीनं मला पूर्ण केलं पाहिजे.

**आचार्य :** होय, महाराज. आपण म्हणता ते काम खरोखरीच स्वीकारायच्या पात्रतेचं असेल तर! ते कोणी ठरवायचं?

**राजा :** सध्या तरी ते मीच ठरविणार आहे.

[ संन्यासी एक आसन आणतो. त्यावर बसत ]

धन्यवाद. तर आचार्य, मी या देशाचा राजा आहे....मान्य आहे?

**आचार्य :** अर्थात्.

**राजा :** राजा हा देशाचा अखेरचा अधिकारी असतो. मान्य ?

**आचार्य :** होय, मान्य. पण परमेश्वराच्या नंतर. तो या देशाचाच नव्हे तर ( आवाज चढवून ) सर्व विश्वाचा अंतिम अधिकारी आहे.

**राजा :** ठीक ठीक ! त्याला माझे सहस्र नमस्कार आहेत. पण साऱ्या विश्वाचा कारभार करणारा तो...तो आपल्या बैठकीला उपस्थित आहे असं समजणं म्हणजे त्याचा अपमान करण्यासारखं आहे.

**आचार्य :** आपल्याला काय म्हणायचं आहे ?

**राजा :** ते तुम्हाला माहीत आहे. आचार्य, उगाच वेड घेऊन पेडगावला जाऊ नका. मला पैसा हवा आहे. राजांचे किंवा कुबेरांचेही खजिने संपतात, पण आपल्या समाजात संन्याशांचे खजिने कधी संपत नाहीत. आचार्य मला द्रव्य हवं आहे. अनेकदा मंत्र्यांना पाठवलं पण तुम्ही दाद दिली नाही. म्हणून मी शिवाला म्हटलं...अरे पण माझा हा मित्र मघापासून सुरूच्या झाडासारखा उभा आहे. आचार्य, त्याच्यासाठी आसन आणायला सांगा.

**आचार्य :** मठाचा प्रघात असा आहे की या मंदिरभागात फक्त राजाला आणि त्याच्या महामंत्र्यालाच आसन दिलं जातं.

**राजा :** महामंत्र्यांना ? पण तुम्हाला माहीत आहे की आमचे महामंत्री पंधरा दिवसांपूर्वी परलोकवासी झाले. घशात माशाचा काटा अडकल्यामुळे. माशांनी इतकं थोर सत्कार्य कधी केलं नसेल. पण माशावरून आठवलं...शिवा, मला भूक लागली आहे. अचानक पोटामध्ये एक भलामोठा खळगा पडल्यासारखं वाटतंय. आचार्य, आपल्याकडे खायला काय आहे ?

**आचार्य :** ( गोंधळून ) खायला ? आश्रमात सूर्यास्त झाल्याशिवाय...

**राजा :** ठीक ठीक ! सूर्यास्त झाल्यावरही तुम्ही मंडळी पालापाचोळा किंवा कंदमुळं खात असाल.

**शिवानंद :** राजन्, बाहेरच्या अतिथीगृहात आपल्या उपाहाराची व्यवस्था मी केली आहे.

**राजा :** तुला काय ठाऊक ?

**शिवानंद :** ( स्मित ) आपण सकाळची न्याहारी घेतली नाही, समोरचं ताट बाजूला सारलंत, हे मला कळलं होतं.

**राजा :** सारणारच ! मद्य शरीरात शिरलं की डोक्याबरोबर पोटाचाही निकाल लावतं ते—

**शिवानंद :** हे लक्षात आलं माझ्या. म्हणूनच मी सेवकांना आदेश दिला की महाराजांचा आहार घेऊन तुम्ही आमच्या मागोमाग या...

**राजा :** ( सहर्ष ) आणि ते आले आहेत ?

**शिवानंद :** होय. राजन्, ते अतिथीगृहात आपली वाट पाहात असतील.

**राजा :** शाबास शिवा ! राजाच्या राज्याचीच नव्हे तर त्याच्या देहाचीही काळजी घ्यायला हवी हे तूच जाणतोस. फक्त तू. तो आमचा दिवंगत महामंत्री... नेहमी आत्म्याच्या गोष्टी बोलायचा. आता माशाचा काटा त्याच्या घशात अडकला की आत्म्यात अडकला देव जाणे. असो. पण आचार्य, आमचा मित्र अजून उभाच आहे ताडासारखा.

**आचार्य :** आपल्याला मी सांगितलं महाराज, की इथे आसन फक्त राजाला आणि महामंत्र्यालाच मिळू शकतं.

**राजा :** ( हर्षाने ) वाहवा ! आचार्य, मी तुमचा फार ऋणी आहे.

**आचार्य :** कशाबद्दल ?

**राजा :** फार चांगली कल्पना तुम्ही मला दिलीत. तुमच्या शिष्यांना आसन आणायला सांगा... या क्षणापासून हा शिवानंद... माझा जिवलग मित्र... माझ्या या पालव देशाचा महामंत्री झाला आहे असं समजा !

**आचार्य**<br>**शिवानंद** } : महाराज !

**राजा :** ( बेफाम हसतो ) शिवा, घाबरलास ना ? वा वा ! तुझं टाळकं म्हणजे हिमालयाचं एक शिखर... थंडगार ! ( हसतो ) पण तुला चकित केलं मी...घाबरवलं... मात केली तुझ्यावर ! ( हसतो )

**शिवानंद :** ( हसायचा यत्न करीत ) महाराज, ही थट्टा आता पुरे झाली. आचार्यांना खरं वाटायचं !

**आचार्य :** मी इतका मतिमंद नाही, महाराज. मला कळतंय, आपण गंमत करताहात...

**राजा :** ( उठून त्वेषाने ओरडतो ) गंमत नाही आणि थट्टा नाही ! या क्षणापासून शिवानंद माझा महामंत्री झाला आहे. [ आतील दिशेकडे ] संन्यासी ! [संन्यासी येतो ]

**राजा :** आणखी एक आसन घेऊन या ! [ संन्यासी आचार्यांकडे पाहतो. ]

**आचार्य :** घेऊन ये.

**राजा :** मी पंधरा दिवस महामंत्र्याच्या शोधात होतो आणि शेजारी असूनही मला तो दिसत नव्हता. असा महामूर्ख मी. [ संन्यासी आसन आणून ठेवतो व जातो. ]

**राजा :** बैस या आसनावर ! महामंत्र्यांचं आसन आहे हे. उद्या राजसभेत प्रधानपदाची मुद्रा तुला समारंभानं देण्यात येईल. पण आज इथे... धर्माध्यक्षांच्या आश्रमात... त्यांच्या साक्षीनं मी तुला महामंत्री केलं आहे.

**शिवानंद :** राजन्, मला हे अद्याप खरं वाटत नाही, आणि बरंही वाटत नाही.

**राजा :** बरं वाटत नाही ? का ?

**शिवानंद :** असा निर्णय घेण्यापूर्वी आपण शंभरदा विचार करायला हवा, राजन्.

**राजा :** विचार करायचा म्हणजे काय करायचं ? बावळट चेहरा करून आभाळाकडे

टक लावायची, का घंगाळातल्या पाण्यात रेघा काढीत बसायचं ? की एखाद्या महालात या भिंतीपासून त्या भिंतीपर्यंत पाय पांगळे होईपर्यंत फेऱ्या मारायच्या ? नाही. शिवा, असलं विचार करणं आमच्या तीर्थरूपांनाही जमलं नाही, आणि त्यांच्याही तीर्थरूपांना जमलं नसावं... (एकदम) त्या गाढवांनी खायला काय आणलंय ?

**शिवानंद :** आपल्याला विशेष आवडणारे पदार्थ आणायला सांगितलंय.

**राजा :** तळलेले सारंगे ?

**शिवानंद :** आहेत.

**राजा :** हरणाच्या काळजाचे काप. . मधात शिजवलेले ?

**शिवानंद :** आहेत.

**राजा :** निखाऱ्यावर भाजलेले होलगे...दह्यात भिजवलेले ?

**शिवानंद :** तेही आहेत.

**राजा :** तेही आहेत ! आणि तरीसुद्धा मी तुला महामंत्री करायचं नाही ?

**आचार्य :** क्षमा करा, महाराज, पण याच पात्रतेचा विचार आपण करीत असाल, तर शिवानंदाला आपल्या स्वयपाकघराचा मुख्याधिकारी करणं अधिक श्रेयस्कर होईल.

**राजा :** [ आता बसलेला ] म्हणजे आचार्य, (हसतो) तुम्हाला तुमच्या या पूर्व शिष्याविषयी काहीच माहिती नाही. आचार्य, तो जितका खाण्यापिण्यात, बाईबाजीत आणि युद्धकलेत पारंगत आहे, तितकाच राजकारणातही आहे. खरं सांगायचं, तर आजही सगळं राजकारण तोच करीत असतो. आणि शेवटी राजकारण म्हणजे तरी काय ? समोरच्यांना योग्यवेळी टांग मारणं आणि शेजारच्यांना सतत थापा मारणं. या विद्येत त्याच्या इतका जाणकार माणूस या राज्यात दुसरा नाही. म्हणून आता ठरलं.... दगडावरची रेघ.... हाच माझा महामंत्री !

**शिवानंद :** राजन, मी तुमचा मित्र असलो तरी राजसभेत माझं स्थान नगण्य आहे. वयानं, ज्ञानानं, अनुभवानं, माझ्यापेक्षा अनेक पटींनी श्रेष्ठ असलेले कितीतरी मानकरी आपल्या राजसभेत आहेत.

**राजा :** असतील. ते सगळे महामूर्ख आहेत. वयं वाढली, लौकर मेले नाहीत, एवढीच त्यांची लायकी. पण वयाबरोबर अक्कल वाढते असं नाही. बहुधा गोठायलाच लागते ती. म्हाताऱ्यांच्या पायांवर डोकं ठेवावं...अवश्य...काळाचा सन्मान असतो तो. पण त्यांची डोकी मात्र दोन हात दूर ठेवावीत. कारण त्या डोक्यात फक्त भूतकाळाची कोळिष्टकं भरलेली असतात. त्यांना वर्तमानकाळ पेलवत नाही आणि भविष्यकाळ कळत नाही. हे सगळं तूच केव्हातरी मला सांगितलं आहेस. पण ही चर्चा आता संपली. शिवा, तुला माझी, तुझ्या मित्राची विनंती आहे, आणि या देशाच्या राजाची आज्ञा आहे... आचार्यांना नमस्कार कर आणि या आसनावर बैस.

**शिवानंद :** आपली आज्ञा प्रमाण आहे, महाराज. [ आचार्यांना नमस्कार करतो ]

आचार्य, मला आशीर्वाद द्या.

**आचार्य :** माझे आशीर्वाद आहेत तुला, पुत्रा. महाराज, मला फार आनंद वाटतो की आमचा एक दीक्षार्थी आज देशाचा महामंत्री होत आहे. शिवानंद महामंत्री झाला याचा अर्थ हाच आहे की राजसत्ता ही बलवान असली तरी तिला धर्मसत्तेचं अधिष्ठान असतं. अखेरतः धर्मसत्तेचा उगम हा परमेश्वराच्या पायाशी झालेला असतो. आणि राजसत्तेचा उगम...

**राजा :** [ मोठी जांभई देतो ] इत्यादी इत्यादी. आचार्य, हे डोक्याजवळ आणि पायाजवळ– सर्व ऐकायला छान आहे. पण निखालस खोटं. माझ्यापुरतं सांगायचं तर माझ्या राजसत्तेचा उगम धर्मसत्तेत नाही, की परमेश्वराच्या पायाशीही झालेला नाही. खरी गोष्ट एवढीच की आमच्या परमपूज्य मातोश्रींबरोबर पिताजींनी जे कामकर्म केल त्यातूनच आमचा आणि आमच्या राजसत्तेचा उगम झालेला आहे. आणि तुमची धर्मसत्ता तर आमच्या पितामहांनीच निर्माण केली आहे असो. तुम्ही शिवाची स्तुती केलीत म्हणून तो तुमचा पक्ष घेईल असं समजू नका. तुमचा शिष्य मेला. जो जिवंत आहे तो माझा महामंत्री तेव्हा आता कामाला प्रारंभ करू.

**आचार्य :** अवश्य, महाराज.

**राजा :** शिवा, आपण शिकारस्वारी पुढं पाठवली आहे ?

**शिवानंद :** होय, राजन. ते जंगलात पोचलेही असतील. दुपार कलायच्या आत आपण जंगलात पोचायला हवं.

**राजा :** म्हणजे वेळ थोडा आहे. आचार्य, मी शब्दांची आरास मांडीत नाही. मला तुमच्याकडून पैसा हवा आहे. द्रव्य !

**आचार्य :** आश्रमाकडून द्रव्य ?

**राजा :** का नाही ? आश्रमाभोवतालच्या दोनशे गावांचा किसानकर, व्यापारकर आपल्याकडे जमा होत असतो. तुम्ही द्रव्य घेता आणि सारी देखभाल मात्र आम्ही करायची. म्हणजे बाई तुम्ही ठेवायची आणि पोरांचं पालनपोषण मात्र आम्ही करायचं.

**आचार्य :** महाराज, हा आश्रम संन्याशांचा आणि तपस्व्यांचा आहे. असले दृष्टांत-देखील येथे वर्ज्य आहेत

**राजा :** ठीक आहे. दृष्टांत मी मागे घेतो. पण पैसे द्या. मला लढाईसाठी द्रव्य हवं आहे. तुमचं भांडार द्रव्यानं खचून भरलेलं आहे.

**आचार्य :** असेल. पण तो पैसा, लोकांसाठी, लोककल्याणासाठी आहे.

**राजा :** मग लढाया कशासाठी असतात ? आम्हाला काय मरायची हौस आहे ? तुम्ही लोक उदबत्त्या लावून प्रवचनं झोडता, आम्ही तलवारी घेऊन लढायला जातो. प्राण पणाला लावतो. आमचे पूर्वापार वैरी, शेजारचे शिलाहार आमच्यावर स्वारी करण्याच्या तयारीत आहेत. कोणत्या क्षणी लढाईला सुरुवात होईल, याचा नेम नाही. आणि

लढाईसाठी द्रव्य लागतं.

**आचार्य :** देवाधर्मासाठी युद्ध असेल तर त्याला आम्ही अवश्य साहाय्य करू.

**राजा :** आचार्य, प्रत्येक युद्ध देवाधर्मासाठीच असतं. युद्ध करणाऱ्या प्रत्येक पक्षाला देव आपल्या बाजूला आहे असा ठाम विश्वास असतो. देव दोन्ही पक्षात असतो, पण जे दुबळे असतात त्यांना तो मारतो आणि प्रबळ असतात त्यांना तारतो. तात्पर्य द्रव्य द्या...

**आचार्य :** मी द्रव्याचं बोललो नाही. आम्ही आपल्या विजयासाठी प्रार्थना करू.

**राजा :** अवश्य करा. पण प्रार्थना पगार म्हणून सैनिकांना वाटता येत नाहीत. म्हणून द्रव्य.

**आचार्य :** ठीक आहे, महाराज. पाच सहस्र मोहरा उद्या आपल्याकडे रवाना होतील.

**राजा :** पाच ? गेल्या तीन वर्षात आपल्या भांडारात जमा झालेल्या करद्रव्याचा अर्धा हिस्सा मला हवा आहे... शिवा, तू डिंक खाल्ल्यासारखा गप्प का ? तू सांग आचार्यांना. मी जातो... अतिथीगृहात. भूक आता असह्य झाली आहे... तळलेले सारंगे आणले आहेत म्हणतोस !

**शिवानंद :** होय, महाराज.

**राजा :** मग जायलाच हवं. तू बोल आचार्यांशी. किमान एक लक्ष मोहरा मला हव्या आहेत. एक तांब्याचं नाणंही कमी नाही... आणि लौकर ये... शिकार चुकता कामा नये... नमस्ते आचार्य... तळलेले सरंगे .. निखाऱ्यांवर भाजलेले होलगे

[ बाहेर जातो. शिवानंद उभा राहतो. ]

**शिवानंद :** आचार्य, महाराजानी सांगितलेली रक्कम देणं आश्रमाला कठीण नाही हे मला माहीत आहे. आपण तेवढं द्रव्य उद्या सकाळी राजाच्या भांडाराकडे पाठवावे अशी विनंती आहे.

**आचार्य :** आणि नाही पाठवलं तर ?

**शिवानंद :** राजांचा स्वभाव आपल्याला माहीत आहे.

**आचार्य :** राजांचा स्वभाव मला कळला आहे. पण त्यांच्या नव्या महामंत्र्यांचा अजून कळला नाही. ते अनेक वर्षे माझ्याजवळ राहिलेले असूनसुद्धा.

**शिवानंद :** ( स्मित ) माझा स्वभाव तर आचार्य, मलाही अजून कळलेला नाही. मी स्वतःलाच खूप परका आहे.

**आचार्य :** सध्याच्या जीवनात तू सुखी आहेस ?

**शिवानंद :** [ क्षणभर खाली पाहून ] तेही मला सांगता येणार नाही, आचार्य. माणसाच्या आयुष्यातला सर्वात अवघड प्रश्न आहे हा.

**आचार्य :** माझा प्रश्न तात्त्विक नाही. तुझ्या आजकालच्या वर्तनाबद्दलचा आहे.

**शिवानंद :** त्यासंबंधी एकच सांगतो. मी माझ्या विवेकाशी प्रतारणा कधी केलेली नाही.

आचार्य, मला आशीर्वाद द्या.

**आचार्य :** माझे आशीर्वाद आहेत तुला, पुत्रा. महाराज, मला फार आनंद वाटतो की आमचा एक दीक्षार्थी आज देशाचा महामंत्री होत आहे. शिवानंद महामंत्री झाला याचा अर्थ हाच आहे की राजसत्ता ही बलवान असली तरी तिला धर्मसत्तेचं अधिष्ठान असतं. अखेरतः धर्मसत्तेचा उगम हा परमेश्वराच्या पायाशी झालेला असतो. आणि राजसत्तेचा उगम...

**राजा :** [ मोठी जांभई देतो ] इत्यादी इत्यादी. आचार्य, हे डोक्याजवळ आणि पायाजवळ– सर्व ऐकायला छान आहे. पण निखालस खोटं. माझ्यापुरतं सांगायचं तर माझ्या राजसत्तेचा उगम धर्मसत्तेत नाही, की परमेश्वराच्या पायाशीही झालेला नाही. खरी गोष्ट एवढीच की आमच्या परमपूज्य मातोश्रींबरोबर पिताजींनी जे कामकर्म केल त्यातूनच आमचा आणि आमच्या राजसत्तेचा उगम झालेला आहे. आणि तुमची धर्मसत्ता तर आमच्या पितामहांनीच निर्माण केली आहे असो. तुम्ही शिवाची स्तुती केलीत म्हणून तो तुमचा पक्ष घेईल असं समजू नका. तुमचा शिष्य मेला. जो जिवंत आहे तो माझा महामंत्री तेव्हा आता कामाला प्रारंभ करू.

**आचार्य :** अवश्य, महाराज.

**राजा :** शिवा, आपण शिकारस्वारी पुढं पाठवली आहे ?

**शिवानंद :** होय, राजन. ते जंगलात पोचलेही असतील. दुपार कलायच्या आत आपण जंगलात पोचायला हवं.

**राजा :** म्हणजे वेळ थोडा आहे. आचार्य, मी शब्दांची आरास मांडीत नाही. मला तुमच्याकडून पैसा हवा आहे. द्रव्य !

**आचार्य :** आश्रमाकडून द्रव्य ?

**राजा :** का नाही ? आश्रमाभोवतालच्या दोनशे गावांचा किसानकर, व्यापारकर आपल्याकडे जमा होत असतो. तुम्ही द्रव्य घेता आणि सारी देखभाल मात्र आम्ही करायची. म्हणजे बाई तुम्ही ठेवायची आणि पोरांचं पालनपोषण मात्र आम्ही करायचं.

**आचार्य :** महाराज, हा आश्रम संन्याशांचा आणि तपस्व्यांचा आहे. असले दृष्टांत-देखील येथे वर्ज्य आहेत

**राजा :** ठीक आहे. दृष्टांत मी मागे घेतो. पण पैसे द्या. मला लढाईसाठी द्रव्य हवं आहे. तुमचं भांडार द्रव्यानं खचून भरलेलं आहे.

**आचार्य :** असेल. पण तो पैसा, लोकांसाठी, लोककल्याणासाठी आहे.

**राजा :** मग लढाया कशासाठी असतात ? आम्हाला काय मरायची हौस आहे ? तुम्ही लोक उदबत्त्या लावून प्रवचनं झोडता, आम्ही तलवारी घेऊन लढायला जातो. प्राण पणाला लावतो. आमचे पूर्वापार वैरी, शेजारचे शिलाहार आमच्यावर स्वारी करण्याच्या तयारीत आहेत. कोणत्या क्षणी लढाईला सुरुवात होईल, याचा नेम नाही. आणि

लढाईसाठी द्रव्य लागतं.

**आचार्य :** देवाधर्मासाठी युद्ध असेल तर त्याला आम्ही अवश्य साहाय्य करू.

**राजा :** आचार्य, प्रत्येक युद्ध देवाधर्मासाठीच असतं. युद्ध करणाऱ्या प्रत्येक पक्षाला देव आपल्या बाजूला आहे असा ठाम विश्वास असतो. देव दोन्ही पक्षात असतो, पण जे दुबळे असतात त्यांना तो मारतो आणि प्रबळ असतात त्यांना तारतो. तात्पर्य द्रव्य द्या...

**आचार्य :** मी द्रव्याचं बोललो नाही. आम्ही आपल्या विजयासाठी प्रार्थना करू.

**राजा :** अवश्य करा. पण प्रार्थना पगार म्हणून सैनिकांना वाटता येत नाहीत. म्हणून द्रव्य.

**आचार्य :** ठीक आहे, महाराज. पाच सहस्र मोहरा उद्या आपल्याकडे रवाना होतील.

**राजा :** पाच ? गेल्या तीन वर्षांत आपल्या भांडारात जमा झालेल्या करद्रव्याचा अर्धा हिस्सा मला हवा आहे... शिवा, तू डिंक खाल्ल्यासारखा गप्प का ? तू सांग आचार्यांना. मी जातो... अतिथीगृहात. भूक आता असह्य झाली आहे... तळलेले सारंगे आणले आहेत म्हणतोस !

**शिवानंद :** होय, महाराज.

**राजा :** मग जायलाच हवं. तू बोल आचार्यांशी. किमान एक लक्ष मोहरा मला हव्या आहेत. एक तांब्याचं नाणंही कमी नाही... आणि लौकर ये... शिकार चुकता कामा नये... नमस्ते आचार्य... तळलेले सरंगे .. निखाऱ्यांवर भाजलेले होलगे

[ बाहेर जातो. शिवानंद उभा राहतो. ]

**शिवानंद :** आचार्य, महाराजानी सांगितलेली रक्कम देणं आश्रमाला कठीण नाही हे मला माहीत आहे. आपण तेवढं द्रव्य उद्या सकाळी राजाच्या भांडाराकडे पाठवावे अशी विनंती आहे.

**आचार्य :** आणि नाही पाठवलं तर ?

**शिवानंद :** राजांचा स्वभाव आपल्याला माहीत आहे.

**आचार्य :** राजांचा स्वभाव मला कळला आहे. पण त्यांच्या नव्या महामंत्र्यांचा अजून कळला नाही. ते अनेक वर्षे माझ्याजवळ राहिलेले असूनसुद्धा.

**शिवानंद :** ( स्मित ) माझा स्वभाव तर आचार्य, मलाही अजून कळलेला नाही. मी स्वतःलाच खूप परका आहे.

**आचार्य :** सध्याच्या जीवनात तू सुखी आहेस ?

**शिवानंद :** [ क्षणभर खाली पाहून ] तेही मला सांगता येणार नाही, आचार्य. माणसाच्या आयुष्यातला सर्वांत अवघड प्रश्न आहे हा.

**आचार्य :** माझा प्रश्न तात्त्विक नाही. तुझ्या आजकालच्या वर्तनाबद्दलचा आहे.

**शिवानंद :** त्यासंबंधी एकच सांगतो. मी माझ्या विवेकाशी प्रतारणा कधी केलेली नाही.

**आचार्य :** आणि पुढेही करणार नाहीस ?
**शिवानंद :** नाही करणार.
**आचार्य :** तथास्तु. शत्रूची सेना सीमेवर उभी असताना राजाशी तंटा करण्याची माझी इच्छा नाही. उद्या माध्यान्हाच्या आत तेवढं द्रव्य पाठवलं जाईल. पण लक्षात ठेव, ही राजाला शरणागती नाही, हा फक्त तुझ्यावरचा विश्वास आहे. एकच सांगतो शिवानंद, माझा दीक्षार्थी होतास म्हणून. राज्यकर्त्यांनी संन्याशासारखं वागावं असं मी मुळीच म्हणणार नाही. माणसांचं जीवन त्यातील सर्व ऊर्मीसह, सर्व उद्रेकांसह, सर्व विद्रोहांसह पुढे जायला हवं. माणसाच्या जीवनाला सहस्र आधार असतात. पण त्यांच्याही खाली एक मूलाधार असतो. तडजोड त्या वरच्या आधारांबाबत होऊ शकते... करावी लागतेही. पण मूलाधाराच्या बाबतीत मात्र कधीच नाही. हे जो जाणतो तो जगतो. मग तो कोणत्याही ठिकाणी असो. कुठेही जा, राहा... पण हे भान ठेव.
॥ असतो मा सद्गमय ॥ तमसो मा ज्योतिर्गमय ॥ मृत्योर्माऽमृतं गमय ॥
**शिवानंद :** लक्षात ठेवीन आचार्य... आशीर्वाद असावेत.

[ पदस्पर्श करून जातो. ]

# अंक पहिला

## प्रवेश दुसरा

जंगल.

वेळ : सायंकाळ.

पलीकडे कोपऱ्यात एक खोपटे.

मेघांचा गडगडाट, विजाही लकलकतात.

राजा दोन मानकऱ्यांच्या खांद्यांचा आधार घेऊन लंगडत येतो.

**राजा :** हं... थांब इथे... आता पाऊस थांबला आहे... ही जागाही बरी दिसते आहे .. त्या डोंगरातल्या खबदडीनं आपल्याला वाचवलं... नाहीतर देवमाशासारखे भिजून चिंब झालो असतो... पण माझा महामंत्री मागे का राहिला ?

**मानकरी :** ते आपले घोडे बांधताहेत.

**राजा :** महामंत्र्याला राजापेक्षा घोड्यांची काळजी जास्त. तुम्ही का नाही थांबलात घोडे बांधायला ?

**मानकरी :** आम्ही वारंवार सांगितलं महाराज, पण त्यांनी ऐकलं नाही.

**राजा :** का ? तुम्हाला घोडेही बांधता येत नाहीत ?

**मानकरी :** ते म्हणाले, घोड्यांना माणसाचा स्पर्श कळतो आणि जो स्पर्श त्यांना आवडतो, त्यांच्या अंगात शिरतो, तोच त्यांना हवा असतो. नको असलेला स्पर्श झाला तर त्यांना लाथा मारण्याचा नैतिक अधिकार असतो...

**राजा :** ( इतरत्र लक्ष असलेला ) कोणाला ?

**मानकरी :** घोड्यांना महाराज.

**राजा :** कोण म्हणालं असं ?

**मानकरी :** महामंत्री, महाराज.

**राजा :** तो घोड्यासंबंधी बोलत होता की बायकांसंबंधी ?

**मानकरी :** घोड्यासंबंधी, महाराज.

**राजा :** ठीक ठीक. बायकांप्रमाणे घोड्यांच्या बाबतीतही त्यानं सूक्ष्म विचार केला आहे. त्याचं मत आपल्याला मानलंच पाहिजे... हे खोपटं बरं दिसतंय. ही जंगलातली माकडं झोपड्या बांधून राहातात हे आमचं नशीब. नाहीतर अशा वादळपावसात निवाऱ्याची जागाही आम्हाला मिळाली नसती... [ शिवानंद येतो. ]

**शिवानंद :** राजन्...

**राजा :** आले ! आमचे महामंत्री आले ! काय, घोड्यांची सेवा मनासारखी झाली ?.

**शिवानंद :** माझ्या मनासारखी झाली. घोड्यांच्या मनासारखी झाली की नाही, सांगता येत नाही... पण तुमचा पाय कसा आहे ?

**राजा :** तो स्वर्गवासी व्हायच्या बेतात आहे. महामंत्र्याच्या सांगण्यानुसार प्रत्येक गोष्ट करायला मी एका पायावर तयार असल्यामुळे, दुसऱ्या पायाची गरज काय, असा प्रश्न त्याला पडला असावा !

**शिवानंद :** ( हसत ) राजन्, तुम्ही चिंता करू नका. तुमच्या पायाला तसं विशेष काही झालेलं नाही. तुम्ही मघाशी घोड्यावरून उतरताना जास्त घाई केलीत म्हणून पोटरीतल्या शिरा नाराज झाल्या आहेत, एवढंच... [ मानकऱ्यांना ] तुम्ही जा आता आणि लक्षात ठेवा .. तिथे घोड्याजवळ झाडाखाली बसून राहा... हाकेच्या अंतरावर. आणि जेव्हा मद्य घ्याल...

**मानकरी :** नाही. महाशय.

**शिवानंद :** घेणार आहात हे मला माहीत आहे. घ्या... पण बेतानं घ्या. आपलं शिबिर कोसभर दूर आहे... राजाच्या आदेशानुसार. तेथपर्यंत आपल्याला शुद्धीत राहून परत जायचं आहे.

**मानकरी :** होय, महाराज.

**शिवानंद :** जा...

[ मानकरी जातात. ]

**राजा :** महाराजांच्या आदेशानुसार ! शिवा, तुझा टोमणा माझ्या लक्षात आला.

**शिवानंद :** ( गुडघ्यावर बसून पाय चाचपत ) नेमकं कुठं दुखतंय ते सांगा, राजन.

**राजा :** पण दोन रानडुकरांच्या मागे दोनशे माणसांनी धावण्यात काय पुरुषार्थ आहे ? रानडुकरांचा तो सन्मान केल्यासारखं झालं असतं ? नाही तिथं नाही– खाली–

**शिवानंद :** ( हसून ) मला तर वाटतं, राजन्, एका रानडुकरामागे एकाच माणसानं जावं...

**राजा :** आणि त्याच्या मुसंडीखाली मरावं ! तुला मरायचं फार कौतुक... मी पाहून ठेवलंय... हं... तिथं जवळच... जरा वर.... मला तर अनेकदा वाटतं, मरायला योग्य कारण सापडत नाही, म्हणून जगतो आहेस तू. तुला जगण्याची महती कळलेली नाही.

**शिवानंद :** मी शोधतो आहे ती, राजन्.

**राजा :** शोध...शोध... हां... तिथेच– तिथेच काहीतरी भानगड झाली आहे. शिवा, जीवनाच्या महतीचा शोध नंतर घे. आधी या खोपटाच्या मालकाचा शोध घे मला उभं राहणं असह्य झालंय... पाय दुखावलाय आणि शरीर शिणलंय. अशी महामूर्ख रानडुकरं मी कधीच पाहिली नव्हती. चांगलं राजवाड्यात आणि राजाच्या पोटात

जायला त्यांना मिळालं असतं...

**शिवानंद :** मी शोध घेतो, राजन्. कोणीतरी माणसं आत असली पाहिजेत... [ झोपडीजवळ जाऊन ] कुणी आहे का आत ?

**राजा :** अरे त्या वानरांना तुझी भाषा काय कळणार आहे... तुला त्यांची भाषा येते... त्याच भाषेत विचार त्यांना.

**शिवानंद :** कोणत्याही भाषेत विचारलं तरी ते उत्तर देणार नाहीत... मी आत जाऊन पाहतो...

**राजा :** त्यांना सांग, या देशाचा राजा तुझ्या घरी आला आहे. त्याचं एक तंगडं दुखावलं आहे. म्हणावं, ज्यावर बूड टेकता येईल अशी कोणतीही वस्तू.... दगडधोंडा, बाजलं, झाडाचं खोड... इथे या पाखाखाली आणून ठेव.

**शिवानंद :** तुम्ही निश्चित राहा, राजन्

[ मागल्या बाजूने झोपडीत जातो. ]

**राजा :** ( आकाशाकडे पाहतो ) अजून ढगांचा धुमाकूळ चालू आहे. तीन वर्षे पाऊस पडला नाही आणि आज पडला तो असा, दैत्यासारखा... वादळविजांचं तांडव करीत... ये बाबा, दैत्यासारखा ये, देवासारखा ये, पण ये... लोकांचा प्राण आताच कंठाशी आलाय [ शिवानंद एक ओंडका घेऊन येतो ]... मिळालं काही ?

**शिवानंद :** हा ओंडका आणला आहे, राजन.

**राजा :** तूच आणलास ? आत कोणी माणसं नाहीत ?

[ शिवानंद ओंडका पाखाखाली ठेवतो. ]

**शिवानंद :** आहेत... राजाला भेटायचंं, म्हणून अंगावरची पटकुरं जरा साफ करून येताहेत ती... इथे बसा राजन. मी अगोदर तुमचा पाय चोळून देतो. ते यायच्या आत. ( हसून ) देशाचा महामंत्री राजाचे पाय चोळतो आहे हे प्रजाजनांना दिसायला नको.

**राजा :** जे दिसायला नको ते असायलाही नको. तू कशाला पाय चोळतोस ? त्या दोन गाढवांना बोलाव... मद्याचे घडे घशात रिकामे करीत बसले असतील ते.

[ ओंडक्यावर बसतो ]

**शिवानंद :** नाही राजन... ही एक विद्या आहे.

**राजा :** तू कुठे शिकलास ती ?

**शिवानंद :** अर्थात् मठामध्ये. तिथे थोडी वैद्यकीही शिकावी लागते.

( पाय चोळतो. )

**राजा :** काय थंड हवा सुटली आहे ! आपणही थोडं मद्य घेतलं तर...

**शिवानंद :** नाही, राजन. आपला करार झाला आहे. एक घटका रात्र झाल्याविना मद्याला स्पर्श करायचा नाही.

**राजा :** हा तुझा नैतिक खोकला मला नेहमी नडतो... वा ! बरं वाटतंय ! शिवा, एक प्रश्न नेहमी माझ्या मनात येतो. तू एवढा धुरंधर; लढवय्या... जबरदस्त शिकारी. मद्यमदिराक्षींचाही आस्वाद घेणारा, तू या जोगड्यांच्या मठामध्ये पाचसहा वर्षे काढलीस... तुला काय तुझ्या आईबापांनी मठामध्ये फेकून दिला ?

**शिवानंद :** ( हे आणि पुढील बोलणे पाय चोळीत असताना) राजन, मला आईबाप नव्हते.

**राजा :** नव्हते ? म्हणजे तू काय एखाद्या झाडावरून बदकन खाली पडलास का, पिकलेल्या फळासारखा ?

**शिवानंद :** नव्हते .. म्हणजे मला माहीत नाही कोण होते ते. याच जंगल भागातील एका भिल्लाला मी सापडलो. तेथून केव्हातरी मी नगरवस्तीत पळालो. तिथं लोहाराच्या घरी घण मारले, सुताराच्या घरी करवत चालवली, कोतवालाच्या चौकीवर हत्यारंही हाताळली. पण कुठेच नीट जमेना, म्हणून शेवटी मठाच्या दारात जाऊन उभा राहिलो. तुम्हाला माहीत आहे, आमच्या पंथामध्ये जात, गोत, घर–घराणं... कशाचीही चौकशी करीत नाहीत. मठाची दारं माझ्यासाठी उघडली. सहा वर्षांनी मी मठाच्या अनुज्ञेनं लढाईच्या वेळी तुमच्या सैन्यात प्रवेश केला, आणि नंतर तुम्ही मला स्वतःच्या सेवेत रूजू करून घेतलंत. हा माझा इतिहास.

**राजा :** म्हणजे तुला इतिहासच नाही. शिवा, भाग्यवान आहेस तू. इतिहास हा आमच्यासारख्यांना शाप झालेला आहे. नेहमी त्या इतिहासाचं अर्धमेलं मढं खांद्यांवर घेऊन पुढे पाय टाकावा लागतो. म्हणून आम्ही हे असे ! तू मला सापडला नसतास तर माझं काय झालं असतं, कुणास ठाऊक ! बरं झालं, तू त्या जोगड्याच्या तावडीतून सुटलास.

**शिवानंद :** राजन्, ( स्मित करीत ) लोकसेवा करणारे ते साधुसंत आहेत. आणि आपल्या देशाचे धर्माध्यक्षही.

**राजा :** सिंहासनाप्रमाणेच मृगाजिनाचीही नशा असते, शिवा. मृगाजिनंही सिंहासनासारखी उन्मत्त होतात, संपत्तीच्या राशी रचतात, सत्तेची कारस्थानं खेळतात आणि तीर्थात मद्य आणि छाव्यात रखेल्या लपवतात.

**शिवानंद :** खरं आहे, राजन्. शेवटी सदाचाराचा उदय अमुक स्थानामध्येच होतो असं नाही, तो अखेरी माणसाच्या मनातच होतो.

**राजा :** ( हसतो ) नीतीपाठ क्रमांक छप्पन. मठामध्ये राहिल्यामुळेच तुला हा नैतिक खोकल्याचा आजार जडलाय. केव्हाही उपटणारा.

**शिवानंद :** (हसत ) राजन्, तुम्हाला मठ मान्य नसला तर त्याचा राजाश्रय तुम्ही बंद करू शकता. धर्माध्यक्षाचं पदही रद्द करू शकता.

**राजा :** काहीही करू शकत नाही. हे इतिहासानं आमच्या मानगुटीवर बसवलेलं एक

मढं. आमच्या बापाच्या बापाच्या बापाचा हा गाढवपणा !

**शिवानंद :** ( हसतो ) म्हणजे पणजोबांचा !

**राजा :** गाढवपणा किती प्राचीन आहे हे दाखवण्यासाठी तीन बापांचा मी उच्चार केला. होय, पणजोबांचा. कफनी आणि लुगडं हे दोन आमच्या पणजोबांचे मोहबिंदू होते. कफनी पाहिली की पाय धरायचे आणि लुगडं दिसलं की हात धरायचे, हा त्यांचा बाणा.

**शिवानंद :** आता बघा, पाय सैल झाल्यासारखा वाटतो ?

**राजा :** हो... खूपच. शिवा, तुझ्या स्पर्शाला एक किनार आहे, पुनवेच्या चांदण्याची. ... छान बोललो की नाही !

**शिवानंद :** ( हसत ) छान, पण खोटं.

**राजा :** खोटं ? आम्ही बायकांच्या मागे धावतो आणि बायका मात्र तुझ्यामागे धावतात. त्याचं कारण हा स्पर्श.

**शिवानंद :** तसं नाही, राजन. राजन, आपण रानडुकरांच्या मागे धावतो, तसं बायकांच्या मागे धावायचं नसतं... शिकार करण्यासाठी.

**राजा :** नीतिपाठ क्रमांक—

**शिवानंद :** ( हसत ) त्या पणजोबांनी पुढे काय केलं ?

**राजा :** करू नये ते केलं. सगळे बाप, आजेपणजे असेच काहीतरी उपद्व्याप करून ठेवतात. पुढच्यांना उपद्रव व्हावा म्हणून... तेवढयासाठीच असतात ते.

**शिवानंद :** काय केलं त्यांनी ?

**राजा :** जातपात झुगारणाऱ्या, यज्ञयाग न मानणाऱ्या, फक्त सूर्याची पूजा करणाऱ्या संन्याशांचा एक तांडा उत्तरेकडून आला आणि पणजोबा पाघळले. लोक तर नेहमीच गाढव असतात. त्यांना नेहमी काहीतरी नवीन आणि सोपं हवं असतं. देशात भराभर पंथाचा प्रसार व्हायला लागला. जातपत तोडल्यानं सावळ्यामावळ्यांना तर ते वरदानच होतं. दहावीस वर्षात सर्वत्र पंथच पंथ. सुदैव एवढेच की पणजोबांनी संन्याशांच्या पायावर लोटांगणं घातली, त्यांना हा मठ बांधून दिला, उत्पन्नाची सोय केली, धर्माध्यक्षपद निर्माण केलं, पण पंथ राजवाड्यात मात्र आणला नाही.

**शिवानंद :** आता एकदम बरं वाटतंय ?

**राजा :** छान वाटतंय. पुन्हा त्या रानडुकरांचा मी पाठलाग करू शकेन. पण त्या संन्याशांनी एक चांगलं केलं. आमच्या पुरोहितांच्या ढुंगणाखालचे पाट त्यांनी ओढले. त्यांची मिजास कमी झाली. पण सत्तेच्या नशेत पुढे संन्याशीही बिथरले. आपणच प्रजेचे पालक आहोत असं समजून ते राजाशी भांडायला लागले. हा छळ माझ्या बापानं सोसला, आजोबांनी सोसला आणि आज मीही सोसतो आहे... परवा पाहिलंस ना, किती थयथयाट केला आचार्यानं ! एकच भली गोष्ट केली आजोबांनी, आणि ती

म्हणजे, धर्माध्यक्ष नेमण्याचा अधिकार राजाकडे ठेवला. उद्या हा म्हातारा मेला तर त्याच्या जागेवर मी माझा माणूस नेमू शकेन.

**शिवानंद :** तुम्हाला पंथासंबंधी प्रेम नाही राजन् ?

**राजा :** ( उठतो ) माझं प्रेम फक्त माझ्यावर, माझ्या सत्तेवर आणि शिल्लक राहिलेलं तुझ्यावर–बस्.

**शिवानंद :** ( हसत उठतो ) मला वाटतं, राजन्, तुम्ही आता चालू शकाल.

**राजा :** धावूही शकेन.... पण आभाळ अद्याप निवळलेलं दिसत नाही... अजून थोडा वेळ आपल्याला इथे थांबावं लागेल... ( इकडे तिकडे चालतो. मागे लक्ष जाते. दचकतो. )

[ झोपडीजवळ एक म्हातारा आणि एक तरुण उभे असतात. ]

हे कोण ! सापासारखे सरपटत आले ? आपल्याला कळलंही नाही...

**शिवानंद :** हे बाबा या झोपडीचे धनी.

**राजा :** ( त्याच्याकडे पाहात ) बापरे ! किती विद्रूप आणि भयानक दिसतोय. त्याच्या बायकोनं पहिल्या रात्रीच जीव दिला असेल.

**शिवानंद :** ( सस्मित ) तसं नाही, राजन्. म्हातारपण माणसाला विद्रूप करतं आणि दारिद्र्यही.

**राजा :** आणि हा ?

**शिवानंद :** हा त्याचा मुलगा. बाबा, हे आपल्या देशाचे राजे आहेत. त्यांच्या पायाला हात लावा आणि तूही बेटा.

**राजा :** एक तुझा बाप आणि एक तुझा बेटा ! ( हसतो )

[ ते दोघे वाकून राजाला नमस्कार करतात. राजा बसतो. ]

**राजा :** एकच मुलगा याला ?

**शिवानंद :** एक मुलगीही आहे...

**राजा :** कुठे आहे ती ? ए म्हाताऱ्या, बोलाव बाहेर तुझ्या पोरीला. ( शिवानंद खूण करतो, म्हातारा आत जातो. ) ही माणसं विश्वासघातकी असतात. सगळी आपल्या नजरेसमोर हवीत. ( मुलाला ) काय नाव तुझं ?

**शिवानंद :** त्याला बोलता येत नाही, राजन्. तो मुका आहे. केव्हातरी त्याची वाणी गेलेली आहे. त्याचं नाव रंधवा.

**राजा :** वाणी गेली ? काय झालं वाणी जायला ?

**शिवानंद :** वाणी जाण्यासारखे अनेक प्रसंग या लोकांच्या आयुष्यात येतात, राजन्. अनेकांची शिल्लक राहते हेच आश्चर्य.

**राजा :** पण त्याला ऐकायला येतंय. कुत्र्यासारखे कान टवकारत सगळं ऐकतो आहे. ( तरुणाला ) ऐकायला येतं का ?

( मुलगा मान हलवून हो म्हणतो. म्हातारा मुलीला घेऊन बाहेर येतो. मुलगी १६-१७ वर्षांची... घाबरलेली. )

**शिवानंद :** राजांना नमस्कार कर, मुली.

( ती नमस्कार करून बाजूला उभी राहते. )

**राजा :** ( निरखून पाहात ) शिवा, ही पोरगी तशी बरी दिसतेय की! वा! तरतरीत आणि गोंडस आहे. जरा घासूनपुसून स्वच्छ केली तर आपल्या उपयोगी पडेल. हिला तरी बोलता येतं की नाही? काय नाव तुझं? ( पुन्हा जोराने ) काय नाव तुझं?

**मुलगी :** खटाळी!

**राजा :** ( हसतो ) वा! काय नाव आहे! या रानटी लोकांना चांगली नावंही सापडत नाहीत! शिवा... हिच्या अंगाचा वास येतोय. दूर उभी राहा. तुझ्या भावाजवळ जा. तिकडे हिला आठ दिवस शिकेकाईच्या हौदामध्ये भिजत ठेवू आपण.

**शिवानंद :** राजन्, ती येणार नाही... आणि आपण त्यांच्या आश्रयाला आलो आहोत. त्यांची मुलगी बळजबरीनं घेऊन जाणं बरं होणार नाही.

**राजा :** कोण बळजबरी करतंय? या जंगली जनावरांच्या कळपातून मी तिला बाहेर काढतोय.

**शिवानंद :** राजन्, आपण आपल्या प्रजाजनांचे पालक आहोत. असा अन्याय करणं योग्य होणार नाही.

**राजा :** तू मूर्ख आहेस. कितीही पंडित असलास तरी... बघ तिच्या डोळ्यांकडे... आधाशी नजरेनं पाहते आहे ती. अशा कचऱ्याच्या कुंडीतून राजमहालात यायला कोण लालसावणार नाही. अशी कलदार कळी इथे कुजत ठेवणं हाच अन्याय आहे. विचार तिला. ती यायला तयार आहे की नाही?

( शिवानंद संथानिक बोलीत विचारतो. ती काहीतरी उत्तरते. )

**राजा :** काय म्हणतेय ती?

**शिवानंद :** ती म्हणते, माझ्या बापाला ते आवडणार नाही.

**राजा :** ( हसतो ) म्हणजे तिची हरकत नाही. ( हसत ) शिवा, तू अजून या प्रांतातला बालक आहेस, तुला कळत नाही. अरे मिठी मारायला आपण पुढे सरसावल्यावर जेव्हा बाई म्हणते... कोणी बघेल ना... तेव्हा समजावे, ती आपल्या कह्यात आली आहे. ठाम नकार नसला म्हणजे मागे होकार आहे असं समजावं. हे ठरलं. मी हिला घेऊन जाणार. एखाद्या मानकऱ्याला तरी देता येईल. हिच्या बापाकडे तू पंचवीस मोहरा पाठवून दे. मुलीपेक्षा त्याला मोहरांचं महत्त्व अधिक वाटेल... ए थेरड्या, तू समोर उभा राहू नकोस... तुझं ते भयानक तोंड पाहून मला त्रास होतो... तेव्हा ही पोरगी...

**शिवानंद :** ( स्मित ) राजन्, ते घडणार नाही.

**राजा :** तुझा नैतिक खोकला ! बरं, ते जाऊ दे. मला तहान लागली आहे, शिवा. घसा कोरडा पडलाय... झोपडीत पाणी आहे का, विचार त्यांना.

**शिवानंद :** असेलही, पण ते आपण पिता कामा नये. इथे जवळपास झरे आहेत... या रंधवाला माहीत असतील. ( रंधवाला विचारतो ) आपल्याजवळ पडशीत भांडी आहेत...मी घेऊन येतो पाणी...

**राजा :** तू कशाला जातोस ? ते दोघं तिकडे डुकरासारखे लोळत असतील त्यांना सांग.

**शिवानंद :** नाही राजन्. त्यांना जमणार नाही ते. ते मद्याच्या नशेत बुडालेले असणार. मीच जाऊन आणतो. चल बेटा !

( शिवानंद-रंधवा जातात. राजा उठून इतस्ततः फिरतो. नंतर मुलीजवळ येतो. )

**राजा :** काय नाव म्हणालीस तुझं ?

**मुलगी :** खटाळी.

**राजा :** तुला आमची भाषा बोलता येते ?

**मुलगी :** ( मान हलवून ) नाही.

**राजा :** समजते ?

**मुलगी :** हो...

**राजा :** ( बसतो ) राजवाड्यात गेल्यावर तुझं नावही बदलून टाकू. काय नाव ठेवलंय बापानं... तुला गाणं म्हणता येतं ?

**मुलगी :** नाही.

**राजा :** मी तर ऐकलंय, तुम्ही जंगली माणसं नाचगाण्यात पारंगत असता. नाचता तरी येतं का ? (मुलगी बोलत नाही. क्षणभराने ) येतंय ना ?

**मुलगी :** हो.

**राजा :** मग नाचून दाखव मला. ( ओरडतो ) नाच !

( मुलगी बापाकडे पाहते. तो खुणावतो. मुलगी नाचाचे पवित्रे टाकते. थोडा वेळ नाच झाल्यानंतर... )

**राजा :** बस झालं ! आमचे नृत्यकार तुला चांगलं नाचायला शिकवतील ... ठीक. हा रुमाल घे... ( तिच्याकडे रुमाल फेकतो. ) हात तोंड स्वच्छ पूस त्या रुमालाला आणि इकडे ये... इथे माझ्याजवळ येऊन बैस आणि पाय चेपून दे माझे. ( मुलगी हलत नाही. )

**राजा :** ( ओरडतो ) उचल तो रुमाल ! ( मुलगी स्वस्थच. भेदरलेली )

**राजा :** ( संतापून उठतो ) नाही ऐकत ? दीड दमडीची रांड ! तो रुमाल... नाही-तर... ( राजा पुढे येताच मुलगी धावत बापाकडे जाते. बाप तेवढ्यात जवळ पडलेला कोयता उचलतो आणि राज्याच्या मानेवर वार करायचा प्रयत्न करतो. राजा चटकन वळतो, त्याचे हात पकडून त्याला खाली पाडतो. तेवढ्यात मुलगीही पुढे धावून

कोयता उचलते आणि राजाच्या अंगावर धावते. राजा तिलाही पकडतो. कोयता दूर फेकतो आणि खाली ढकलतो. राजा ओरडतो. )

**राजा :** ( संतापाने थरथरत ) मानकरी ! मानकरी !

( बाप-मुलगी उठतात आणि झोपडीत पळत जातात. तेवढ्यात दोन मानकरी येतात, तलवारी उपसून )

**मानकरी :** महाराज...

**राजा :** ( थरथरत ) त्या झोपडीत जा...दार बंद असलं तर तोडा... आणि आतल्या दोघांना ठार मारा. त्या थेरड्याला आणि त्या कार्टीलाही... जा ! खांडोळी करा त्यांची... माझा आदेश आहे, जा...

( सरदार धावत जातात. राजा थरथरतच ओंडक्यावर बसतो. झोपडीतून दार तोडल्याचा आणि नंतर किंकाळ्यांचे आवाज. )

**राजा :** हे सगळं जंगल या रानटी लोकांसह जाळलं पाहिजे !

( शिवानंद— रंधवा येतात )

**शिवानंद :** राजन्, फार सुंदर निर्मळ पाणी मिळालंय.

**राजा :** आण इकडे.... अंगात जाळ पेटलाय माझ्या... पेला नको... ते भांडंच दे इकडे...

( राजा पाणी घटाघटा पितो आणि भांडं फेकून देतो. मानकरी बाहेर येतात. रक्तानं माखलेल्या तलवारी घेऊन. )

**राजा :** ( आता शांत झालेला ) मारलंत त्यांना ?

**मानकरी :** होय महाराज.

**शिवानंद :** राजन्, ती दोघं कुठं आहेत ?

**राजा :** खांडोळी केलीत ?

**मानकरी :** होय, महाराज...

**शिवानंद :** कोणाला मारलंत ?

**राजा :** ( मानकऱ्यांना ) जा तुम्ही... आपल्या जागेवर. ( शिवानंदाला ) होय...त्या दोघांना मारण्यात आलं आहे. जिवंत राहण्याच्या लायकीचे नव्हते ते !

( रंधवा डोळे विस्फारून हे ऐकतो आणि एक किंकाळी फोडून झोपडीत धावतो. क्षणभर स्तब्धता. शिवानंद मान खाली घालून उभा. )

**शिवानंद :** का मारलंत त्यांना राजन् ?

**राजा :** राजाला ठार मारू पाहणाऱ्या बदमाशांना एकच शासन असतं... देहान्ताचं...

**शिवानंद :** त्यांनी तुम्हाला मारायचा प्रयत्न केला ?

**राजा :** देवाची कृपा म्हणून वाचलो मी. नाहीतर कोयत्यानं कापलेलं माझं मुंडकं इथे

पडलेलं दिसलं असतं तुला.

**शिवानंद :** फार वाईट झालं हे.

**राजा :** तू लागलास पुन्हा साधुत्वाच्या गुहेत शिरायला. ( हसतो ) अरे हा केरकचरा मृत्यूच्या कुंडीत पडला म्हणून खेद मानायचा ?

**शिवानंद :** कोणीतरी स्वार आलेला दिसतो... राजधानीतून.

**राजा :** धावत येतो आहे. ( उठतो ) काहीतरी विपरीत घडलं असलं पाहिजे.

( दूत येतो. अभिवादन करतो. )

**राजा :** काय वार्ता आहे ?

**दूत :** महाराज, शिलाहारांची सेना आपल्या सीमेत घुसली असून राजधानीच्या दिशेनं आक्रमण करीत आहे. सेनापतींनी संदेश दिला आहे.

**राजा :** हे संकट इतक्या लवकर ओढवेल असं वाटलं नव्हतं... शिवा...

**शिवानंद :** महाराज, आपली सेना सिद्ध आहे. आपण चिंता करायचं कारण नाही. मी त्या पोराला भेटून येतो. ( जातो )

**राजा :** भेट... भेट.... त्याला मिठी मार. त्याचे मुके घे, रडत असला तर शेल्याने डोळे पूस त्याचे... मी मानकऱ्यांना उठवतो आणि घोडे तयार ठेवायला सांगतो... पाऊस येवो वा वादळ होवो... ताबडतोब राजधानीत पोचायला हवं... चल रे... ( मागे पाहून ओरडतो ) शिवा, तुझा सांत्वनसमारंभ लवकर आटोप.

( दूतासह जातो. विजा लखलखतात. क्षणभराने शिवानंद रंधवाबरोबर झोपडी-कडून बाहेर येतो. )

**शिवानंद :** (रंधवाच्या पाठीवर हात ठेवतो ) रंधवा, राजाच्या वतीनं मी क्षमा मागतो तुझी... या मोहरा जवळ ठेव... ताबडतोब तुझ्या माणसांना बोलावून जरूर ते संस्कार कर... आणि रातोरात निघून उद्या राजधानीत ये... माझ्याकडे. या पुढे तू माझा आहेस. मी थोरला भाऊ आहे असं समज...ही मुद्रा जपून ठेव. ती दाखवल्या-वर कोणीही रक्षक तुला माझ्याकडे घेऊन येईल. ऐकशील माझं... येशील मी सांगितल्याप्रमाणे ?

( रंधवा मान हालवून हो म्हणतो. शिवानंद त्याच्या डोक्यावरून हात फिरवतो. )

**शिवानंद :** ( जाताना ) उशीर करू नकोस. दोन दिवसांत आमचं सैन्य सीमेकडे जायला निघणार आहे. मी तुझी वाट पाहीन.

( जातो. )

( रंधवा पुतळ्यासारखा स्तब्ध उभा. विजांचा कडकडाट होत असतानाच.... अंधार. )

# अंक पहिला

## प्रवेश तिसरा

रणवाद्यांचे आवाज.

रंगमंचावर अंधार.

अंधारात समोरच्या बाजूला चिलखते घातलेले तीन सैनिक प्रकाशित होतात. तिघांच्या हातात निशाणे.

**आतून दवंडी**

शिलाहारच्या समस्त नागरिकांनो, पालव देशाचे राजाधिराज खड्गधुरंधर श्रीमान् विशालदेव यांच्या आज्ञेवरून आदेश देण्यात येत आहे. शिलाहारचा राजा लढाईत मारला गेला असून त्याची राजधानी आमच्या ताब्यात आली आहे. शिलाहारची सर्व सेना पराभूत होऊन आम्हाला शरण आली आहे. आवश्यक ती खंडणी घेऊन राजाच्या वारसाला योग्य वेळी शिलाहारच्या सिंहासनावर बसविले जाईल. पण तोपर्यंत राजधानीचा ताबा आमच्या सैनिकांकडे आणि मानकऱ्यांकडे राहील. जो कोणी नागरिक आमच्या सैनिकाला प्रतिकार करील वा त्याच्या कामात अडथळा आणील त्याला तत्क्षणी देहान्त शासन करण्यात येईल आणि त्याच्या घरादाराचाही विध्वंस करण्यात येईल. राजाधिराज विशालदेव आणि महामंत्री शिवानंद यांचा त्रिवार जयजयकार !

( अंधार )

# अंक पहिला

## प्रवेश चौथा

शिलाहारांचा राजवाडा.
ग्रंथालयाचे दालन.
बाहेर दूरवर आरडाओरड, घोषणा, शिंगतुतारी इ. आवाज.
दालनात जागोजाग पुस्तकांच्या अलमाऱ्या, काही शिल्पे, चित्रे इ.
पडदा उघडल्यावर...
क्षणभराने...
एक तरुण देखणी स्त्री धावत आत येते. दरवाजा लावून घेते. आणि तेथे असलेल्या एका शिवाच्या मूर्तीसमोर प्रार्थना करते.
दारावर धक्के... नंतर पहारींचे आवाज.
स्त्री धावत जाते आणि पुस्तकांच्या एका अलमारीमागे लपते.
त्याच वेळी दार कडाडून पडल्याचा आवाज होतो.
आणि राजा दोन मानकऱ्यांसह आत प्रवेश करतो.

**राजा :** शाबास! असाच एकेक दरवाजा फोडा! (दाराशी) जा—सारा राजवाडा पालथा घाला. माझ्या शूर मानकऱ्यांनो! कोणावरही दया दाखवण्याचं कारण नाही. या वाड्यातील प्रत्येक बंद दरवाजा फोडा आणि जिथे जिथे जडजवाहर, सोनं किंवा मूल्यवान वस्तू असतील तिथे ताबडतोब पहारे बसवून आपल्या भांडारीला त्यांची नोंद करायला सांगा. आज रात्री आपण विजयोत्सव साजरा करणार आहोत. दिवे लागायच्या आत, राजवाड्यातील प्रत्येक मूल्यवान वस्तू आमच्या शिबिरात येऊन पडली पाहिजे... जा माझा महामंत्री अद्याप राजवाड्यापर्यंत पोचला नाही? आज तो होता म्हणूनच शिलाहारच्या बलाढ्य सेनेला आम्ही धूळ चारू शकलो....

**मानकरी :** महाराज, आपल्या सैन्याला आदेश देऊन ते आताच राजवाड्यात आले आहेत.

**राजा :** आले आहेत आणि तरीही... [ शिवानंद येतो. ]

**शिवानंद :** मी आलो आहे, राजन्.

**राजा :** ते मला दिसतंय. पण इतका वेळ कुठे होतास? आम्ही राजवाड्यात प्रवेश केला आणि चोरभामट्यांनी येथील संपत्ती पळवण्यापूर्वी तिचा शोध घेत आहोत. बहुधा बायका पाहात फिरत असशील. दुसऱ्या देशातील बायका नेहमीच देखण्या असतात.

**शिवानंद :** मी आपल्या सेनेला आदेश देत होतो. . .

**राजा :** कसला ?

**शिवानंद :** नगरातील लोकांना कोणताही उपद्रव द्यायचा नाही म्हणून.

**राजा :** का ? ते जित आहेत, आणि आम्ही जेते आहोत. मी सेनापतींना सांगितलं होतं की सैनिकांनी नगर लुटावं, हाती येईल ती संपत्ती आणि डोळ्यात भरेल ती स्त्री, त्यांनी स्वत:च्या उपभोगासाठी घेऊन जावी. सूर्यास्त होईपर्यंत कोणावर कसलंही बंधन नाही.

**शिवानंद :** क्षमा करा राजन् पण आपल्या आज्ञेत मी थोडा बदल केला आहे.

**राजा :** म्हणजे . . . कसला बदल ?

**शिवानंद :** नगरातील सर्व चौकांत मी आपले रक्षक बसवले आहेत. त्या रक्षकांशिवाय इतर सर्व सैनिकांनी तावडतोब शिबिरात परतावं आणि नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास देऊ नये, दिल्यास कठोर शासन होईल, असा आदेश दिलाय मी !

**राजा :** थोडासा बदल ! पण ते आपले शत्रू आहेत. त्यांना मारायचा, लुटायचा, छळायचा आपल्याला अधिकार आहे. . .

**शिवानंद :** राजन्, शिलाहारच्या राजाला आपण मारलं आहे, त्याच्या मानकऱ्यांना मारलं आहे आणि ज्यांना मारलं नाही त्यांना बंदिखान्यात रवाना केलं आहे. आता विजय मिळविला आहे. तो विजय निरपराध नागरिकांच्या रक्तानं लांछित करणं म्हणजे शौर्याचं रूपांतर क्रौर्यात आणि सैनिकांचं रूपांतर खाटकांत करण्यासारखं आहे.

**राजा :** आला तुझा नैतिक खोकला ! अरे पण महामंत्र्या, आपल्याला द्रव्य हवंय. हा लढाईचा खर्च भागवण्यासाठी, काही बरोबर नेण्यासाठी. कुठून आणायचं हे द्रव्य ? तुझे माझे जन्मदाते खाली उतरले तरी त्यांना ते जमायचं नाही.

**शिवानंद :** राजन, ती व्यवस्था मी केली आहे. नगरातील साऱ्या महाजनांना आणि सावकारांना मी बोलावलं आहे. आपल्याला हवं तेवढं द्रव्य द्यायला ते तयार आहेत.

**राजा :** ( नाइलाजाने ) ठीक आहे. ही लढाई तुझ्यामुळे आम्ही जिंकली आहे. तेव्हा तुझे नीतिपाठ ऐकून घेणं भाग आहे. शिलाहारचा राजा आपण मारला, पण त्याचा मुलगा . . . राज्याचा युवराज . . .

**शिवानंद :** तो आपल्याला शरण आला आहे. आपल्या बंदीखान्यात आहे तो.

**राजा :** आणि त्याची मुलगी ?

**शिवानंद :** ती अद्याप सापडलेली नाही. राजवाड्यात सर्वत्र शोध चालू आहे.

**राजा :** फार देखणी आहे म्हणतात. तुझे नीतिपाठ शंभरापर्यंत पोचले तरी मी ऐकणार नाही. ती मला मिळाली पाहिजे आणि आज रात्री माझ्या पलंगावर आली पाहिजे.

**शिवानंद :** शोध चालू आहे. पण राजन्, तुम्ही आता शिबिरात जाऊन विश्रांती घ्यायला हवी. निशाणवाल्यांचे पथक बाहेर तयार ठेवलं आहे.

**राजा :** जाईन . . जाईन. पण हा महाल नीट पाहायला पाहिजे. कुठे जडजवाहर

लपवलं असेल त्या चोरानं . . .

( इतस्ततः फिरतो )

**शिवानंद** : राजन्, इथे जडजवाहर सापडणार नाही. हे शिलाहाराचं पुस्तकालय आहे.

**राजा** : म्हणजे केवळ पुस्तकासाठी बांधलेलं ?

**शिवानंद** : होय.

**राजा** : ( शोध घेत ) काय जागेचा दुरुपयोग आहे ! कशासाठी ? माझ्या राजवाड्यात फक्त सात पुस्तकं आहेत. त्यांतली तीन तूच दिली आहेस. आणि चार आमच्या आजापणजांनी कोणाच्या तरी भिडेखातर खरेदी केलेली आहेत. ही पुस्तकं . . . ही चित्रं . . . हे पुतळे . . . सगळ्या निकामी वस्तू जमवल्या त्या राजानं. कशासाठी ?

**शिवानंद** : ( हसून ) राजन्, हे संस्कृतीचं लक्षण आहे. शिलाहारचा राजा आमच्यापेक्षा जास्त सुसंस्कृत होता.

**राजा** : म्हणजेच मूर्ख होता ! ही जंगलाची चित्रं...कशाला ? बाहेर जाऊन जंगलं पाहता येत नाहीत ? हे बायकांचे पुतळे...का ?...जगात काय बायांचा दुष्काळ पडला आहे ? आणि ही भाराभर पुस्तकं...मग डोक्यातली अक्कल काय खुंटीवर टांगून ठेवायची ? कपाळाची संस्कृती ! आणि एवढी संस्कृतीची टेकाडं उरावर घेऊन तो अखेरी आज रणांगणात उताणा पडलाच ना ?... इथे ही पुस्तकंच... ती संस्कृती आली का त्याला वाचवायला ?

**शिवानंद** : ( सस्मित ) राजन्, संस्कृतीमुळे मरण टळतंच असं नाही, फक्त जगणं अधिक सुंदर होतं.

**राजा** : शिवा तूही त्या राजासारखा बेअक्कल आहेस. जगणं सुंदर व्हायला संस्कृती वगैरे काही लागत नाही. फक्त सुंदर बायका आणि चवदार जेवण...बस्...(घाबरत) शिवा ! या आलमारीमागं काहीतरी हलल्यासारखं वाटतं मला. ( भयभीत ) भूत असेल का त्या राजाचं ? एखादं अर्धवट वाचलेलं पुस्तक पुरं वाचायला ते आलं असेल...

**शिवानंद** : नाही, राजन्...भुतं कधी वाचत नाहीत...तुम्हाला काहीतरी भास झाला असेल.

**राजा** : भास नाही आणि भूतही नाही ! कोणीतरी बाई आहे...मला तरण्याताठ्या बायांचा वास येतो...शिवा...या अलमारीमागे कोणीतरी मुलगी आहे...नक्की...मी पाहतो...

**शिवानंद** : थांबा राजन् तुम्ही मागे व्हा ! खरोखरच कोणी तिथे असली तर तिच्या हातात एखादं प्राणघातक शस्त्रही असेल.... तुम्ही बाजूला व्हा...मी बघतो...

**राजा** : नाही . . . तू मागे हो शिवा . . . आजची मोठी लढाई तू जिंकली आहेस, ही लहान लढाई तरी मला जिंकायची आहे. जी कोणी असेल ती निःशस्त्र आहे. . . तिच्या धपापत्या श्वासातला भीतीचा आवाज मला ऐकू येतोय. ( त्याला मागे सारीत ) मागे

हो ! शिवा. . . मीच तिला बाहेर काढणार आहे. . . माझ्या कमरेला खड्ग आहे . . . जराही प्रतिकार दिसला तर खांडोळी करून टाकीन. . . ( मागे जाऊन ) कोण आहेस तू ? बाहेर ये . . . नाही ? . . . मग अशी ओढून काढतो . . . (त्या स्त्रीला हात धरून बाहेर खेचतो–ओरडतो ) शिवा ! या पुस्तकालयातलं सर्वांत सुंदर पुस्तक मला सापडलं ! ( हसतो ) शिवा ! हे पुस्तक !

**शिवानंद :** ( घाबरल्याप्रमाणे ) राजन् ! तिथं काहीतरी पडल्याचा, सरकल्याचा आवाज मला ऐकू आला . . तिथं अजून कोणीतरी आहे ! थांबा, मी बघतो . . .

**राजा :** तू मागे फीर . . . हे सगळं प्रकरण मीच तडीला लावणार आहे . . . लक्ष ठेव हिच्यावर . . .

( झरकन मागे जातो आणि अलमारीच्या मागे शोध घेतो. तेवढ्यात ती तरुणी शिवानंदाकडे क्षणमात्र रोखून पाहते आणि चटकन् बोटातील आंगठी काढून त्याच्याकडे फेकते. शिवानंद ती उचलतो आणि खिशात टाकतो.)

**राजा :** ( मागे येऊन ) कुणीही नाही . . . भास झाला तुला. ( तरुणीचे खांदे पकडीत ) वाहवा ! फार देखणं पुस्तक आहे ! अथपासून इतिपर्यंत आज रात्रीच मी हे वाचून काढणार . . . ( एकदम कल्पना येऊन ) शिवा ! शिवा ! अरे ही राजकन्या आहे ! राजकन्या ! शिलाहारची राजकन्या ! नक्की ! ( दरडावून ) बोल . . . तू कोण आहेस ? सांग. . . नाहीतर या कट्यारीनं तुझी जीभ छाटून टाकीन. . .कोण आहेस तू ?

**तरुणी :** ( शांतपणे ) मी राजकन्येची दासी आहे, महाराज.

**राजा :** राजकन्या नाहीस ?

**तरुणी :** नाही.

**राजा :** खोटं बोलते आहेस ! तू राजकन्या आहेस ! लक्षात ठेव, राजकन्या असलीस तर माझ्या अंतःपुरात तुला सन्मानानं घेऊन जाईन. . . आणि दासी असलीस तर माझ्या पन्नास सैनिकांच्या स्वाधीन करीन तुला. रात्रीच्या रंजनासाठी. शरीराची लक्तरं होतील तुझ्या. सकाळचा सूर्य तुला पाहायला मिळणार नाही. सांग. . . कोण आहेस तू ?

**तरुणी :** मी राजकन्येची दासी आहे.

**राजा :** साफ खोटं ! शिवा, या रांडेच्या बोलण्यावर तुझा विश्वास बसतो ?

**शिवानंद :** होय राजन्. आपल्याला राजकन्या पाहिजे आहे. . . पण ती ही नव्हे. ही दासीच असावी.

**राजा :** कशावरून ?

**शिवानंद :** शिलाहारांशी वाटाघाटी करण्यासाठी मी गेल्या वर्षी या राजवाड्यात आलो होतो. तेव्हा मी राजकन्येला पाहिलेलं आहे. . .

**राजा :** आणि ती ही नाही ?

**शिवानंद :** नाही. आणि राजन् , तुम्हाला माहीत असेल, तीन फण्यांचा नाग हे

शिलाहारांचं दैवत आहे, आणि राजघराण्यातील प्रत्येक व्यक्तीच्या तर्जनीत ते चित्र असलेली आंगठी असते.

**राजा :** हो...माहीत आहे मला...रांडे, दाखव तुझे हात.

( तरुणी हात पुढे करते. )

**राजा :** हिच्या बोटात ती आंगठी नाही...पण फेकून दिली असेल तिनं...

( एक सैनिक येतो. )

**सैनिक :** महाराज, सेनापतींनी हे पत्र आपल्याला द्यायला सांगितलं आहे.

**शिवानंद :** दे इकडे... ( पत्र पाहतो ) जा तू... ( रक्षक जातो )

**राजा :** काय वार्ता आहे ?

**शिवानंद :** राजकन्या सापडली !

**राजा :** मग कुठे आहे ती ?

**शिवानंद :** ती नगराच्या वेशीतून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात होती...आपल्या रक्षकांच्या हातात ती सापडली...आणि...आणि....

**राजा :** आणिक काय ?

**शिवानंद :** स्वतःच्या छातीत खंजीर खुपसून तिनं आत्महत्या केली.

**राजा :** काय मूर्ख पोरगी आहे ! जगण्यापेक्षा इतर क्षुद्र गोष्टींना महत्त्व देणारी माणसं या पृथ्वीवर वावरतात याचं नवल वाटतं मला...ठीक, तिच्या आत्म्याला शांती लाभो. म्हणजे ही दासी आहे. ठीक, नाही राजकन्या तर तिची दासी. हिला मी बरोबर घेऊन जातो. इकडची व्यवस्था लावून तू ताबडतोब शिबिरात ये. एवढी धुमाळी झाली पण तू मला मद्याच्या जवळ जाऊ दिलं नाहीस. आता माझी सहनशक्ती संपली आहे... मला तहान लागली आहे. आणि भूकही लागली आहे.

**शिवानंद :** स्वारीची व्यवस्था सिद्ध आहे, राजन्.

**राजा :** आणि तू लौकर ये. सूर्यास्त झाल्याबरोबर सर्व सैनिकांच्या समोर मी तुला पारितोषिक देऊन तुझा गौरव करणार आहे. मी तर मेण्यातून उतरलोच नाही, पण आमचे सगळे भीमभैरवही शिलाहाराचा व्यूह पाहून थरथरायला लागले होते. केवळ तू होतास म्हणून आम्ही जिंकलो...

**शिवानंद :** राजन्, पारितोषिक मी इथेच मागितलं तर द्याल ?

**राजा :** देईन ! वाटेल ते माग.

**शिवानंद :** कोणतेही ?

**राजा :** कोणतंही ! माझ्या प्राणाशिवाय...

**शिवानंद :** आभारी आहे. राजन्, ही दासी मला हवी आहे.

**राजा :** ही दासी ? पण शिवा...

**शिवानंद :** आपण वचन दिलंय, राजन्.

अंक पहिला / २७

**राजा :** आणि मी ते पाळीनही. पण हीच का ? तू विद्वान आहेस, आणि ही पुस्तकात सापडली म्हणून ?

**शिवानंद :** मला आवडली आहे ती.

**राजा :** ठीक, आज मी तुला काही नाकारू शकत नाही. मी हिला तुझ्या स्वाधीन करतो. पण एका... नाही... दोन अटींवर... त्या तुला मान्य असल्या तरच...

**शिवानंद :** सांगा, राजन्. मी मान्य करीन.

**राजा :** तुझी मागणी मी मानतो. त्याप्रमाणे जेव्हा कधी मी एखादी मागणी तुझ्याकडे करीन... कोणतीही... ती तूही मानली पाहिजे.

**शिवानंद :** ( सस्मित ) मानीन.

**राजा :** शब्द ?

**शिवानंद :** शब्द !

**राजा :** दुसरी अट. या दासीवर माझाही जीव जडला आहे. आपल्यापेक्षा ही बाई कुठे तरी उंचावर आहे असं वाटतं. हा तिचा चेहरा...
( हातांनी धरीत ) पाहा बारकाईनं. बुद्धिवान, सालस आणि तुझा आवडता शब्द... सुसंस्कृत. अशा बायांशी माझा संबंधच कधी आला नाही. ज्या भेटल्या त्या सगळ्या बिनडोक, अर्धा दिवस आरशात आणि अर्धा गव्हाणीत घालवणाऱ्या गुळगुळीत कातडीच्या बारदानात बांधलेल्या निव्वळ मांसाच्या बाहुल्या.... आमच्या महाराणी महाशया ! वा ! ते प्रकरण तर विचारायलाच नको. माणसांची जात किती अडाणी, मूर्ख आणि आपमतलबी असू शकते...हे पाहण्यासाठी ब्रह्मदेवानं केलेला एक प्रयोग ! म्हणूनच मी हा असा महागाढव राहिलो आहे. शेवटी 'या बायका पुरुषांना फक्त आपल्या बिछान्यातच नाही तर आपल्या सांस्कृतिक पातळीवरही ओढतात. क्षणाचं सुख देतात आणि अनंत काळचे मूर्ख करून सोडतात. ही वेगळी आहे. बघ हिची मुद्रा.... हिचे डोळे .. चेहऱ्यावरचा भाव. अशी राणी मला मिळाली असती तर घोड्यांच्या तबेल्यातून मी केव्हाच बाहेर पडलो असतो. पण तुला ती आवडली आहे ठीक आहे... तू इतका बुद्धिवान आणि पंडित आहेस की अशा बायकांची तुला काहीच गरज नाही. पण आज तुझं मन मी मोडणार नाही. मी ही तुला देतो...पण मुदतीच्या करारावर. आजपासून सहा महिन्यांनंतर, बरोबर सहा महिन्यांनंतर, ही माझ्याकडे आली पाहिजे, आणि माझी झाली पाहिजे. ही माझी दुसरी अट. मान्य आहे ?

**शिवानंद :** मान्य आहे.

**राजा :** शब्द ?

**शिवानंद :** होय, शब्द !

**राजा :** ठीक... ( जायला निघतो ) पण लक्षात ठेव... पुस्तक चांगलं आहे, पण इथेच वाचीत बसू नकोस. मी तुझी तिकडे वाट पाहतोय. तुझ्या शिबिरात तिला पाठवून

दे. आणि राजवाड्यातील द्रव्य...

**शिवानंद :** तुम्ही चिंता करू नका राजन्. रक्षक ! ( रक्षक येतो ) चलावं, महाराज.

**राजा :** ( जाताना पुन्हा मागे वळून ) ए दासी, माझ्या मित्राच्या स्वाधीन मी तुला करतो आहे. लक्षात ठेव... तू म्हणजे फक्त एक पारितोषिक आहेस, मी माझ्या महामंत्र्याला दिलेलं. पारितोषिकानं पारितोषिकासारखंच वागलं पाहिजे... चल शिवा... मद्याच्या सोबतीविना हा सारा शीण आता मला असह्य झाला आहे...

( राजा, शिवानंद, रक्षक जातात. तरुणी एका आसनावर स्तब्ध बसते, बाहेर राजस्वारी निघाल्याच्या तुताऱ्या इ. )

( क्षणभराने दार वाजते, शिवानंद आत येतो. तरुणी उभी राहते. )

**शिवानंद :** ( क्षणभराने ) राजकन्येचं नाव मला कळेल ?

**तरुणी :** लीलावती. पण मी राजकन्या नाही. मी फक्त एक पारितोषिक आहे. राजानं तुम्हाला दिलेलं.

**शिवानंद :** ( सस्मित ) आणि तुझी संमती आहे ?

**लीलावती :** पारितोषिकानं पारितोषिकासारखं वागायचं असतं. माझ्या संमतीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**शिवानंद :** ( हसतो ) लीलावती, मी राजा नाही. आणि स्त्रियांचं प्रेम मी पारितोषिका-सारखं मानतो, त्यांचं शरीर नाही.

**लीलावती :** आणि तरीही तुम्ही राजाचे मित्र आहात.

**शिवानंद :** मी त्यांचा सेवक आहे.

**लीलावती :** अशा माणसाची सेवा करण्यात तुम्हाला आनंद वाटतो ?

**शिवानंद :** मला माझं काम करण्यात आनंद वाटतो.

**लीलावती :** मला तुम्ही वाचवलंत... का ?

**शिवानंद :** कुणास ठाऊक ! सगळ्या प्रश्नांची उत्तरं मी शोधीत नाही.

**लीलावती :** सैनिकानं काय निरोप आणला होता ?

**शिवानंद :** ( हसतो ) मी सांगितला तो नव्हे.

**लीलावती :** माझ्यासाठी खोटं बोललात ?

**शिवानंद :** ( हसूनच ) लीलावती, खरं काय आणि खोटं काय, हेही मला नीट उमगलेलं नाही. एखाद्या क्षणी जे मला मनापासून करावंसं वाटतं, ते मी करतो आणि त्या क्षणापुरते तेच खरं असतं. पण आपण फारच गहन बोलतो आहोत.

**लीलावती :** क्षमा करा मला.

**शिवानंद :** राजकन्येनं क्षमा मागायची नसते.

**लीलावती :** मी राजकन्या नाही, दासी आहे.

**शिवानंद :** मुद्रिकेची साक्ष माझ्याजवळ आहे.

**लीलावती :** असेलही. पण जी राजकन्या होती ती सैनिकांच्या ताब्यात सापडली आणि तिनं आत्महत्या केली.

**शिवानंद :** पण ते खरं नव्हतं.

**लीलावती :** कुणास ठाऊक ! खऱ्याखोटयातला भेद मलाही नीटसा उमगलेला नाही. राजकन्या मेली आणि तुमच्या समोर उभी आहे ती तिची दासी... लीलावती. आणि आणि मी कोण आहे हे अखेरी मीच ठरवायचं आहे... सहा महिन्यांची अट तुम्ही मान्य केलीत... का ?

**शिवानंद :** कारण सहा महिनेच काय, पण सहा क्षणही तू माझ्याजवळ राहू नयेस आणि राहणार नाहीस, असं मला वाटलं म्हणून

**लीलावती :** म्हणजे ?

**शिवानंद :** म्हणजे तू या क्षणी मुक्त आहेस, राजकन्ये. तू ताबडतोब एखाद्या विश्वासातील मानकऱ्याकडे जा आणि आमची सेना परत जाईपर्यंत तेथे लपून राहा. तुझ्या बरोबर रक्षक देण्याचीही व्यवस्था मी करीन... तुला काहीही काळजी करायचं कारण नाही. तू तुझ्या माणसांत सुखी राहशील.

**लीलावती :** तुम्ही खोटेपणाची परमावधी करीत आहात. राजाला सांगितलंत तेही खोटंच होतं ?

**शिवानंद :** काय सांगितलं ?

**लीलावती :** ( थांबून ) ही मला आवडली म्हणून. तेही खोटंच होतं ?

**शिवानंद :** नाही .. ते खरं होतं, आणि आहेही. पण राजाला ते मी सांगितलं ते तुझ्या मुक्ततेसाठी. मी रक्षकाला हाक मारतो...

**लीलावती :** थांबा ! मी जाणार नाही.

**शिवानंद :** जाणार नाहीस ?

**लीलावती :** हा नवा जन्म मला तुम्हीच दिला आहे. तुम्ही धिक्कारणार नसाल तर मी तुमच्याबरोबर येणार आहे. ( किंचित हसत ) राजाला तुम्ही शब्द दिला आहे, मी हिला घेऊन जाईन म्हणून.

**शिवानंद :** राजाला, तुला नव्हे.

**लीलावती :** शब्द कोणालाही दिलेला असला तरी पाळला पाहिजे. तुम्ही आणि मीही.

**शिवानंद :** राजकन्ये, तुझ्या माणसांत तू सुरक्षित राहशील.

**लीलावती :** राजकन्या मेली. मी दासीसंबंधी बोलते आहे.

**शिवानंद :** तू माझ्याकडे यायला तयार आहेस ?

**लीलावती :** फक्त तुमच्याकडेच. नाहीतर मृत्यूकडे

**शिवानंद :** तुला माहीत नसेल, पण विवाह करायचा नाही, असा माझा संकल्प आहे.

**लीलावती :** मी विवाहाचं बोललेच नाही.

दे. आणि राजवाड्यातील द्रव्य...

**शिवानंद :** तुम्ही चिंता करू नका राजन्. रक्षक! (रक्षक येतो) चलावं, महाराज.

**राजा :** (जाताना पुन्हा मागे वळून) ए दासी, माझ्या मित्राच्या स्वाधीन मी तुला करतो आहे. लक्षात ठेव... तू म्हणजे फक्त एक पारितोषिक आहेस, मी माझ्या महामंत्र्याला दिलेलं. पारितोषिकानं पारितोषिकासारखंच वागलं पाहिजे... चल शिवा... मद्याच्या सोबतीविना हा सारा शीण आता मला असह्य झाला आहे...

(राजा, शिवानंद, रक्षक जातात. तरुणी एका आसनावर स्तब्ध बसते, बाहेर राजस्वारी निघाल्याच्या तुताऱ्या इ.)

(क्षणभराने दार वाजते, शिवानंद आत येतो. तरुणी उभी राहते.)

**शिवानंद :** (क्षणभराने) राजकन्येचं नाव मला कळेल?

**तरुणी :** लीलावती. पण मी राजकन्या नाही. मी फक्त एक पारितोषिक आहे. राजानं तुम्हाला दिलेलं.

**शिवानंद :** (सस्मित) आणि तुझी संमती आहे?

**लीलावती :** पारितोषिकानं पारितोषिकासारखं वागायचं असतं. माझ्या संमतीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

**शिवानंद :** (हसतो) लीलावती, मी राजा नाही. आणि स्त्रियांचं प्रेम मी पारितोषिकासारखं मानतो, त्यांचं शरीर नाही.

**लीलावती :** आणि तरीही तुम्ही राजाचे मित्र आहात.

**शिवानंद :** मी त्यांचा सेवक आहे.

**लीलावती :** अशा माणसाची सेवा करण्यात तुम्हाला आनंद वाटतो?

**शिवानंद :** मला माझं काम करण्यात आनंद वाटतो.

**लीलावती :** मला तुम्ही वाचवलंत... का?

**शिवानंद :** कुणास ठाऊक! सगळ्या प्रश्नांची उत्तरं मी शोधीत नाही

**लीलावती :** सैनिकानं काय निरोप आणला होता?

**शिवानंद :** (हसतो) मी सांगितला तो नव्हे.

**लीलावती :** माझ्यासाठी खोटं बोललात?

**शिवानंद :** (हसूनच) लीलावती, खरं काय आणि खोटं काय, हेही मला नीट उमगलेलं नाही. एखाद्या क्षणी जे मला मनापासून करावंसं वाटतं, ते मी करतो आणि त्या क्षणापुरते तेच खरं असतं. पण आपण फारच गहन बोलतो आहोत.

**लीलावती :** क्षमा करा मला.

**शिवानंद :** राजकन्येनं क्षमा मागायची नसते.

**लीलावती :** मी राजकन्या नाही, दासी आहे.

**शिवानंद :** मुद्रिकेची साक्ष माझ्याजवळ आहे.

**लीलावती :** असेलही. पण जी राजकन्या होती ती सैनिकांच्या ताब्यात सापडली आणि तिनं आत्महत्या केली.

**शिवानंद :** पण ते खरं नव्हतं.

**लीलावती :** कुणास ठाऊक ! खऱ्याखोट्यातला भेद मलाही नीटसा उमगलेला नाही. राजकन्या मेली आणि तुमच्या समोर उभी आहे ती तिची दासी... लीलावती. आणि आणि मी कोण आहे हे अखेरी मीच ठरवायचं आहे... सहा महिन्यांची अट तुम्ही मान्य केलीत... का ?

**शिवानंद :** कारण सहा महिनेच काय, पण सहा क्षणही तू माझ्याजवळ राहू नयेस आणि राहणार नाहीस, असं मला वाटलं म्हणून

**लीलावती :** म्हणजे ?

**शिवानंद :** म्हणजे तू या क्षणी मुक्त आहेस, राजकन्ये. तू ताबडतोब एखाद्या विश्वासातील मानकऱ्याकडे जा आणि आमची सेना परत जाईपर्यंत तेथे लपून राहा. तुझ्या बरोबर रक्षक देण्याचीही व्यवस्था मी करीन... तुला काहीही काळजी करायचं कारण नाही. तू तुझ्या माणसांत सुखी राहशील.

**लीलावती :** तुम्ही खोटेपणाची परमावधी करीत आहात. राजाला सांगितलंत तेही खोटंच होतं ?

**शिवानंद :** काय सांगितलं ?

**लीलावती :** ( थांबून ) ही मला आवडली म्हणून. तेही खोटंच होतं ?

**शिवानंद :** नाही .. ते खरं होतं, आणि आहेही. पण राजाला ते मी सांगितलं ते तुझ्या मुक्ततेसाठी. मी रक्षकाला हाक मारतो...

**लीलावती :** थांबा ! मी जाणार नाही.

**शिवानंद :** जाणार नाहीस ?

**लीलावती :** हा नवा जन्म मला तुम्हीच दिला आहे. तुम्ही धिक्कारणार नसाल तर मी तुमच्याबरोबर येणार आहे. ( किंचित हसत ) राजाला तुम्ही शब्द दिला आहे, मी हिला घेऊन जाईन म्हणून.

**शिवानंद :** राजाला, तुला नव्हे.

**लीलावती :** शब्द कोणालाही दिलेला असला तरी पाळला पाहिजे. तुम्ही आणि मीही.

**शिवानंद :** राजकन्ये, तुझ्या माणसांत तू सुरक्षित राहशील.

**लीलावती :** राजकन्या मेली. मी दासीसंबंधी बोलते आहे.

**शिवानंद :** तू माझ्याकडे यायला तयार आहेस ?

**लीलावती :** फक्त तुमच्याकडेच. नाहीतर मृत्यूकडे

**शिवानंद :** तुला माहीत नसेल, पण विवाह करायचा नाही, असा माझा संकल्प आहे.

**लीलावती :** मी विवाहाचं बोललेच नाही.

**शिवानंद :** आणि दुसरी अट... सहा महिन्यांनी...

**लीलावती :** सहा महिन्यांत सगळी पृथ्वीही नष्ट होऊ शकेल. कुणी सांगावं ? मी फक्त या क्षणाचा विचार करते आहे. हा माझा हात... स्वीकारा किंवा खड्गानं कापून टाका. मी दोन्हीला तयार आहे.

**शिवानंद :** ( तिला आवेगाने जवळ घेतो ) लीलावती !

पडदा

**अंक पहिला समाप्त**

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

राजवाडा
वेळ सकाळची
राणीचा महाल
राणी मंचकावर बसलेली
जवळ पलीकडे एक दासी उभी.

**राणी :** हे पाहा, मी पुन्हा सांगते, राज्यात महाराजांचा अधिकार असेल, पण या राजवाड्यात आणि त्यातही येथील रसोईघरात, सर्वाधिकार आहे तो माझा... महाराणीचा.

**दासी :** होय महाराणी.

**राणी :** तर हे लक्षात ठेव, सर्व आचाऱ्यांना बजावून सांग, आज मला मांसाहार चालायचा नाही. मी माझ्या पिताजींच्या घरी होते, तेव्हापासून माझा हा नियम आहे, श्रावणातल्या पहिल्या सोमवारी उपास करायचा. संपूर्ण उपास.

**दासी :** होय, पण आपण थोडंतरी दूध प्यावं अशी विनंती आहे.

**राणी :** चालेल, तुझा आग्रह असेल तर दूध घेईन. अगदी भरपूर घेईन. तेसुद्धा नुसतं नको, आटवलेलं, आणि नुसतं आटवलेलंही नको. त्याला चव ना ढव ! म्हणावं, त्यात बदाम, पिस्ते, खारका, बेदाणा आणि शर्करा भरपूर घाला.

**दासी :** होय, महाराणी. फक्त दूधच ना ?

**राणी :** वेडीच आहेस ! उपास नुसत्या दुधावर निभावतो ?

**दासी :** मग थोडा फलाहार...

**राणी :** फलाहार तर आहेच. आणि थोडा का म्हणून ? उपास म्हणजे काही चेष्टा नाही. नीट ऐक, दहा संत्री, दहा मोसंबी, दहा आंबे आणि दहा पेरू यांचं मिश्रण करा म्हणावं आणि ते सारं साखरलेल्या मलईमध्ये मुरत ठेवा.

**दासी :** मी सांगते आचाऱ्यांना. दूध आणि फलहार एवढंच ना ?

**राणी :** मूर्ख आहेस ! एवढंच कसं ? मी काही भटीण नाही एखादी. महाराणी आहे. महाराणीच्या उपासाला एवढंच ?

**दासी :** आज्ञा द्यावी आपण.

**राणी :** राजगिऱ्याचे मोदक, खव्याच्या वड्या... हे तर गृहीतच धरायचं. पण मांसा-

हार अजिबात चालणार नाही, असं तुझं मत आहे?

**दासी** : नाही, पण आपली इच्छा असेल तर. . .

**राणी** : मुळीच नाही! वर्षातून एक दिवस देखील संयम ठेवायचा नाही, असं तू म्हणतेस?

**दासी** : नाही. . . महाराणी, मी तसं म्हणत नाही. . .

**राणी** : ( प्रेमळ स्वरात ) अग म्हण की! मनात आलं की माणसानं स्वच्छ बोलून टाकावं. तुला असं म्हणायचं आहे का, थोडासा मांसाहारही मी करावा?

**दासी** : आपण म्हणाल तर—

**राणी** : माझा म्हणण्याचा प्रश्न नाही! तुझा आग्रह असेल तर मी नाही म्हणणार नाही. कुणाचं मन मोडणं मला आवडत नाही... आणि काल मी आपल्या पुरोहितांना विचारलं तर ते म्हणाले, ही सारी उपासतापासांची आणि निषेधांची थोतांडं, या श्रमणांच्या पंथांनी उभी केली आहेत. म्हणाले, पूर्वीच्या काळी, यज्ञयाग करणारे ऋषिमुनी सुद्धा मांसाशन करीत होते. मग तूच सांग, जे ऋषींना चाललं ते माझ्यासारख्या क्षात्रकन्येला चालू नये? तूच विचार कर, मनन कर, चिंतन कर. एकदम नाही म्हणण्याइतका हा प्रश्न सोपा नाही.

**दासी** : ठीक आहे, महाराणी, आज महाराजांसाठी ससे आणलेले आहेतच.

**राणी** : आनंदून ( टाळी वाजवीत ) ससा! ससा! किती शहाणी आहेस तू! उपासाला ससा चालतो, म्हणजे चाललाच पाहिजे.

**दासी** : पण तो मांसाहार. . .

**राणी** : तुला काही कळत नाही. ससे कधी मांसाहारी असतात? बिचारे गवताचे कोंब आणि झाडांची कोवळी पानं फक्त खातात. म्हणजे ससा हा संपूर्ण शाकाहारी. एक ससा म्हणजे संपूर्ण शाकाहारानं भरलेली थैली. चालेल. . . तोही चालेल.

**दासी** : मग मासेही चालतील?

**राणी** : अर्थात, चालतीलच. वाघ, सिंह, लांडगे, कोल्हे इत्यादिकांशिवाय काहीही चालेल. पण बाकी काही नको. उपासाला संयम ठेवला पाहिजे. फक्त सशाचं मांसोदन करायला सांग. जा. . .तू. . .महाराजांसाठी काय वाटेल ते करा म्हणावं, पण माझ्यासाठी एवढंच. जा. . . मला आता उपासामुळे झोप यायला लागली आहे. . . उपास म्हणजे काही गंमत नाही. . . जा.

( मंचकावर अंग टाकते. )

**दासी** : आज्ञा महाराणी. ( जाऊ लागते )

**राणी** : ( एकदम उठून बसते ) थांब. . .

**दासी** : ( मागे येते ) महाराणी,

**राणी** : तो शिवानंद राजवाड्यात आहे की—

**दासी :** थोड्या वेळापूर्वी महामंत्री वाड्यातून बाहेर गेले.
**राणी :** जगातून बाहेर जातील तो सुदिन !
**दासी :** महाराणी . . .
**राणी :** काय मेल्यानं उच्छाद मांडलाय ! महामंत्री 'झाल्यापासून, आणि ती शिलाहाराची लढाई जिंकल्यापासून, तो समजतो की आपणच या राज्याचे स्वामी ! महाराज त्याच्याबरोबर गेले असतील. ..
**दासी :** हो. . . गेले आहेत.
**राणी :** डोंबाऱ्यानं माकडाला नाचवावं तसं तो नाचवतोय महाराजांना. नाचवू दे. मला काय करायचंय त्याच्याशी ! म्हणे, देश दुष्काळाच्या जबड्यात सापडला आहे... म्हणून काटकसर करा. या वाड्यातसुद्धा. तुला ठाऊक नाही, त्यानं राजवाड्यात आपले हेर पेरून ठेवले आहेत. मला कळलंय. मी सम्राटाची कन्या आहे. या लोकांच्या चाली मला समजतात. इथे काडी पडली तरी तिचा आवाज त्याच्या कानावर जातो, मी उपासासाठी सशाचं मांस घेतलं हे देखील कळेल त्याला.
**दासी :** नाही, महाराणी, मी स्वैपाक्यांना आणि वाढप्यांना सूचना देईन.
**राणी :** बजावून सांग. मी काय खाते, काय पिते, हे त्या मेल्याला कळता कामा नये. लक्षात आलं ? काटकसरीच्या नावाखाली तो आता रसोईघरालाही आदेश देऊ लागला आहे.
**दासी :** मी काळजी घेईन, महाराणी.
**राणी :** मग जा आता. . . मला झोप आली आहे. सर्व उपासाचं तयार झालं की मलाताबडतोब कळव.
**दासी :** आज्ञा महाराणी
**राणी :** ( मंचकावर पडताना ) जा. . . तुझ्या आग्रहामुळे मी सशाचं मांसान्न घेणार आहे. पण ती वार्ता माझ्याशिवाय किंवा त्या सशाशिवाय इतर कोणालाही कळता कामा नये. जा.... ( दासी जाते. )
**राणी :** ( डोळे मिटताना ) देवाची कृपा, हा उपास वर्षातून एकदाच येतो.

अंधार

# अंक दुसरा

## प्रवेश दुसरा

शिवानंदाचे निवासस्थान
वेळ रात्रीची. अनेक दिवे पेटलेले.
लीलावती एका आसनावर बसून वीणेच्या तारा छेडीत आहे.
रंधवा आतून हलकेच येतो आणि बाजूला उभा राहतो.
लीलावती हसून त्याच्याकडे वळते. आणि—

**लीलावती :** तारेचा झंकार ऐकल्याबरोबर तू इकडे आलास... खरं ना!

**रंधवा :** ( हे आणि यापुढील सर्व बोलणे खुणांनी ) हो.

**लीलावती :** निःशब्द, तुझं नाव मी काय ठेवलंय, माहीत आहे?

**रंधवा :** नाही.

**लीलावती :** तुझं नाव ठेवलंय, आतापी.

**रंधवा :** म्हणजे?

**लीलावती :** घार पक्षी पाहिला आहेस?

**रंधवा :** हो.

**लीलावती :** त्याचा शब्द ऐकला आहेस?

**रंधवा :** ( आठवून ) नाही.

**लीलावती :** मीही नाही ऐकला. इतर सारे पक्षी– कोणी गातात, कोणी किलबिलतात, तर कोणी चिवचिवतात. पण घार कधीच नाही. ती नेहमी उंच आभाळात फिरते, हवेवर झोके घेते. पण नजर मात्र सतत जमिनीवर खिळलेली. साबरीतून सरपटणारं सापाचं पिल्लूदेखील तिच्या नजरेतून सुटत नाही. ( हसते ) तसाच आहेस तू।

**रंधवा :** ( खेदाने ) मी?

**लीलावती :** ए वेडया, मी कौतुकानं म्हणतेय. तुझी नजर सगळीकडे असते, म्हणून तर स्वामींना कसलीही काळजी वाटत नाही परवाच ते म्हणत होते, मी राज्याचा महामंत्री आहे, पण माझा महामंत्री तो निःशब्द आहे. फार प्रेम आहे त्यांचं तुझ्यावर.

**रंधवा :** तसं नाही. माझं त्यांच्यावर आहे.

**लीलावती :** फक्त तुझं त्यांच्यावर? ( तार छेडत )...खरं आहे, तू म्हणतोस ते... त्यांचं प्रेम कुणावरही, कशावरही नाही. शंभर सरोवरं चंद्राचं बिंब छातीशी कवटाळतात पण तो सर्वांनाच दूरचा असतो... ( तार झंकारीत ) हा झंकार तुला ऐकू आला?

**रंधवा** : हो.

**लीलावती** : इतकं बारीकही तुला ऐकू येतं. आणि तरीही बोलता येत नाही... पूर्वी बोलता येत होतं का ?

**रंधवा** : होय. बऱ्याच्च काळापूर्वी.

**लीलावती** : आणि तुझी वाणी अचानक गेली ?

**रंधवा** : हो.

**लीलावती** : कशामुळे ?

**रंधवा** : ( मान खाली घालतो )

**लीलावती** : बरं, नाही विचारीत. ( तार छेडीत ) स्वामींकडे येऊन तुला किती दिवस झाले ?

**रंधवा** : सहा महिने.

**लीलावती** : म्हणजे तुझ्या पाठोपाठच मी आले की ! पण एवढ्या काळात तू स्वामींच्या किती जवळ गेला आहेस ! ( झंकार ) निःशब्द, मी स्वामींना आवडते का रे ?

**रंधवा** : फार ! तुमच्या गाण्यावर फार खूश आहेत ते.

**लीलावती** : ( हसते ) वेड्या, मी गाण्याचं नाही विचारलं.

[ शिवानंद येतो ]

**शिवानंद** : होय होय... गाणारीही आवडते.

**लीलावती** : ( उठते ) खरंच ?

**शिवानंद** : गाणं आवडतं आणि गाणारी आवडत नाही, असं कधी होईल का ? गाण्यातूनच गाणारी प्रगट होत असते.

[ रंधवा त्याच्या अंगावरील शाल काढून ठेवतो... नंतर कमरेचा कट्यारपट्टाही... ]

**शिवानंद** : रंधवा, सकाळी सांगितलेले सगळे पाठ वाचलेस ?

**रंधवा** : होय.

**शिवानंद** : शाबास ! वाणी नसली तरी आणखी एक वर्षाच्या आत तुला मी पंडित करून टाकीन. जा आता... आणि द्वारपालाला निरोप दे, आता कोणालाही मी भेटणार नाही. आज फार शिणलो आहे मी. जा... ( रंधवा जातो )

**लीलावती** : स्वामी फार काम करतात ! इतकं करायलाच हवं !

**शिवानंद** : प्रत्येक जागेची काही कामं ठरलेली असतात. ती करायलाच हवीत... पण सहवासानं आणि गाण्यानं माझा सगळा शीण उतरतो .. बैस. लीलावती, आणि म्हण एखादं गाणं...

[ तिला आसनावर बसवतो ]

**लीलावती** : ( तार छेडीत ) खरंच माझं गाणं इतकं आवडतं स्वामींना ? मी काही अभिजात गायनात पारंगत असलेली गायिका नव्हे !

**शिवानंद :** ( तिच्या पाठीमागे उभा, तिच्या खांद्यावर हात ठेवून ) तसं गाणं इथं कुणाला हवंय ? डोक्यातून निघणारे ते स्वरांचे संगमरवरी महाल...मला आवडतातही. पण अशा वेळी नाही. फक्त एक घरगुती गाणं... काळजातून निघालेलं आणि काळजापर्यंत पोचणारं... म्हण...

**लीलावती :** ( झंकारत ) म्हणते... पण एक आधी विचारू का ? आज्ञा असेल तर...

**शिवानंद :** ( हसून ) मला माहीत आहे तू काय विचारणार आहेस ते.

**लीलावती :** काय ?

**शिवानंद :** तुमचं माझ्यावर प्रेम आहे की नाही ? होय ना ? पण आजच का हा प्रश्न ?

**लीलावती :** कुणास ठाऊक ! उगाच वाटतं, काहीतरी घडणार आहे... म्हणून धीर केला... !

**शिवानंद :** सहा महिने केव्हाच संपून गेले. राजाला त्याची आठवणही नाही. पण तू म्हणालीस तर, तुला शिलाहारला पाठवून देईन मी !

**लीलावती :** ( हसते ) माझं पूर्वीचं सारं जगणं केव्हाच जळून गेलंय... पण माझ्या प्रश्नाचं उत्तर नाही दिलंत आहे प्रेम ?

**शिवानंद :** ( बाजूला जातो ) खरंच सांगू ? प्रेम ही कल्पना मला फार दूरची वाटते, लीलावती. क्षितिजासारखी... कितीही शोधलं तरी सापडत नाही... मला वाटतं कधीच सापडणार नाही. पण प्रेमाच्या अलीकडच्या तळावर आवडणं नावाची एक भावना असते. तिथपर्यंत मी जाऊ शकतो... ( जवळ येतो ) आणि तू मला आवडतेस... फार फार आवडतेस.

**लीलावती :** स्वामींना अनेक गोष्टी आवडतात. शंभर रानडुकरांच्या शिकारीपासून राजाच्या सेवेपर्यंत. त्यांतलीच मी एक.

**शिवानंद :** ( हसतो ) फार अवघड प्रश्न विचारलास... पण मला वाटतं, जनावराची शिकार आवडणं, मद्याचा घोट आवडणं, पक्वान्नाचा घास आवडणं, कोणाची सेवा आवडणं... यापेक्षा स्त्रीपुरुषांचं परस्परांचं आवडणं फार वेगळं असतं. किंबहुना प्रत्येक आवडण्याला स्वतःची सीमा आणि स्वतःचं रूप असतं. पण स्त्रीपुरुषांचं आवडणं हे एक असं आहे की जे माणसानं नव्हे तर पृथ्वीनं निर्माण केलं आहे. म्हणून त्याला कोणतंही बंधन नाही, कोणताही नियम नाही आणि कोणतंही उद्दिष्ट नाही. पुनवेच्या चांदण्यासारखं ते फक्त अंगावर घ्यायचं आणि काळजात साठवायचं असतं... किती, कोठपर्यंत, कशासाठी हे सारे प्रश्न तिथे अर्थशून्य होतात.

**लीलावती :** ( हसत ) प्रश्नापेक्षाही उत्तर अधिक अवघड आहे !

**शिवानंद :** ( हसत ) म्हणून ज्या प्रश्नांना उत्तरं संभवत नाहीत असे प्रश्न माणसानं विचारू नयेत. विचारले तर खोटी, बनावट उत्तरं स्वीकारायची तयारी पाहिजे.

**लीलावती :** तात्पर्य एवढंच की मी फक्त तुम्हाला आवडते. रानडुकराच्या शिकारी-पेक्षा जरा जास्त... हे नक्कीच समाधान आहे. पण हे समाधान अनेकजणींना मिळालेलं असेल, आजही मिळत असेल...

**शिवानंद :** ( स्मित ) शक्य आहे ! लीलावती, स्त्रीत्व जेव्हा सुंदर असतं तेव्हा या जगात त्याच्याइतकं सुंदर दुसरं काहीच असत नाही. हे स्त्रीत्व... देहाचं नव्हे, मनाचं... एकाच ठिकाणी संभवेल वा जाणवेल असं नाही. पण बहरलेल्या बागेत अनेक फुलं असली तरी मन एखाद्या फुलाच्या पाकळ्यांतच गुंतून पडतं... बंदिवान होतं... तसा मी बंदिवान झालो आहे... या माझ्या लाडक्या फुलामध्ये !

**लीलावती :** ( तारा झंकारीत ) मी तृप्त आहे. म्हणू का गाणं ?

**शिवानंद :** म्हण... शेवटी शब्दांपेक्षा स्वर आणि बोलण्यापेक्षा गाणंच अधिक काही सांगत असतं...

**लीलावती :** आज्ञा...

[ तारांचे झंकार. रंधवा घाईने प्रवेश करतो आणि शिवानंदाला खुणा करून काही सांगतो. ]

**शिवानंद :** ( एकदम उठून ) राजन आले ? इकडे येताहेत ?

**रंधवा :** हो.. ( बाहेर जातो )

**शिवानंद :** लीलावती, तू आत बैस. थोडा वेळ. महाराज आले आहेत... (लीलावती आत जाते त्याच क्षणी राजा उत्साहाने आत येतो.)

**राजा :** शिवा, तुझ्या द्वारपालानं सांगितलं, तू विश्रांती घेत आहेस म्हणून ! पण मित्रा, फार आनंदाची वार्ता मी घेऊन आलो आहे. ती तुझ्या विश्रांतीसाठी थांबू शकत नाही.

**शिवानंद :** कसली वार्ता ?

**राजा :** ( हसत आसनावर बसतो ) शिवा ! आपले धर्माध्यक्ष, प्रजेवर आणि राजा-वरही सत्ता गाजविणारे आपले मठाधीश, महंत स्वामी सत्यानंद हे कैलासवासी झाले आहेत !

**शिवानंद :** वारले ते ?

**राजा :** मूर्ख आहेस. अशी महान माणसं वारत नाहीत किंवा मरत नाहीत. ती कैलास-वासी तरी होतात किंवा वैकुंठवासी तरी होतात. हा म्हातारा कुठे गेला असेल ?

**शिवानंद :** आपण फक्त स्वर्गवासी म्हणू.

**राजा :** चालेल ! पण सगळा स्वर्ग जर अशा तिरप्या चालीच्या संतमहंतांनी आणि संन्याशांनी भरला असेल तर मी तरी नरकात जाणंच अधिक पसंत करीन. ( हसतो ) शिवा ! धर्माध्यक्ष कसे गेले तुला ठाऊक नाही अजून ! ( हसतो )

**शिवानंद :** ते आजारी असल्याचं मी ऐकलं नव्हतं.

**राजा :** म्हातारपणात आजार कशाला हवेत ? माणूस म्हातारा झाला की तो मृत्यूच्या

राज्याचाच रहिवासी होतो. मग कोणतंही निमित्त पुरतं... ( हसतो ) हा तुझा मठाधीश कोणीतरी सद्शिष्यानं टाकलेल्या केळाच्या सालीवर पाय घसरून पडला आणि तडक स्वर्गाला गेला. ( हसतो. ) सालीपासून स्वर्गापर्यंत! केळापासून कैलासापर्यंत! ( हसतो )

**शिवानंद** : राजन्, ही गोष्ट आनंद मानण्यासारखी नाही, आणि हसण्यासारखी तर नाहीच नाही.

**राजा** : शिवा, मला उगाच शहाणपणा शिकवू नकोस. सार्वजनिक रीत्या, राजसभेत, नगरसभेत, आपण पातेलंभर पाणी डोळ्यांतून गाळणारच आहोत, गहिवरणार आहोत, रडणार आहोत. पण व्यक्तिशः मला आनद होतोय, त्याला मी काय करू?

**शिवानंद** : आचार्य आपलं कर्तव्य करीत होते, राजन्.

**राजा** : राजाला छळण्याचं? किती वेळा त्यांनी मला नाकदुऱ्या काढायला लावल्या! गेल्या वर्षी आपण कुरणकर वाढवला तर केवढी हाकाटी केली त्यांनी! त्या शिकारीच्या प्रसंगी.... तू होतासच... माझ्या मानकऱ्यांनी त्या दोन जंगली जनावरांना ठार केलं. तर हे इतके खवळले की जणू त्यांच्या कफनीतूनच ती जनावरं बाहेर पडली होती. शेवटी त्या मानकऱ्यांना प्रायश्चित्त घ्यावं लागलं. तू सांगितलंस, म्हणूनच तो राजसत्तेचा अपमान मी सहन केला

**शिवानंद** : राजन्, आचार्यांसारखे संत देवसत्तेचे प्रतिनिधी असतात. ती अखेरची असते. . . राजसत्तेच्याही पलीकडची.

**राजा** : ( हसतो ) तू महंताची भाषा बोलायला लागलास! कोणत्या देवाची सत्ता? तुम्ही दिवसरात्र भजनं करून ज्यांचं डोकं उठवता, त्या सूर्याची! शिवा, हे गौडबंगाल मला कधीच उमजलं नाही. तुम्ही पंथीय लोक एका बाजूला, देव निरंकारी, निर्गुण इत्यादी इत्यादी म्हणता, आणि दुसऱ्या बाजूला सूर्याची पूजा-अर्चा करता. चांगला गाभण गाईच्या पोटासारखा गोलगरगरीत दिसणारा सूर्य, तो काय निराकार आहे– आणि दुपारी माणसाला निखाऱ्यात भाजणारा सूर्य– तो काय निर्गुण आहे?

**शिवानंद** : ( स्मित ) सूर्य हे केवळ प्रतीक आहे, राजन्.

**राजा** : प्रतीक? प्रतीक काय असतं?

**शिवानंद** : जे निराकाराला आकार देतं, अप्रत्यक्षाला प्रत्यक्ष करतं, आणि अमर्यादाला मर्यादा घालतं ते प्रतीक.

**राजा** : बाप रे! एक शब्द कळला असेल तर शपथ! पण शिवा, तुमचा देव मुळात निर्गुण, निराकार असेल तर तो सत्ता काय गाजवणार कपाळ? सगळा घोळ! शब्दांचा कापूस पिंजून भोळ्याभाबड्यांना आणि मूर्खांना नादी लावण्याचा उद्योग. आमचे पणजोबा अकलेने जरा अधूच होते.

**शिवानंद** : ते पणजोबा कधीच गेले, राजन्. आपण आचार्यांबद्दल बोलतो आहोत

**राजा :** ( उठून ) मरू दे तो आचार्य. मला आज काहीतरी चांगलं बोलायला सुचतंय्. शिवा, तुमचा हा निराकार देव काही खरा नाही. ज्याला काही देता येत नाही तो देव कसला ? जो कणभर घेतो आणि मणभर देतो तो खरा देव. आपले पौराणिक देव पाहा... कुणाला चार हात, कुणाला सहा, तर कुणाला बारा... अठराही. कशासाठी इतके हात ? भरपूर देता यावं म्हणून. थोडे भाताचे पिंड द्या... चारसहा बकरी मारा... सोन्यामोत्याचे चार दागिने चढवा... बस... तेवढ्यात तृप्त होऊन तुम्हाला त्रिखंडाचं राज्य देतील, देखण्या बायका देतील, तुमच्या शत्रूंचा संहार करतील हे सारे देव !... चांगलं बोललो की नाही ? खरं सांग... तुला वाटतं मी म्हणजे शुद्ध दगड आहे. पण मलाही काही कळतं....

**शिवानंद :** माणसाला जे कळणं आवश्यक आहे ते सारं तुम्हाला कळतं, राजन्. दगड असलोच तर आम्ही. कधीच न कळणाऱ्या गोष्टींचा पाठलाग करीत असतो, मूर्खांसारखा.

**राजा :** ठीक ! ठीक ! मी आता वाद करणार नाही. हे एवढ्या बोलण्यानंच माझ्या मेंदूला थकवा आलाय. मुद्दा हा आहे की धर्माध्यक्ष तुझ्या म्हणण्यानुसार स्वर्गवासी झाले. प्राकृतात म्हणायचं तर मेले. आणि आपल्यापुढे एक प्रचंड प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे.

**शिवानंद :** आपल्या परंपरेप्रमाणे नवीन धर्माध्यक्ष नेमण्याचा अधिकार सर्वस्वी राजाचा आहे.

**राजा :** आमच्या पणजोबांनी तेवढाच एक शहाणपणा दाखवला. पण शिवा ही निवड आज नव्हे आत्ताच व्हायला हवी. म्हणून असा धावत आलो मी तुझ्याकडे. नव्याची निवड झाल्यावरच–मृतावर अंत्यसंस्कार होऊ शकतात... त्या नवागताच्या हस्तेच !

**शिवानंद :** मठातील प्रमुख शिष्यांना आपण तावडतोब बोलावून घेऊ. सत्यानंदांनी कोणाला तरी वारस म्हणून नेमला असेल.

**राजा :** केळाच्या सालीनं घोटाळा केला. त्यांनी तसं काहीच केलेलं नाही. आणि प्रमुख शिष्यांसंबंधी म्हणशील तर तेच सगळे ही वार्ता कळवायला माझ्याकडे आले होते, सारेच मूर्ख आणि निकामी आहेत. एकीकडे कफन्यांच्या टोकांनी डोळे पुसत होते आणि दुसरीकडे परस्परांशी मांजरासारखे भांडत होते.

**शिवानंद :** मग आपण कोणालाही नेमू शकता.

**राजा :** मठाबाहेरच्या कोणालाही ?

**शिवानंद :** होय, राजन कोणालाही महंत होता येतं. मठातून बाहेर पडलेले अनेक पंडित आपल्या राजधानीत आहेत. उदाहरणार्थ आपले....

**राजा :** थांब ! माझा मेंदू पुन्हा जागा होऊन उठून बसला आहे ! मठात दीक्षा घेतलेल्या कोणालाही ?

**शिवानंद** : होय, राजन् कोणालाही.

**राजा** : माझ्या डोक्यात पटापट स्फोट होताहेत ! कोणालाही मध्ये असाही कोणी बसू शकेल...जो आज आश्रमात नाही, पण पूर्वी केव्हातरी होता ?

**शिवानंद** : ( संथ स्वरात ) होय...बसू शकेल.

**राजा** : ( स्वर चढवून ) जो आज राजकारणात आहे...?

**शिवानंद** : होय, तोही.

**राजा** : ( आनंदाने ओरडत ) जो आज माझा महामंत्री आहे ?

**शिवानंद** : राजन् !

**राजा** : ( हसतो-बेफाम ) घाबरलास ? ( हसणे एकदम आवरून कठोर गंभीर स्वरात ) बस्स...माझा हा ठाम निर्धार झाला ! (त्याचे खांदे पकडून ) शिवा ! तूच धर्माध्यक्ष, महंत व्हायला हवंस !

**शिवानंद** : ( मान खाली घालून स्तब्ध उभा राहतो. )

**राजा** : मूर्खा, विचार कसला करतोस ? आमच्या या राज्यामध्ये, राजापेक्षा धर्माध्यक्षाची आणि मुकुटापेक्षा भादरलेल्या डोक्यांची महती जास्त आहे...राज्यातलं सर्वांत मोठं पद आणि तेही तुझ्या प्रकृतीशी जुळणारं. शिवा, तू धर्माध्यक्ष झालास म्हणजे माझ्या डोक्याचा एक मोठा शीण संपेल. आपण एकमतानं काहीही करू शकू. ठरलं...तू धर्माध्यक्ष.

**शिवानंद** : राजन्, तुमचा हा विचार योग्य नाही. मी त्या पदाला पात्र नाही.

**राजा** : ( हसतो. ) हे सगळं संभाषण तुला महामंत्री केलं तेव्हा झालं होतं आणि तू महामंत्री झालास. शिवा, तुला काय धास्ती वाटते ते मी समजतो. मठाधीश झाल्यावर आपल्याला मद्य घेता येणार नाही, स्त्रियांना जवळ करता येणार नाही, अशी भीती वाटतेय तुला ! पण शिवा, तसं काहीही नाही. जे आज आपण करीत आहोत, ते उद्याही करीत राहू. बिनदिक्कत. शेवटी, पाप करण्यामध्ये नसतं तर ते करणं लोकांना कळण्यामध्ये असतं. ती दक्षता मी घेईन. जे चालत आहे तेच पुढे चालत राहील .

**शिवानंद** : राजन् क्षमा करा, पण ही आपली सूचना मी मान्य करू शकत नाही.

**राजा** : सूचना ? हा माझा आदेश आहे.

**शिवानंद** : राजन्, राजाची आणि ईश्वराची सेवा एकाच वेळी करणं मला शक्य होणार नाही. म्हणून मी आपल्याला प्राणपणानं विनंती करतो...

**राजा** : शिवा, मी शिलाहारच्या या दासीला तुझ्या स्वाधीन केलं, तेव्हा तू मला वचन दिलं आहेस, की तुझी कोणतीही एक मागणी मी मान्य करीन म्हणून. नाही दिलंस ?

**शिवानंद** : दिलं आहे.

**राजा** : मग हीच माझी मागणी आहे. आणि ती तू मान्य केली पाहिजेस. तू वचनभंग करणार नाहीस, माझी खात्री आहे.

**शिवानंद :** नाही करणार.

**राजा :** मग तू माझं म्हणणं मान्य केलंस, असं मी समजतो.

**शिवानंद :** आपण पुन्हा विचार करावा...

**राजा :** विचार संपला ! माझा निर्धार आहे. मागणी मान्य ?

**शिवानंद :** ( क्षणभराने ) हो मान्य.

**राजा :** ( आनंदाने बेहोष ) शिवा ! ( मिठी मारतो ) माझा शिवा ! माझा जिवलग मित्र... माझ्या काळजाचा तुकडा...माझा पाठीराखा...

**शिवानंद :** ( गंभीर ) मागच्या क्षणापर्यंत होतो. आता नाही.

**राजा :** हा तुझा नैतिक खोकला ! शिवा, क्षण काही आकाशातून पडत नाहीत. प्रत्येक पुढचा क्षण मागच्या क्षणाच्या पोटातून बाहेर येतो. त्याची सगळी मिळकत घेऊन ! ( हसतो ) सुंदर वाक्य आहे की नाही ? एकदा तूच म्हणाला होतास. ( हसतो ) वा वा ! आजच्या इतका बौद्धिक पराक्रम मी आयुष्यात कधीच केला नव्हता ! माझ्या तीन पूर्वजांना जमलं नाही ते मी केलं आहे. अधिकार असूनही त्यांनी तो कधी बजावला नाही. मठातले प्रमुख म्हणतील तो मठाधीश. एक साप मेला की दुसरा वारुळातून बाहेर यायचा !

**शिवानंद :** पण त्याची संमती आवश्यक असते.

**राजा :** तीही मी त्याच बैठकीत मिळवली. तुझं नाव लक्षात आलं नव्हतं, पण माझा माणूस नेमायचा, हे मी ठरवलं, आणि त्यांची संमती मिळवली. पांडित्याची लाली पांघरणाऱ्या या बैलांची संमती मिळवणं फार सोपं असतं, शिवा ! समोर चारा टाकायचा आणि मागे चाबूक वाजवायचा. सर्वांनी एकसाथ माना हालवल्या आणि हा निर्णय माझ्यावर सोपवला. शिवा, मला नेहमी असं वाटतं की तू म्हणजे माझ्या जगण्याचा अर्धा भाग आहेस. दोन देह पण प्राण एक. म्हणून आता संघर्ष संपला. सगळं राज्य तुझं आणि माझं... तू मी आणि मी तू!... आपण अभेद्य आहोत. आणि म्हणून आपल्या त्या शिलाहारच्या दासीला मी आता माझ्याबरोबर घेऊन जाणार आहे...

**शिवानंद :** लीलावतीला ?

**राजा :** हो...लीलावतीला...

**शिवानंद :** पण राजन्...

**राजा :** करार, शिवा, करार ! सहा महिन्यांनी तिनं माझ्याकडे यायचं असं ठरलं होतं आपलं, आठवतंय ?

**शिवानंद :** हो.. आठवतंय.

**राजा :** सहा महिने सपून गेले आहेत. आज मी इतका उल्हसित आणि आनंदित आहे की, आजची रात्र तिच्या सांस्कृतिक मिठीमध्येच मला काढली पाहिजे. मघाशी तिला बघितलं तेव्हाच मी ठरवलं. कुठे आहे ती ? ( मोठ्याने ) लीलावती... लीलावती !

ए दासी...

( लीलावती येते, कोपऱ्यात उभी राहते.)

**राजा :** लीलावती, तू आता माझ्याबरोबर येणार आहेस. घाबरायचं कारण नाही, तुला माझ्या अंतःपुरात राणीसारखी ठेवीन मी.

**लीलावती :** स्वामींनी सांगितलं तर......

**राजा :** तुझे स्वामीमहाराज आता आमचे धर्माध्यक्ष झाले आहेत. तुला मठात जाता येणार नाही. आजपासून तू राजवाड्यात राहणार आहेस...आज दासी म्हणून येशील पण शहाणपणानं वागलीस तर उद्या राणीही होशील...चल, अशीच नीघ...शिवा... बोलाव तुझ्या रक्षकांना...

**शिवानंद :** राजन्, मला थोडा अवधी द्या.

**राजा :** ठीक ठीक ! मी माझ्या मेण्यामध्ये जाऊन बसतो. तू तिला तावडतोब खाली पाठवून दे. मला आत्ताच झोप यायला लागली आहे...लक्षात ठेव. शिवा, उद्या सकाळी मठाचे प्रमुख दोन-तीनशे शिष्यांसह शंख आणि नगारे वाजवीत तुझ्याकडे येतील. तुला मठापर्यंत नेण्यासाठी. तू आचार्यपद ग्रहण केल्यावरच आचार्यांवर अंत्यसंस्कार होतील. मी असेनच तेथे, आसवांनी भिजलेली श्रद्धांजली वाहायला. तर... धर्माध्यक्षमहाराज, महंतमहाराज मी आपला निरोप घेतो. हे जडजवाहर माझ्या मेण्यामध्ये तावडतोब रवाना करा.

( जाताना मागे वळून एकदम )

तुझा हिच्यावर खास जीव आहे, असं नाही ना ?

**शिवानंद :** नाही.

**राजा :** पण कधी आठवण झालीच तर तू तिची भेट माझ्या उद्यानगृहात घेऊ शकशील...केव्हाही, कशीही आणि कितीही...मी वाट पाहतो.

( बाहेर जातो. )

( स्तब्धता )

**लीलावती :** स्वामींचं मी अभिनंदन करते.

**शिवानंद :** कशासाठी ?

**लीलावती :** धर्माध्यक्ष झाल्याबद्दल.

**शिवानंद :** मला शुभेच्छांची गरज अधिक आहे.

**लीलावती :** त्याही आहेतच...उद्या सकाळी आपण हे घर सोडणार !

**शिवानंद :** नुसतं घरच नाही. या घरात असलेलं सर्व काही

**लीलावती :** त्यात माझीही जमा होते ?

**शिवानंद :** हो.

**लीलावती :** मी आता महाराजांबरोबर जावं, असं खरंच आपल्याला वाटतं ?

**शिवानंद** : होय.

**लीलावती** : आपली आज्ञा आहे ?

**शिवानंद** : मानीत असशील तर आज्ञा, नाहीतर इच्छा.

**लीलावती** : आपली इच्छा मला आज्ञेसारखीच आहे... स्वामींनी माझं शरीर जाणलं, पण माझं मन स्वामींना कधीच कळलं नाही !

**शिवानंद** : कळलं.... पण माझा निरुपाय आहे.

**लीलावती** : का ? तुम्ही राजाला नाही म्हणू शकत नाही ?

**शिवानंद** : नाही, उद्याच्या सूर्योदयापर्यंत मी राजाचा सेवक आहे. तोपर्यंत जे माझं आहे ते सर्व राजाचं आहे. आणि सहा महिन्यांनी तुला त्यांच्या स्वाधीन करायचं वचन मी दिलेलं होतं... तुझ्यासमोर. का दिलं, हेही तुला माहीत आहे.

**लीलावती** : तुम्ही धर्माध्यक्ष झाल्यावर मी तुमच्या जवळपास राहू शकणार नाही ?

**शिवानंद** : नाही.

**लीलावती** : मी राजवाड्यात सुखानं जगेन असा स्वामींना विश्वास आहे ?

**शिवानंद** : मला तशी आशा आहे.

**लीलावती** : माझी वस्त्रप्रावरणं घेऊन जाऊ ?

**शिवानंद** : नाही... अशीच जा. महाराजांना तिष्ठत ठेवणं योग्य नाही. ती उद्या पाठवली जातील.

**लीलावती** : आपली आज्ञा. एकच विचारते, क्षमा असावी, आता धर्माध्यक्ष झाल्यावर देवावर तरी सर्वस्वानं प्रेम करणार आहात ?

**शिवानंद** : मी शोधतो आहे... कदाचित त्या शोधाच्या दाराशी मी आलो असेन.

**लीलावती** : स्वामी... ( पुढे जाते )

**शिवानंद** : क्षमा कर लीलावती, मी अद्याप कफनी पेहेरली नसली तरी मनानं संन्यासी झालो आहे... हा रक्षक न्यायला आला... ( पाठीवर हात ठेवीत ) जा... सुखी हो.... माझा आशीर्वाद आहे.

**लीलावती** : तुमचा शोध यशस्वी होवो. जाऊ मी ?

**शिवानंद** : ( बाजूला पाहत ) जा...

**लीलावती** : तुम्ही आता इतके मोठे झाला आहात... तुम्हाला देण्यासारखं माझ्याजवळ काहीच नाही... ( केसातील फूल काढते ) हे फूल... चालेल ?

**शिवानंद** : चालेल...

( फूल पायावर ठेवून लीलावती रक्षकाबरोबर आवेगाने निघून जाते. शिवानंद फूल हातात घेऊन क्षणभर आसनावर स्तब्ध बसतो. नंतर एकदम उठून— )

**शिवानंद** : रंभवा ! रंभवा !

निःशब्द !

( रंधवा येतो... उभा राहतो. )

**शिवानंद :** तुला कळलंय काय घडलं ते ?

**रंधवा :** ( खुणांनी ) हो...

**शिवानंद :** तू राजाच्या सेवेत जा. चांगली अधिकाराची जागा तुला द्यायला सांगेन.

**रंधवा :** नाही जाणार.

**शिवानंद :** नाही ? मग ?

**रंधवा :** जिथे तुम्ही, तिथे मी.

**शिवानंद :** मी मठात जाणार आहे. उद्या सकाळीच तिथे येशील ?

**रंधवा :** हो...

**शिवानंद :** तिथे दीक्षा घ्यावी लागेल... संन्यासी व्हावं लागेल.

**रंधवा :** होईन.

**शिवानंद :** ठीक आहे .. आता एक काम कर. असाच माझ्या सचिवाकडे जा आता आणि त्यांना निरोप दे.... हे घर तर राजाचंच आहे... पण उद्या सकाळी मी येथून गेल्याबरोबर घरातील सगळ्या वस्तू... द्रव्य, अलंकार, धान्य, शस्त्र, वस्त्र, सर्व काही घरात असेल ते... गाड्यांमध्ये भरायचे आणि गावाबाहेरच्या खोपट्यांमध्ये ते वाटून द्यायचं. या आदेशाचा व्यवहार व्यवस्थित होतो की नाही, हे सर्व तू स्वतः उद्या पाहा आणि नंतर आश्रमात ये. जा....

( रंधवा जातो. शिवानंद लीलावतीने ठेवलेली वीणा उचलतो... आसनावर बसतो... वीणेचे झंकार त्याच्या कानावर येत असतात... राजाची दबलेल्या आवाजातील किंकाळी त्याच्या कानावर येते. तो उठून दाराकडे धावतो. राजा अत्यंत विकल अवस्थेत आत येतो आणि कोचावर धाडकन कोसळतो. )

**शिवानंद :** राजन् !

**राजा :** शिवा, मी इथेच थांबणार आहे. झोपणार आहे ! मला भीती वाटते आहे...

**शिवानंद :** शांत व्हा राजन्... काय घडलं, परत का आलात ?

**राजा :** भयानक ! शिवा, माझ्या मेण्यात माझ्या शेजारी बसल्याबरोबर तिनं कुठून तरी कट्यार काढली आणि स्वतःच्या छातीत खुपसून घेतली !

**शिवानंद :** ( स्तंभित ) लीलावती !

**राजा :** सगळीकडे रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या ! रक्त... रक्त ! आणि खाली कोसळून मरून पडली ती. मरून पडताना तिनं श्वासाचा देखील आवाज केला नाही भयंकर !

**शिवानंद :** ( क्षणभराने ) मेणा खाली आहे ?

**राजा :** नाही, मी रक्षकांना सांगितलं, मेणा ताबडतोब अमरभूमीत न्या आणि अधिकाऱ्यांना सांगून जाळून टाका तिला... पण तू कुठेही जायचं नाहीस शिवा... मला

फार घाबरल्यासारखं वाटतंय... तिनं स्वतःला मारलं, पण त्या अगोदर ती मलाही मारू शकली असती... तू बसून राहा इथे... माझ्याजवळ... हलू नकोस... मला सोबत हवी आहे....

**शिवानंद** : राजन्, आपण इथेच झोपा... शांत... मी जवळ बसतो इथे...

**राजा** : ( अडखळत ) झोप की मूर्च्छा... मला कळत नाही.... ( उशीवर डोकं ठेवतो ) तू... जाऊ नकोस. ( शिवानंद त्याच्या अंगावर शाल घालतो. )

**शिवानंद** : झोपा राजन्.

( सर्व दिवे मालवून फक्त एक लामणदिवा ठेवतो. जवळच्या एका आसनावर बसतो )

**शिवानंद** : ( क्षणभराने उठतो )

मी तुझ्याकडे येतो आहे... आलो आहे...

पण त्याच्यासाठी एवढं मूल्य द्यावं लागतं ?

माझी परीक्षा पाहतो आहेस तू... पण मी आता माघार घेणार नाही... मी आता सर्वस्वी तुझाच झालो आहे... तू जे मागशील ते मी देईन ! जे मागशील ते सर्व... सर्व...

अंधार

## अंक दुसरा

### प्रवेश तिसरा

राजवाडा— एक दालन.
कोपऱ्यामध्ये तीन मानकरी पुतळ्यासारखे उभे.
बाहेरून घोषणांचे आवाज येतात आणि मंदावतात.
बाजूला असलेल्या एका खिडकीजवळ राणी पाठमोरी उभी आहे. . बाहेर पाहत.
आवाज कमी झाल्यावर ती आत वळते. तिच्या हातात एक चांदीचे पात्र आहे. त्यात बदाम-पिस्त्यासारखे काही खाण्याचे पदार्थ आहेत.
आत वळताना आणि पुढे बोलतानाही ती अधूनमधून ते पदार्थ तोंडात टाकीत असते. चवीने चावत असते.
आत येताना...

**राणी :** शिवानंद ! शिवानंद ! शिवानंद ! बघितलंत ? लोक किती कृतघ्न आणि बेअक्कल असतात ! काय त्या गोसावड्यानं असं आभाळ खाली ओढून आणलंय, म्हणून त्याच्या नावाचा जयघोष करीत लोक गावातून फिरताहेत ? त्याचे ते संन्यासी नगरात आले म्हणून लोकांना उन्माद चढलाय. द्वारपालांना तुम्ही आदेश व्यवस्थित दिला ना ? सारे दरवाजे बंद करायचे आणि आत कोणालाही सोडायचं नाही म्हणून ?

**मानकरी :** होय भगवती.

**राणी :** ( आसनावर बसते ) भगवती ! मी तुम्हाला शंभरदा सांगितलंय, मला महाराणी म्हणायचं...

**मानकरी :** होय, महाराणी. क्षमा असावी.

**राणी :** हा देशच सगळा रानटी आणि अनगड माणसांचा. आणि महाराज तर या सगळ्या अनगडांचे अधिपती ! कोणालाही राजघराण्यातील रीतभात माहीत नाही... भगवती म्हणे...

**मानकरी :** होय, भगवती, नाही महाराणी...

**राणी :** नुसती महाराणी नाही. मी सौगंध देशाच्या सम्राटाची कन्या आहे. या राज्याच्या पंचवीस पटींनी मोठं माझ्या वडलांचं राज्य...आणि या वाड्याच्या दसपटींनी मोठा, आमचा राजवाडा ! ऐश्वर्य तर असं की, इंद्राचा प्रासादही दरिद्री वाटावा ! तुम्ही पाहिलात कधी ?

**मानकरी** : इंद्राचा प्रासाद? नाही...

**राणी** : आमचा राजवाडा! इंद्राचा प्रासाद कशाला पाहाल मेल्याशिवाय?

**मानकरी** : नाही महाराणी.

**राणी** : आणि तरीही मी अशा या भिकारड्या घरात आले... नशीब! दुसरं काय?.. मला किती जणांनी मागणी घातली होती... ठाऊक आहे?

**मानकरी** : नाही, महाराणी.

**राणी** : तुम्हाला काय माहीत असणार? मौर्यांनी घातली, अभीरांनी घातली, वाकाटकांनी घातली आणि शबरांनीदेखील घातली. पण मी सर्वांना नकार दिला... का माहीत आहे?

**मानकरी** : नाही महाराणी.

**राणी** : पाहायला आले तर सगळे राजकुमार माझ्यासमोर थरथर कापायला लागले. असं माझ्या पित्याचं वैभव आणि माझं तेज होतं. हे महाराज त्यातल्या त्यात कमी कापले. म्हणून त्यांची निवड केली... पण हे सुद्धा पहिले सहा महिने माझ्याकडे तोंड वर करून पाहात नव्हते... असं तेज होतं माझं... अजूनही आहे. म्हणूनच मी महाराजांना सांगते आहे, या शिवानंदाचं पारिपत्य करायचं काम माझ्यावर सोपवा. पण हा शिवानंद म्हणजे महाराजांना पाठीवरच्या फोडासारखा झालाय. खाजवताही येत नाही... अन् औषधही लावता येत नाही. मी पहिल्यापासून त्या माणसाला ओळखलं होतं. कुठल्यातरी जंगली जमातीतून त्या संताळयांच्या मठात आलेला एक उनाड माणूस! प्रत्येक वेळी मी सांगितलं... जवळ घेऊ नका, घेतलं. महामंत्री करू नका, केलं. मठाधीशाच्या जागेवर बसवू नका, बसवलं. आणि आता बसले आहेत छाती पिटीत आणि हुंदके देत! वर्षाच्या आत तो आपला जन्माचा शत्रू झाला म्हणून! एकच वर्ष जेमतेम झालं असेल, तो मठाधीश होऊन. आठवतंय?

**मानकरी** : होय, महाराणी

**राणी** : पण केवढा उच्छाद मांडलाय त्यानं! महाराजांनी त्याला मठात नेऊन बसवलं, पण तिथे पाय टाकल्याबरोबर मेला महाराजांना विसरला. तोंड पाहायला तयार नाही. पैशांची महाराजांनी मागणी केली तर उद्धट उत्तरं.... पैसा लोकांचा आणि लोकांसाठी आहे... एक कपर्दिकाही मिळणार नाही... भेटायला बोलावलं तर म्हणतो माझं काम तुमच्याकडे नाही, तुमचं माझ्याकडे असेल तर मठात या! मठात जा आणि त्याच्या पायांवर लोटांगण घाला? कृतघ्न मेला! त्याला वाटतं आपण म्हणजे देवाचे अवतार! तरी राजवाड्याचे पुरोहित नेहमी सांगतात, लोकांना पाखंडी आणि धर्मभ्रष्ट करणारा हा संताळयांचा मठच राज्यातून उठवून लावा! आणि आता चांडाळानं हे दुष्काळाचं नाटक उभं केलंय. म्हणे, भयंकर दुष्काळ पडलाय... तुम्ही सगळे आज जेवलात, भरपूर?

**मानकरी** : होय, महाराणी.

**राणी** . काय जेवलात ?

**मानकरी** : होय महाराणी,

**राणी** : आणि उद्याही जेवणार आहात. तुम्ही जेवत आहात, मंत्री, मानकरी, महा जेवताहेत, ब्राह्मण, प्राणी जेवताहेत, सैनिकरक्षक जेवताहेत, जे जे आम्हाला दिसता भेटतात ते सगळे जेवताहेत, अगदी (दोंदाखाली) कळ लागेपर्यंत जेवताहेत. आणि हा धम स्वतः दुष्काळाच्या आणि उपासमारीच्या गोष्टी सांगतोय्. कुठे आहे तो दुष्काळ ?.. आमचं वैर साधण्यासाठी त्यानं हा बागुलबुवा निर्माण केलाय...लोकांना पेटवलंय्... ( बाहेर आवाज ) हा पाहा आणखी एक जमाव ओरडत आला ! ( उठून खिडकी-पाशी जाते. आवाज दूर जातो. आत परत येऊन) खोटं ! सारं खोटं ! ज्यांना खायला मिळत नाही ते इतके ओरडू शकतील ?... तुम्ही राजांचे खास सहवासी मानकरी आहात...

**मानकरी** : होय, महाराणी.

**राणी** : मग तुम्ही त्यांना सांगत का नाही, या लोकांवर भालाईत घालायला ?

**मानकरी** : आम्ही काहीच सांगत नाही, महाराणी. आम्ही फक्त ऐकतो.

**राणी** : म्हणजे तुम्ही मानकरी नसून नुसते कानकरी आहात. पाळीव जनावरांसारखे, माझ्या बाबांच्या राज्यात असं काही घडलं असतं तर त्यांनी मुंडक्यांची रास रचली असती. राज्य करायचं म्हणजे सागरगोटे खेळायचे नाहीत. ज्यांना मारलं पाहिजे त्यांना मारलंच पाहिजे...

( राजा येतो )

**राजा** : कुठे आहेत ते संन्यासी ?

**राणी** : कोण संन्यासी ?

**राजा** : मठातून काही संन्यासी मला भेटायला आले आहेत, असं मला समजलं.

**राणी** : राजवाड्याचे दरवाजे बंद आहेत.

**राजा** : बंद ? का.... कोणाच्या आज्ञेनं ?

**राणी** : माझ्या !

**राजा** : तुमच्या... तुम्ही कोण ?

**राणी** : मी सौगंधाच्या सम्राटाची कन्या आणि या राज्याची महाराणी.

**राजा** : माझ्या दुर्दैवानं ! दिवसभर म्हशीसारख्या चरत असता आणि चरत नसता तेव्हा घोरत असता. तुमच्याऐवजी एखाद्या म्हशीला महाराणी केलं असतं तर बरं झालं असतं. तुमच्यासारख्यापेक्षा म्हशी फार बऱ्या. दूध देतात पण किंमत मागत नाहीत, तुम्ही प्रत्येक क्षणाला किंमत मागता आहात आपल्या राणीपदाची !

**राणी :** ( जोरजोराने बदाम चावीत ) मी उद्याच्या उद्या बाबांना निरोप पाठवते. तुमच्या जावयानं मला म्हशींच्या गोठ्यात बांधलंय.

**राजा :** ( बसतो ) मुळीच नाही. तसं केलं तर म्हशींचा *अपमान होईल. पण ते जाऊ द्या...* म्हशी आपलं पाहून घेतील. दरवाजे बंद का केलेत ?

**राणी :** का ? तुमच्या प्राणप्रिय मित्रानं—शिवानंदानं— भडकवलेले लोकांचे जमाव मार्गामार्गातून हिंडताहेत, त्याचा जयघोष आणि तुमचा धिक्कार करीत. ते संन्यासी आल्यामुळे तर त्यांना आणखी चेव आलाय... हा पाहा... आणखी एक जमाव ओरडत चाललाय...

**राजा :** जाऊ दे ! मला कोणाचीही भीती नाही. लोकांची नाही आणि त्यांच्या नेत्यांचीही नाही. रानडुकरांच्या मुसंड्या आणि वाघांच्या झेपी मी अंगावर घेतल्या आहेत...

**राणी :** त्या पुराणातल्या गोष्टी ! महाराज, हे संन्याशांचं बंड सुरू झाल्यापासून तुम्ही भीतीनं ग्रासलेले आहात... भयानक घाबरलेले आहात. विजेचा कडकडाट ऐकून आईच्या पदरात लपलेल्या चार वर्षांच्या पोरासारखे भ्यालेले आहात तुम्ही.

**राजा :** मी लोकांना भीत नाही ! म्हणून सांगतो वाड्याचे दरवाजे सताड उघडे ठेवा...

**राणी :** लोकांना नाही. तुम्ही भिता आहात धर्माध्यक्षाच्या जागेवर तुम्ही बसवलेल्या त्या शिवानंदाला... स्वतःला देवावतार समजणाऱ्या त्या गोसावड्याला .. त्या दीड दमडीच्या... अधम जातीच्या...

**राजा :** ( ओरडत ) बस् ! शिवा आज माझा शत्रू झालाय... प्राणपणानं शत्रूशी लढावं हे त्यानंच मला शिकवलंय. वाघांशी, रानडुकरांशी, चित्त्यांशी लढतो तसा त्याच्याशीही लढेन मी. पण महाराणी महोदया, त्याच्या नावाचा उच्चार करण्याचीही तुमची लायकी नाही. सौगंधाच्या राजवाड्यात तुमचा जन्म झाला आहे, म्हणून तुम्हाला राजाचं घराणं मिळालं, प्रतिष्ठेची जात मिळाली, पण अक्कल मिळाली असं नाही. शिवानं मला अफाट निःस्वार्थ प्रेम दिलं, प्रकाश दिला. तुम्ही काय दिलंय ? तुम्ही दिला आहे फक्त काळोख... नीच कारस्थानांचा, स्वार्थाचा आणि द्वेषाचा !

**राणी :** मी तुम्हाला पुत्र दिलाय .. तुमचा वारसा पुढे चालविण्यासाठी.

**राजा :** तो मी तुला दिला आहे... तुमची कारस्थानं चालवण्यासाठी तो मला परवा विचारत होता, पिताजी, तुम्ही केव्हा मरणार म्हणून ! तुम्ही मेलात म्हणजे मी राजा होईन, असं मातोश्री म्हणताहेत. मी मरावं म्हणून तुम्ही भटाभिक्षुकांची अनुष्ठाने बसवता, त्या उपटसुंभ शाक्तांच्या देवळात जाऊन रेड्यांच्या रक्तानं नवससायास करता ..

**राणी :** ( किंचाळत ) कुभांड ! निव्वळ कुभांड ! आपल्या आम्रवनात रत्नांनी भरलेले हंडे सापडतील एका झाडाखाली... असं एका शाक्तानं सांगितलं... म्हणून मी...

**मानकरी :** होय, महाराणी.
**राणी** : काय जेवलात ?
**मानकरी :** होय महाराणी,
**राणी :** आणि उद्याही जेवणार आहात. तुम्ही जेवत आहात, मंत्री, मानकरी, महाजन जेवताहेत, ब्राह्मण, वाणी जेवताहेत, सैनिकरक्षक जेवताहेत, जे जे आम्हाला दिसतात, भेटतात ते सगळे जेवताहेत, अगदी दोंदाला कळ लागेपर्यंत जेवताहेत. आणि हा धर्माध्यक्ष दुष्काळाच्या आणि उपासमारीच्या गोष्टी सांगतोय्. कुठे आहे तो दुष्काळ ?... आमचं वैर साधण्यासाठी त्यानं हा बागुलबुवा निर्माण केलाय...लोकांना पेटवलंय्... ( बाहेर आवाज ) हा पाहा आणखी एक जमाव ओरडत आला ! ( उठून खिडकीपाशी जाते. आवाज दूर जातो. आत परत येऊन) खोटं! सारं खोटं ! ज्यांना खायला मिळत नाही ते इतके ओरडू शकतील ?... तुम्ही राजांचे खास सहवासी मानकरी आहात...
**मानकरी :** होय, महाराणी.
**राणी :** मग तुम्ही त्यांना सांगत का नाही, या लोकांवर भालाईत घालायला ?
**मानकरी :** आम्ही काहीच सांगत नाही, महाराणी. आम्ही फक्त ऐकतो.
**राणी :** म्हणजे तुम्ही मानकरी नसून नुसते कानकरी आहात. पाळीव जनावरांसारखे, माझ्या बाबांच्या राज्यात असं काही घडलं असतं तर त्यांनी मुंडक्यांची रास रचली असती. राज्य करायचं म्हणजे सागरगोटे खेळायचे नाहीत. ज्यांना मारलं पाहिजे त्यांना मारलंच पाहिजे...

( राजा येतो )

**राजा :** कुठे आहेत ते संन्यासी ?
**राणी :** कोण संन्यासी ?
**राजा :** मठातून काही संन्यासी मला भेटायला आले आहेत, असं मला समजलं.
**राणी :** राजवाड्याचे दरवाजे बंद आहेत.
**राजा :** बंद ? का.... कोणाच्या आज्ञेनं ?
**राणी :** माझ्या !
**राजा :** तुमच्या... तुम्ही कोण ?
**राणी :** मी सौगंधाच्या सम्राटाची कन्या आणि या राज्याची महाराणी.
**राजा :** माझ्या दुर्दैवानं ! दिवसभर म्हशीसारख्या चरत असता आणि चरत नसता तेव्हा घोरत असता. तुमच्याऐवजी एखाद्या म्हशीला महाराणी केलं असतं तर बरं झालं असतं. तुमच्यासारख्यापेक्षा म्हशी फार बऱ्या. दूध देतात पण किंमत मागत नाहीत, तुम्ही प्रत्येक क्षणाला किंमत मागता आहात आपल्या राणीपदाची !

**राणी** : ( जोरजोराने बदाम चावीत ) मी उद्याच्या उद्या बाबांना निरोप पाठवते. तुमच्या जावयानं मला म्हशींच्या गोठ्यात बांधलंय.

**राजा** : ( हसतो ) मुळीच नाही. तसं केलं तर म्हशींचा अपमान होईल. पण ते जाऊ द्या... म्हशी आपलं पाहून घेतील. दरवाजे बंद का केलेत ?

**राणी** : का ? तुमच्या प्राणप्रिय मित्रानं–शिवानंदानं– भडकवलेले लोकांचे जमाव मार्गामार्गांतून हिंडताहेत, त्याचा जयघोष आणि तुमचा धिक्कार करीत. ते संन्यासी आल्यामुळे तर त्यांना आणखी चेव आलाय... हा पाहा... आणखी एक जमाव ओरडत चाललाय...

**राजा** : जाऊ दे ! मला कोणाचीही भीती नाही. लोकांची नाही आणि त्यांच्या नेत्यांचीही नाही. रानडुकरांच्या मुसंड्या आणि वाघांच्या झेपी मी अंगावर घेतल्या आहेत...

**राणी** : त्या पुराणातल्या गोष्टी ! महाराज, हे संन्याशांचं बंड सुरू झाल्यापासून तुम्ही भीतीनं ग्रासलेले आहात... भयानक घाबरलेले आहात. विजेचा कडकडाट ऐकून आईच्या पदरात लपलेल्या चार वर्षांच्या पोरासारखे भ्यालेले आहात तुम्ही.

**राजा** : मी लोकांना भीत नाही ! म्हणून सांगतो वाड्याचे दरवाजे सताड उघडे ठेवा...

**राणी** : लोकांना नाही. तुम्ही भिता आहात धर्माध्यक्षाच्या जागेवर तुम्ही बसवलेल्या त्या शिवानंदाला... स्वतःला देवावतार समजणाऱ्या त्या गोसावड्याला .. त्या दीड दमडीच्या... अधम जातीच्या...

**राजा** : ( ओरडत ) बस् ! शिवा आज माझा शत्रू झालाय... प्राणपणानं शत्रूशी लढावं हे त्यानंच मला शिकवलंय. वाघांशी, रानडुकरांशी, चित्त्यांशी लढतो तसा त्याच्याशीही लढेन मी. पण महाराणी महोदया, त्याच्या नावाचा उच्चार करण्याचीही तुमची लायकी नाही. सौगंधाच्या राजवाड्यात तुमचा जन्म झाला आहे, म्हणून तुम्हाला राजाचं घराणं मिळालं, प्रतिष्ठेची जात मिळाली, पण अक्कल मिळाली असं नाही. शिवानं मला अफाट निःस्वार्थ प्रेम दिलं, प्रकाश दिला. तुम्ही काय दिलंय ? तुम्ही दिला आहे फक्त काळोख... नीच कारस्थानांचा, स्वार्थाचा आणि द्वेषाचा !

**राणी** : मी तुम्हाला पुत्र दिलाय .. तुमचा वारसा पुढे चालविण्यासाठी.

**राजा** : तो मी तुला दिला आहे... तुमची कारस्थानं चालवण्यासाठी तो मला परवा विचारत होता, पिताजी, तुम्ही केव्हा मरणार म्हणून ! तुम्ही मेलात म्हणजे मी राजा होईन, असं मातोश्री म्हणताहेत. मी मरावं म्हणून तुम्ही भटाभिक्षुकांची अनुष्ठाने बसवता, त्या उपटसुंभ शाक्तांच्या देवळात जाऊन रेड्यांच्या रक्तानं नवससायास करता...

**राणी** : ( किंचाळत ) कुभांड ! निव्वळ कुभांड ! आपल्या आम्रवनात रत्नांनी भरलेले हंडे सापडतील एका झाडाखाली... असं एका शाक्तानं सांगितलं... म्हणून मी...

**राजा :** ( उठून ) मानकऱ्यांनो .. वाड्याचे दरवाजे उघडायला सांगा आणि त्या संन्याशांना माझ्याकडे घेऊन या .. शिवाचा निरोप मला ऐकला पाहिजे. ( मानकरी जातात ) आणि आपणही अदृश्य व्हावं अशी विनंती आहे. ते बदाम-खारकांचं पातेलं रिकामं झालंय... कोठीघरात जा आणि ते पुन्हा भरून घ्या... तेवढं एक काम तुम्हाला निष्ठेनं करता येतं ...

**राणी :** ( जाताना ) जातेच मी ! पातेलं तर भरतेच, पण त्या कार्ट्यालाही विचारते, असं बोलायला मी सांगितलं होतं का म्हणून ! ( जाते. )

( राजा आसनावर सुन्न होऊन बसतो.)

( मंद प्रकाश फक्त त्याच्यावर केंद्रित होत जातो. )

**राजा :** तो करंटा क्षण ! .. ज्या क्षणी मी त्याला धर्माध्यक्ष व्हायचा आदेश दिला..., माझ्या जीवनातील सारं सत्त्व आणि सौंदर्य या माझ्या हातांनीच मी चिरडून टाकलं ! पण मठात पाय टाकल्यावरोबर तो इतका परका होईल हे कोणाला कळलं होतं ? मी त्याला जाणलंच नाही... वर्षानुवर्षे गळ्यात गळा घालूनसुद्धा तो मला अनोळखीच राहिला. माझ्याबरोबर तो सावलीसारखा वावरत होता, पण ही सावली माझी नव्हती, आकाशात स्वतःची जागा शोधत फिरणाऱ्या एका नक्षत्राची ती सावली होती, हे मला कधी समजलंच नाही. काळाचं चाक जर पुन्हा उलटं फिरवता आलं असतं तर !... पण भूतकालात परतता येत नाही, वर्तमानात राहता येत नाही, आणि भविष्याकडे पाहता येत नाही... अशी ही भयानक अवस्था ! शिवा, साधुत्वाच्या जवळ जाण्यासाठी काळजाचे पाश इतक्या निःसंगपणानं तोडावे लागतात ! बाणांनी चिरफाड झालेल्या जनावरासारखा मी तडफडतो आहे आणि बाण मारणारा तू, मला हमालांच्या हवाली करून शांतपणानं देवळाच्या पायऱ्या चढतो आहेस ! होय... मला आठवतंय, तू म्हणाला होतास, मला राजाची आणि देवाची सेवा एकाच वेळी करता येणार नाही. पण शिवा, मला तुझ्या सेवेची गरज नव्हती. मला हवा होता फक्त तुझा आधार, तुझी सोबत, पण ती तू नाकारलीस आणि काळोखाच्या एका अथांग डोहामध्ये मला भिरकावून दिलंस. मी आता साक्षात अंधार अंधार झालो आहे...पडक्या, शेवाळलेल्या भिंतीच्या भयाण अवशेषांना लोंबकळून राहणारा अंधार ! पण शिवा... लक्षात ठेव अंधारालाही स्वतःची अस्मिता असते, अहंकार असतो आणि भुताखेतांनी दिलेली एक शक्तीही असते. मी पराभव पत्करणार नाही. मी लढेन शिवा, तुझ्याशीही लढेन... सर्वस्वानं लढेन...

( पूर्ण प्रकाश...

तिन्ही मानकरी आणि पाठोपाठ दोन संन्यासी येतात.)

**मानकरी :** महाराज, मठातून हे संन्यासी आलेले आहेत आचार्यांचा निरोप घेऊन.

**संन्यासी :** अभिवादन, राजाधिराज.

**राजा :** काय आज्ञा आहे आपल्या आचार्यांची ?

**संन्यासी :** आज्ञा नाही, विनंती आहे.

**राजा :** आज्ञेला विनंती म्हणणं हा आचार्यांचा फक्त सभ्याचार आहे. ते आता नुसते आचार्य राहिले नाहीत. ते आता लोकनेते झाले आहेत. रंकांचे राखणदार आणि कंगालांचे कल्याणकर्ते...

**संन्यासी :** त्यांची पहिली विनंती आहे की...

**राजा :** थांबा ! मी तुम्हाला आत बोलावलं ते त्यांचे शब्द तुमच्याकडून ऐकण्यासाठी नव्हे तर माझं हे पत्र त्याला देण्यासाठी. हे पत्र त्याला द्या आणि तात्काळ उत्तर पाठवायला सांगा. मी त्याच्याशीच बोलेन, फक्त त्याच्याशीच. घेऊन जा हे... पोचवून द्या यांना...

(पत्राची एक थैली संन्याशांजवळ देतो)

(संन्यासी अभिवादन करतात आणि बाहेर जातात... त्यांच्याबरोबर मानकरी जातात.)

**राजा :** तो मला भेटला तर ? परमेश्वरा, मला सामर्थ्य दे, त्याच्यासमोर ताठ उभं राहण्याचं... सात जन्माच्या शत्रूसारखं... बोलण्याचं !

अंधार

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २१६४४ नों. दि. १५.१०.९६
वि. नाटक क्र. ..................

# अंक दुसरा

## प्रवेश चौथा

मठातील एक खोली.
रंधवा... आता आकाशानंद.
मूकपणानं प्रार्थना करीत आहे.
वेळ :
शिवानंद... आता धर्माध्यक्षाच्या वेषात... प्रवेश करतो.

**शिवानंद :** रंधवा ... ( हसतो ) चुकलो... वर्ष झालं तरी तुझं नवीन नाव माझ्या लक्षात राहात नाही...काय नाव ठेवलंय तुझं आमच्या मठाधिकाऱ्यांनी ?... विसरलो मी...

**आकाशानंद :** ( खुणांनी ) आकाशानंद.

**शिवानंद :** ( हसतो ) आठवलं... आकाशानंद ! आमचे अधिकारी चतुरच आहेत. आकाशही तुझ्यासारखंच निःशब्द असतं... शब्दांचं ग्रहण करतं, पण उच्चार करीत नाही, पण तू आता या अवेळी प्रार्थना कशासाठी करीत होतास ?

**आकाश :** तुमच्यासाठी.

**शिवानंद :** माझ्यासाठी ? माझ्यावर काय संकट कोसळलंय असं ?

**आकाश :** फार फिरता... विसावा घेत नाही.

**शिवानंद :** विश्रांती घेत नाही... असंच ना ?

**आकाश :** होय.

**शिवानंद :** सामुदायिक स्वयंपाकघरांचा एक नवीन उद्योग आता सुरू केला आहे ना ? गावोगाव जाऊन लोकांना पटवून द्यावं लागतं... दुष्काळसुद्धा लोकांनी सम-प्रमाणात वाटून घेतला तर उपासमारीचं प्रमाण कमी होईल.

( आसनावर बसतो )

**आकाश :** ( पाय दाबायला पुढे येतो )

**शिवानंद :** नको-आकाश, शीण माझ्या पायाला होत नाही...चांगले भक्कम आहेत ते. शीण होतो तो मनाला.

**आकाश :** का ?

**शिवानंद :** आपल्याला पुरेसं काही करता येत नाही याची खंत वाटते. गुराढोरांचा तर जागोजाग खच पडला आहे, पण माणसंसुद्धा जंगलात, झोपड्यांत आणि देवळात-

देखील दिव्यावरच्या पतंगांसारखी मरून पडत आहेत. लोकांकडून घ्यायचं आणि लोकांनाच द्यायचं...म्हणून हा सारा आटापिटा !

**आकाश :** तरीही विश्रांती घ्यायलाच हवी !

**शिवानंद :** होय माझ्या राजा, आता आलोय तो विश्रांती घ्यायलाच आलो आहे. थोडा वेळ थांबून पुन्हा जायचं आहे... ( हसतो ) रोज इतकी पायपीट करणारा मठाधीश मला वाटतं या मठानं पहिल्यांदाच पाहिला असेल !

**आकाश :** आज जायचं नाही.

**शिवानंद :** जायचं नाही ? तू माझा शिष्य आहेस की स्वामी आहेस ?

**आकाश :** ( मान खाली घालतो )

**शिवानंद :** ( पाठीवर हात ठेवून ) अरे, थट्टेनं बोललो मी ! बेटा, तुझ्या मनात काय आहे, माझ्या लक्षात आलं. सायंकाळच्या प्रार्थना होत नाहीत...हेच ना ?

**आकाश :** हो...देव रागावतील.

**शिवानंद :** नाही, बेटा, जो देव रागावतो, रुसतो, सूड घेतो, नैवेद्य मागतो आणि स्तुतीला भाळतो तो आपला नाही. आपला देव मंत्रतंत्रांचा, यज्ञयागांचा, वा प्रार्थनांचा भुकेला नाही. त्याला संगमरवरी देवालयं नको असतात, नवरत्नांचे अलंकार नको असतात, त्याला हवा असतो एक छोटासा कोपरा, आपल्या काळजातला.

**आकाश :** पुन्हा संध्याकाळी जाणार ?

**शिवानंद :** ( हसतो ) जायलाच हवं. त्या छोटयाशा कोपऱ्यातून हे आदेश येत आहेत. संध्याकाळी जाणार आणि उद्यापासून आठपंधरा दिवस मी बाहेरगावी प्रवासातच राहणार आहे.

**आकाश :** मी बरोबर येणार.

**शिवानंद :** तुला मठातली कामं आहेत.

**आकाश :** तरीही येणार.

**शिवानंद :** का ? ( हसतो ) तुला माझी काळजी वाटते ?

**आकाश :** हो.

**शिवानंद :** कोण मला शत्रू आहे ?

**आकाश :** राजा.

**शिवानंद :** राजा ? राजा माझा शत्रू नाही. सगळ्या अन्यायांचा आणि बलात्कारांचा उगम त्यांच्या सत्तेत होतो, म्हणून मी त्याला विरोध करतो आहे. अगतिक लोकांना संरक्षण देण्याऐवजी, राजाचे मंत्री, अधिकारी आणि सैनिक त्यांच्यावर अत्याचार करीत आहेत. म्हणूनच लोकांना धीर देणं, प्रतिकारासाठी त्यांना उभं करणं हे माझं काम आहे. परवाच शेषाद्रीच्या पायथ्याचं सारं जंगल सैनिकांनी पेटवून दिलं...त्यात राहणाऱ्या लोकांना त्यांच्या घरादारासकट जाळण्यासाठी. ते कर भरत नाहीत म्हणून.

असं कितीतरी ! हे सर्व जर मी स्वस्थ पाहात बसलो तर मठाधीशाच्या जागेला स्पर्श करायलाही मी पात्र राहणार नाही. आणि तरीही राजासंबंधी माझ्या मनात स्नेहाचीच भावना आहे. सिंहासनावर बसलेल्या माणसापेक्षा, त्या आसनाच्या आडोशाला राहणारी हिंस्र श्वापदंच जास्त भयानक असतात.

**आकाश :** तुम्ही त्यांना भेटत का नाही ?

**शिवानंद :** राजा मठात यायला तयार नाही.

**आकाश :** तुम्ही तिकडे का जात नाही ? अनेकदा त्यांची बोलावणी आली.

**शिवानंद :** ( हसतो ) मी गेलो नाही हे खरं आहे. पण मी काही वरपित्यासारखा मानपानासाठी हटून बसलो नाही. मला राजाची काळजी वाटते. म्हणून मी जात नाही.

**आकाश :** का ?

**शिवानंद :** राजा राजधानीच्या बाहेर तर नाहीच, पण राजधानीतही सुरक्षित नाही. मी गेलो तर नगरात उगाच उद्रेक होईल आणि राजाला त्रास होईल.

( उठतो )

पण तू म्हणतोस ते खरं आहे. शेवटी मी कशालाही भिता कामा नये. सारी भयं मनातून निपटून काढली तरच मी त्याचा चांगला सेवक होऊ शकेन. शाबास बेटा, तूच आज माझा गुरू झाला आहेस. मी राजाकडे संन्यासी पाठवले आहेत. राजा कितपत प्रतिसाद देतो ते पाहू या... नाहीतर...

( बाहेर घंटानाद होतो.)

–काहीतरी घडलंय... तू बघ बाहेर जाऊन. पण लक्षात ठेव...

( तेवढ्यात जखमी, रक्तबंबाळ झालेला एक भिल्ल धावत येतो. आणि "महाराज मला वाचवा" असे ओरडत शिवानंदाच्या पायाशी पडतो. मागोमाग एक संन्यासी येतो )

**शिवानंद :** काय प्रकार आहे हा ?

**संन्यासी :** क्षमस्व, आचार्य, हा भिल्ल आपली भेट मागतो आहे ! जखमी आहे म्हणून आत आणला.

**शिवानंद :** ऊठ, बेटा ऊठ... आनंद, हा जखमी झालेला आहे. त्याला ताबडतोब आपल्या वैद्यगृहात न्या...

**भिल्ल :** मला आपला आश्रय हवा आहे.

( उठून समोर उभा राहतो )

**शिवानंद :** आश्रय ? का– कुठून आलास तू ?

**संन्यासी :** राजसैनिकांचं एक पथक याच्या पाठलागावर आहे, आचार्य. ते आता मठापर्यंत आलेही असतील.

**शिवानंद :** (त्याच्या खांद्यावर हात ठेवून) काय अपराध केला आहेस तू ? खरं सांग.

**भिल्ल :** मी लढलो सैनिकांशी .. प्रतिकार केला...
**शिवानंद :** कशासाठी ?
**भिल्ल :** मी जवळच्या पाड्यातला नायक आहे, महाराज. धान्यभाग देत नाही म्हणून सैनिकांनी पाड्यावर घाला घातला, झोपड्या पाडल्या, आमच्या देखत... आमच्या बायकांना नागड्या करून .. त्यांनी... नाही... मला सहन झालं नाही.... चार तरण्याताठ्यांना हाताशी धरून मी प्रतिकार केला... लढलो मी... मी गुन्हा केला महाराज ?
**शिवानंद :** मुळीच नाही. तू आपलं कर्तव्य बजावलं आहेस....
**भिल्ल :** माझे साथीदार मेले, मी जखमी झालो... पण वाचलो... म्हणून हे सगळं तुमच्या कानावर घालण्यासाठी मी डोंगरवाटेनं इकडे धावत आलो... पण ते माझ्या पाठीवर आले आहेत.

(घंटानाद. संन्यासी येतो.)

**संन्यासी :** आचार्य, राजाचे पन्नास सैनिक मठाच्या महाद्वाराशी तलवारी उपसून उभे राहिले आहेत... आपल्याकडे आश्रयाला आलेल्या भिल्लाला आमच्या स्वाधीन करा अशी मागणी आहे त्यांची.
**शिवानंद :** त्यांना सांगा ते होणार नाही !
**संन्यासी :** आम्ही सांगितलं. पण ते ऐकायला तयार नाहीत. त्यांचा अधिकारी दांडगाईने आत घुसला आहे... तो...

(अधिकारी आत येतो)

**अधिकारी :** (उर्मटपणाने) तो मी आहे. राजाचा प्रतिनिधी आणि पथकाचा अधिकारी.
**शिवानंद :** धर्मपीठाला प्रथम अभिवादन केलं पाहिजे. राजाच्या अधिकाऱ्यानंच नव्हे तर राजानंही.
**अधिकारी :** (नमस्कार करीत) अभिवादन.
**शिवानंद :** ठीक आहे, आपण कोण आहात ते कळलं... पण इथं कशासाठी आलात... दांडगाईनं ?
**अधिकारी :** या या माणसाला पकडण्याठी.

(सैनिकांना) पकडा या बदमाषाला....

(सैनिक पुढे सरसावतात.)

**शिवानंद :** (पुढे येत) खबरदार ! त्याच्या अंगाला हात लावण्यापूर्वी धर्माध्यक्षावर तलवार चालवावी लागेल तुम्हाला... मागे व्हा !... हा माणूस माझा आहे.
**अधिकारी :** आचार्य, राजाचा आदेश आहे.
**शिवानंद :** इथं राजाचा आदेश चालत नाही. फक्त माझाच चालतो. तुम्ही मठाच्या

बाहेर चालते व्हा... ताबडतोब !

**अधिकारी :** हा राजाचा अपमान करता आहात, आचार्य, तुम्ही. या माणसाने राजद्रोह केला आहे. राजाचे सैनिक मारले आहेत, जखमी केले आहेत.

**शिवानंद :** आणि तुम्ही काय केलंत ?

**अधिकारी :** आम्ही आमचं काम करीत होतो.

**शिवानंद :** ( आवाज चढवून ) बायकांना नागडं करायचं ? त्यांच्यावर बलात्कार करण्याचं ? झोपड्या जाळण्याचं आणि निःशस्त्र दुबळ्या लोकांना ठार मारण्याचं ?

**अधिकारी :** हा प्रश्न विचारण्याचा तुम्हाला अधिकार नाही, आचार्य. या माणसाला तुम्ही आमच्या स्वाधीन करा... नाहीतर...

**शिवानंद :** नाही करणार, आनंद, तुम्ही त्याला वैद्यगृहात घेऊन जा... त्याच्यावर त्वरित उपचार करायला सांगा... जा...

( संन्यासी भिल्लाला धरतात )

**अधिकारी :** नाही.... आम्ही त्याला नेऊ देणार नाही... तुम्ही खुनी माणसाला संरक्षण देता आहात... परिणाम विपरीत होतील...

**शिवानंद :** राजाचं नाव घेऊन माणसं मारली तरी तेही खून होतात. जा त्याला घेऊन आनंद... इं... पुढे सरकाल तर...

( आकाश झेप घेऊन ओरडतो. अधिकाऱ्याच्यापुढे छाती काढून उभा राहतो. दोन्ही हात पसरून. )

( संन्यासी भिल्लाला घेऊन जातात. )

**अधिकारी :** ( तलवार म्यानात घालून) ठीक आहे, आचार्य. हे प्रकरण इथं थांबणार नाही. राजद्रोह्याला आश्रय देऊन तुम्हीही राजद्रोह करीत आहात. याचं प्रायश्चित्त घ्यावं लागेल, तुमच्या मठाला आणि तुम्हालाही...

**शिवानंद :** आकाश, त्यांना पोचवून ये बाहेर.

( अधिकारी सैनिकांसह जाऊ लागतो.)

महाशय, जातानाही पीठाला अभिवादन केलं पाहिजे.

**अधिकारी :**<br>**सैनिक :** } अभिवादन

( आकाशबरोबर जातात. )

( शिवानंद स्तब्ध होऊन बसतो. क्षणभराने एक संन्यासी येतो.)

**संन्यासी :** राजाकडे गेलेले संन्यासी परत आले आहेत.

**शिवानंद :** राजाकडे गेलेले ? येऊ दे त्यांना आत.

( संन्यासी जातो. दोन संन्यासी आत येतात.)

**दोघे संन्यासी :** नमस्ते आचार्य.

**शिवानंद** : भेटलात राजाला ?
**संन्यासी** : होय, आचार्य.
**शिवानंद** : निरोप सांगितलात ?
**संन्यासी** : काहीही ऐकून घ्यायला त्यांनी साफ नकार दिला. मी फक्त आचार्यांशीच बोलेन असं ते म्हणाले. हे पत्र त्यांनी आपल्यासाठी दिलंय.

(थैली देतात.)

**शिवानंद** : (पत्र वाचतो. पत्र : राजाच्या आवाजात.)

"शिवा, तुझ्या मनात माझ्याविषयी तिळमात्रही आपुलकी शिल्लक असली तर, उद्या सकाळी तू मला भेटायला ये. ज्या पांडवगिरीच्या डोंगरमाथ्यावर आपण दोघं अनेकदा बसलो, बोललो, सूर्योदय आणि सूर्यास्त पाहिले... त्या ठिकाणी उद्या ठीक सूर्योदयाच्या वेळी आपण भेटू...

शिवा, मी भ्याड आहे, मूर्ख आहे. तुझ्या आश्रमात येण्याचा मला धीर होत नाही आणि तुला राजधानीत बोलावण्याचा तर मुळीच नाही. म्हणून सारा प्राण शब्दात आणून शिवा, मी तुला सांगतो, विनंती करतो, पांडवपूरच्या डोंगरावर मला उद्या भेटायला ये. लढाई अटळ असेल तर आपण लढू. पण त्यापूर्वी मला एकदा...फक्त एकदाच तुला पाहायचंय्...तुझ्याशी बोलायचंय... शिवा... उद्या भेटाल नाहीस तर आयुष्यात आपण पुन्हा कधीच भेटणार नाही... तुझा एके काळचा मित्र..."

(पत्र बाजूला ठेवून शिवानंद स्तब्ध उभा राहतो.)

**शिवानंद** : राजन्, मी भेटेन तुम्हाला !
(संन्याशांना) तुम्ही असेच परत जा... आणि राजाला सांगा, पांडवपूरच्या डोंगरमाथ्यावर बरोबर सूर्योदयाच्या वेळी मी उपस्थित राहीन... जा... आणि प्रमुखांना सांगा, आज उद्याचा प्रवास तूर्त रद्द केला आहे... (संन्यासी जातात. शिवानंद स्तब्ध उभा राहतो. नंतर....)
**शिवानंद** : सर्वात्मका, माझं एकच मागणं तुझ्याजवळ आहे. या परीक्षेच्या वेळी तू सतत माझ्या शेजारी उभा राहा. तुझ्या सर्वव्यापी रूपासंबंधी माझं मन निःशंक असू दे आणि त्या सर्वात्मकात तुझी सेवा करताना.. माझं अंतःकरण सदैव निर्भय राहू दे.

(हात जोडून उभा राहतो. सर्वात्मका शिवसुंदरा– या प्रार्थनेचे स्वर ऐकू येतात.)

(प्रार्थना– वाचन रेकॉर्ड करणे)

सर्वात्मका शिवसुंदरा
स्वीकार या अभिवादना ।
तिमिरातुनी तेजाकडे
माझ्या प्रभो ने जीवना ॥

सुमनांत तू, गगनात तू, ताऱ्यांमध्ये फुलतोस तू
सद्‌धर्म जे जगतातले, सर्वांत त्या वसतोस तू
चोहोकडे रूपे तुझी, जाणीव ही माझ्या मना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

श्रमतोस तू शेतामधे, तू राबसी श्रमिकासवे
जे रंजले वा गांजले, पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे, तेथे तुझे पद पावना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

न्यायार्थ जे लढती रणी, तलवार तू त्यांच्या करी
ध्येयार्थ जे तमि चालती, तू दीप त्यांच्या अंतरी
ज्ञानार्थ जे तपती मुनी, होतोस त्यांची साधना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

करुणाकरा करुणा तुझी असता मला भय कोठले
मार्गावरी पुढती सदा पाहीन मी तव पावले
सुजनत्व या हृदयामधे नित जागवी भीतीविना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

( प्रार्थना चालू असतानाच आकाश येतो आणि नतमस्तक हात जोडून उभा राहतो. प्रार्थना संपते. )

**आकाश :** ( स्वतःशीच समाधीत असल्यासारखा )
स-स-सर-वा-सर्वात्मका, शिव-शिव-सुंदरा-सर-वा-त्मका-

**शिवानंद :** ( स्तंभित ) आकाश ! तुला बोलता यायला लागलं ?

**आकाश :** ( भानावर येत ) आ- आचार्य-! मी-मी-

**शिवानंद :** तुला बोलता येतंय, आकाश !

**आकाश :** हो-हो- मला बोलता येतंय-आ-

**शिवानंद :** ( आवेगानं त्याला जवळ घेत ) माझा बेटा ! बोल-बोल आकाश ! माझी प्रार्थना सफल झाली. अकस्मात हरवलेली तुझी वाणी पुन्हा अकस्मात परत आली !

मला खूप खूप आनंद वाटतोय, आकाश !

**आकाश :** ( अडखळत ) पण–आ–आचार्य, मला भी–भीती वाटते—मला पुन्हा बोलता–येईल ? उद्या–परवा–

**शिवानंद :** येईल बेटा, येईल. माझे आशीर्वाद आहेत, आणि त्याची कृपा आहे. तुझं बोलणं आता कोणीही अडवू शकणार नाही. तुझं आणि तुझ्यासारख्या असंख्य निःशब्दांचंही–

**आकाश :** आचार्य, ही तुमची–तुमची–कृ–कृपा–

( पायावर झेप घेऊ लागतो. )

**शिवानंद :** ( त्याला आडवीत ) नाही बेटा, जे माणसं कष्ट करीत असतात, त्यांना तो करुणाकरच पुन्हा जीवन देत असतो.

पडदा

**अंक दुसरा समाप्त**

सर्वात्मका शिवसुंदरा
स्वीकार या अभिवादना ।
तिमिरातुनी तेजाकडे
माझ्या प्रभो ने जीवना ॥

सुमनांत तू, गगनात तू, ताऱ्यांमध्ये फुलतोस तू
सद्‌धर्म जे जगतातले, सर्वांत त्या वसतोस तू
चोहोकडे रूपे तुझी, जाणीव ही माझ्या मना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

श्रमतोस तू शेतामधे, तू राबसी श्रमिकासवे
जे रंजले वा गांजले, पुसतोस त्यांची आसवे
स्वार्थाविना सेवा जिथे, तेथे तुझे पद पावना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

न्यायार्थ जे लढती रणी, तलवार तू त्यांच्या करी
ध्येयार्थ जे तमि चालती, तू दीप त्यांच्या अंतरी
ज्ञानार्थ जे तपती मुनी, होतोस त्यांची साधना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

करुणाकरा करुणा तुझी असता मला भय कोठले
मार्गावरी पुढती सदा पाहीन मी तव पावले
सुजनत्व या हृदयामधे नित जागवी भीतीविना
तिमिरातुनी तेजाकडे...॥

( प्रार्थना चालू असतानाच आकाश येतो आणि नतमस्तक हात जोडून उभा राहतो. प्रार्थना संपते. )

**आकाश** : ( स्वतःशीच समाधीत असल्यासारखा )
स-स-सर-वा-सर्वात्मका, शिव-शिव-सुंदरा-सर-वा-त्मका-

**शिवानंद** : ( स्तंभित ) आकाश ! तुला बोलता यायला लागलं ?

**आकाश** : ( भानावर येत ) आ- आचार्य-! मी-मी-

**शिवानंद** : तुला बोलता येतंय, आकाश !

**आकाश** : हो-हो- मला बोलता येतंय-आ-

**शिवानंद** : ( आवेगानं त्याला जवळ घेत ) माझा बेटा ! बोल-बोल आकाश ! माझी प्रार्थना सफल झाली. अकस्मात हरवलेली तुझी वाणी पुन्हा अकस्मात परत आली !

मला खूप खूप आनंद वाटतोय, आकाश !

**आकाश :** (अडखळत) पण–आ–आचार्य, मला भी–भीती वाटते—मला पुन्हा बोलता–येईल ? उद्या–परवा–

**शिवानंद :** येईल बेटा, येईल. माझे आशीर्वाद आहेत, आणि त्याची कृपा आहे. तुझं बोलणं आता कोणीही अडवू शकणार नाही. तुझं आणि तुझ्यासारख्या असंख्य निःशब्दांचंही–

**आकाश :** आचार्य, ही तुमची–तुमची–कृ–कृपा–

(पायावर झेप घेऊ लागतो.)

**शिवानंद :** (त्याला आडवीत) नाही बेटा, जे माणसं कष्ट करीत असतात, त्यांना तो करुणाकरच पुन्हा जीवन देत असतो.

पडदा

**अंक दुसरा समाप्त**

## अंक तिसरा

### प्रवेश पहिला

(राजवाड्याच्या परिसरात) मद्यप्राशन केलेले तिघे मानकरी. मद्य प्राशन करीत आहेत त्या वेळी.

**पहिला :** (उठतो आणि ओरडतो) थांबा, थांबा, असा गलका करू नका. गलका करून कोणताही प्रश्न सुटत नाही. माझा मूळ प्रश्न असा आहे की—

**दुसरा :** मूळ प्रश्न हे म्हणणंच चुकीचं आहे. मूळ प्रश्नाला पुन्हा मूळ प्रश्न असतो.

**तिसरा :** म्हणून तुझा प्रश्नच मूर्खपणाचा आहे. महाराज तुला मूर्ख म्हणतात ते उगाच नाही.

**पहिला :** ते खोटं आहे. महाराज आपल्या तिघांनाही मूर्ख महामूर्ख म्हणतात. त्यात ते कधीच पक्षपात करीत नाहीत.

**दुसरा :** त्यात काहीच गैर नाही. शहाणी माणसं बेइमान असतात, किंवा होतात. मूर्खांचं तसं नाही. ते पक्के निष्ठावंत असतात. आपण मूर्ख आहोत म्हणूनच महाराजांच्या खास तैनातीत आहोत. आपल्या मूर्खपणावर त्यांचा भरवसा आहे.

**तिसरा :** नुसता भरवसा नाही, श्रद्धा आहे.

**दुसरा :** तेच मला म्हणायचं आहे. पण तूर्त अशी जोडाक्षरं मला नको आहेत. सुरापानानं अक्कल जागी होते, पण जीभ जांभया द्यायला लागते. तिला असे जड शब्द पेलवत नाहीत. पण आमची अक्कल मात्र—

**तिसरा :** मूर्खांना अक्कलच नसते.

**दुसरा :** चूक! अक्कल सर्वांना असते. पण आम्ही ती वापरत नाही, कारण अक्कल वापरली की निष्ठा चालायला लागते.

**पहिला :** खड्डयात गेली तुमची अक्कल.

**दुसरा :** अक्कल कधीच खड्डयात जात नाही, माणसं जातात, पण अक्कल चिरंजीव असते, बिभीषणासारखी.

**पहिला :** मग तुम्हाला अक्कल असेल, तर माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या. हे असं का!

**तिसरा :** काय कसं का?

**पहिला :** मी पुन्हा विचारतो. महाराज आणि शिवानंद इतके मित्र असून आता शत्रू का झाले?

**दुसरा :** कारण उघडच आहे. फार मित्र होते, म्हणूनच शत्रू झाले.

**तिसरा** : बरोबर आहे. मी तुला विचारतो, कैरीचा आंबा का होतो ?

**पहिला** : ती पिकते म्हणून.

**तिसरा** : नाल्याची नदी का होते ?

**पहिला** : तो वाढतो म्हणून.

**तिसरा** : तसंच मैत्रीचं आहे. ती वाढत–वाढत–वाढत इतकी–वाढते की पुढे वाढायला जागाच राहात नाही. मग माणसांना शत्रू होण्यावाचून गत्यंतर नसतं म्हणजे वाढ व्हायला पुन्हा अवसर मिळतो.

**पहिला** : इतकी सुरा पिऊनही तुमची अक्कल जागी झालेली नाही. या प्रश्नाचं उत्तर मलाच सापडलं आहे.

**दुसरा** : केव्हा सापडलं ?

**पहिला** : काल रात्री सापडलं.

**तिसरा** : कुठे सापडलं ? काल रात्री तर तू—

**पहिला** : कुठे केव्हा हे प्रश्न गौण आहेत. सापडलं हे महत्त्वाचं.

**दुसरा** : म्हणजे तुला उत्तर आधी सापडलं आणि मग प्रश्न सापडला. की आधी प्रश्न सापडला—

**पहिला** : थांबा, अशा आडमाप बोलण्यानं माझं उत्तर डोक्यातून निसटून जाईल. गेलंच. मी काय विचारीत होतो ?

**तिसरा** : तू काहीच विचारीत नव्हतास. काल रात्री कुठे तरी सापडलेलं उत्तर तू आम्हाला सांगत होतास.

**पहिला** : बरोबर. दोघांच्या भांडणाचं मूळ कारण हे आहे की शिवानंद म्हणतो की देव सर्वांमध्ये आणि सर्वत्र भरलेला आहे. आणि महाराज म्हणतात, नाही. देव फक्त देवातच भरलेला आहे.

**दुसरा** : शिवानंद महामूर्ख आहे. देव सर्वांत आहे, म्हणजे माझ्यातही आहे, आणि, सर्वत्र आहे म्हणजे या पात्रात आणि या दारूतही आहे. म्हणजे देव देवातून देव पितो असं होईल.

**पहिला** : तेच मी म्हणतो, महाराजांचं म्हणणं बरोबर आहे.

**तिसरा** : ते सांगायची गरजच नाही या साध्या गोष्टीसाठी तू प्रश्नोत्तरांचं एवढं बंड माजवलंस. डोंगर पोखरून उंदीर काढलास शेवटी.

**दुसरा** : म्हणजे एका मोठ्या देवातून दुसरा छोटा देव काढलास.

**पहिला** : तुम्ही दोघेही मूर्ख आहात.

**दुसरा** : असूही. पण ते म्हणण्याचा अधिकार फक्त महाराजांचा आहे, तुझा नाही.

**पहिला** : मित्रहो, माझा प्रश्न महान् आणि फार गंभीर आहे. या मूळ कारणामुळे शिवानंदानं महाराजांविरुद्ध बंड उभारलं आहे. दुष्काळामुळे मरणाऱ्या कंगाल, जंगली

आणि हीन जातीजमातींच्या माणसांमधेही देव आहे, असं त्याचं म्हणणं. म्हणून त्या कंगाल देवांच्या रक्षणासाठी तो राजाविरुद्ध उभा राहिला आहे.

**तिसरा :** सगळेच देव असले तर मला त्या माणसांबद्दल खंत करायचं कारणच काय ? मी परवा एका जंगली गावात गेलो होतो. त्या गावात माणसं शिल्लकच नव्हती. झोपड्याझोपड्यांतून गिधाडांचे आणि कुत्र्यांचे थवे हिंडत होते. झोपड्यांत, शेतांवर, माळांवर, माणसं मरून पडली होती, किंवा मरायच्या तयारीत होती आणि गिधाडांचे थवे त्यांचे मांस कुरतडत होते. आता, सर्वांत देव म्हणजे गिधाडांतही देव. हे देव मरत होते, पण त्या देवांचं पोट भरत होतं मग मी म्हणतो, शिवानंदाला दुःख मानायचं कारणच काय ?"

**पहिला :** हे दुःख नाही, हे नुसतं वैर आहे. हे राजकारण आहे. राजकारणामध्ये जयघोष करायचा असतो, पण साधायचं असतं वैर. त्याला महाराजांचा नाश करायचा आहे.

**दुसरा :** त्याचा बाप स्वर्गातून वा नरकातून खाली उतरला तरी ते शक्य नाही. आम्ही महाराजांच्या पाठीशी उंदरासारखे, नाही, डोंगरासारखे उभे आहोत– अभेद्य–

**पहिला :** तुमच्या लक्षात आहे ना ? उद्या सकाळी पांडवपूरच्या डोंगरावर महाराज शिवानंदाला भेटणार आहेत.

**दुसरा :** आणि आपण त्यांच्याबरोबर जाणार आहोत..

**पहिला :** शिवानंद भामटा आहे.

**दोघे :** चोर आहे, बदमाष आहे.

**पहिला :** तो काय करील याचा नेम नाही. म्हणून आपण दक्ष राहिलं पाहिजे. महाराजांच्या रक्षणासाठी आपले प्राण दिले पाहिजेत.

**दोघे :** देऊ !

**पहिला :** मग करा प्रतिज्ञा. उपसा आपल्या तलवारी आणि–तलवारीवर तलवार ठेवून करा प्रतिज्ञा–

**दुसरा :** करतो– पण त्याच्या आधी हे सारं संपवून टाकू–

**पहिला :** ठीक आहे, संपवू–

(तिघे मद्य संपवतात)

**पहिला :** हं, आता प्रतिज्ञा. तलवारी उपसा–

**दुसरा :**<br>**तिसरा :** } (लटलटत) उपसल्या.

**पहिला :** भिडवा तलवारी.

**दोघे :** भिडवल्या.

**पहिला :** म्हणा, आम्ही प्रतिज्ञा करतो की–

**दोघे** : आम्ही प्रतिज्ञा करतो की–

(दोन वेळा हाच संवाद)

**पहिला** : काय प्रतिज्ञा करायची होती आपल्याला ? मी विसरलो.

**दुसरा** : मलाही आठवत नाही. काहीतरी गिधाडासंबंधी होती.

**तिसरा** : नाही, काहीतरी डोंगरासंबंधी आणि उंदरासंबंधी होती.

**पहिला** : ठीक आहे. आठवण होईल तेव्हा प्रतिज्ञा करू. तूर्त आपण फक्त जयजयकार करू.

**दुसरा** : शिवानंद महाराजांचा जयजयकार असो.

**पहिला** : महामूर्ख. महाराजांच्या नावाचा जयजयकार करायचा आहे आपल्याला म्हणा– राजाधिराज–

**तिघेही** : विशालदेव महाराजांचा जयजयकार असो.

# अंक तिसरा

## प्रवेश दुसरा

डोंगरमाथा.
मागे फक्त निळे आकाश.
जमिनीवर मध्यभागी लाकडाचे दोन ओंडके पुरेसे अंतर राखून ठेवलेले.
एका ओंडक्याजवळ एक सैनिक सशस्त्र उभा आहे. दुसऱ्या ओंडक्याजवळ आकाशनंद ( रंधवा ) कफनी पेहेरलेला, पण कमरेला कोयता बांधलेला उभा आहे.
क्षणभराने एका बाजूने शिंगतुताऱ्यांचे तर दुसऱ्या बाजूने शंखांचे आवाज ऐकू

[illegible] तीन निशाणवाले येतात, त्यांच्या मागे राजा. दुसऱ्या बाजूने तीन संन्यासी आणि शिवानंद प्रवेश करतात.
राजा शिवानंद परस्परांकडे पाहात खिळल्यासारखे उभे राहतात.
निशाणवाले आणि संन्यासी बाहेर जातात.

**राजा :** ( चिडलेल्या स्वरात ) भेट आपल्या दोघांचीच व्हायची, असं ठरलेलं आहे. हा गद्धा इथे कशाला उभा राहिला आहे? आणि तुझ्या मठातले जोगडे कमरेला कोयते बांधून फिरतात?

**शिवानंद :** ( हसून ) ती त्याची एक हौस आहे. जंगलात फिरताना वाटेतली झुडपं कापायला त्याला तो हवा असतो.

**राजा :** पलीकडे पुष्कळ झाडंझुडपं आहेत. ती तोडीत बसू दे त्याला. इथे कोणीही थांबायचं नाही. त्याला जायला सांग.

**शिवानंद :** आकाश, तू–

**आकाश :** ( मानेने हातांनी खुणावतो )

**शिवानंद :** ( स्मित ) तो म्हणतो, तो सैनिक गेल्याशिवाय मी जाणार नाही.

**राजा :** तो माझा शरीररक्षक आहे.

( आकाश खुणा करतो )

**शिवानंद :** तो म्हणतो मीही आचार्यांचा शरीररक्षक आहे.

**राजा :** ( संत्रस्त ) ठीक आहे... इथेच वाद व्हायला नको... ( रक्षकाला ) तू जा तिकडे, निशाणकऱ्यांबरोबर थांब... जा...

( रक्षक अभिवादन करून जातो, तो गेल्यावर आकाशही जातो. क्षणभर स्तब्धता )

**राजा :** मी तुला प्रणाम करायचा का ?

**शिवानंद :** ( स्मित ) नाही.

**राजा :** आणि आचार्य म्हणायचं का ?

**शिवानंद :** नाही. . . तेही आवश्यक नाही.

**राजा :** हे तरी एक बरं आहे.

( ओंडक्यावर बसतो. जमिनीकडे पाहात. क्षणभर स्तब्धता.)

**शिवानंद :** महाराज, आपली प्रकृती ठीक आहे ना ?

**राजा :** मी मेलो नाही अजून. म्हणजे फार वाईट नसली पाहिजे.

**शिवानंद :** मला बरी दिसत नाही. मद्यपान वाढलंय ?

**राजा :** ( ओरडतो ) माझ्या हातातला पेला हिसकावून घ्यायला कोण उरलंय राजवाड्यात आता ? एका भकास अंधेऱ्या भुयारातून मी एकटा भटकतो आहे. . एकटा !

**शिवानंद :** शिकारीला जात नाही ?

**राजा :** मी शिकारीला जात जाही, उद्यानात जात नाही, नौकाविहाराला जात नाही, देवळातही जात नाही ! राजसभेकडेही फार निकड असल्याशिवाय फिरकत नाही ! . . . ऐकलंस ? झालं तुझं समाधान ?

**शिवानंद :** मला वाईट वाटतं, महाराज.

**राजा :** ( उसळून ) महाराज ! तू मला पूर्वीसारखं राजन् म्हणणार नाहीस ? एवढा एक धागाही जिवंत ठेवणार नाहीस ? आपलं सगळं नातं तू इतक्या निर्दयपणानं ठेचून टाकलंस ? देवाचा सेवक झाल्याबरोबर माणसांची नाती तोडून टाकावी लागतात, इतक्या कठोरपणानं ?

**शिवानंद :** नाही, राजन् , मी खूप अधिक नाती आता जोडली आहेत, माणसांशीच. किंबहुना, देवाचा सेवक हा, प्रत्येक माणसाचा नातेवाईक असतो, असावा लागतो.

**राजा :** शिवा, तुझ्या सार्वजनिक अन्नछत्रातील ही पत्रावळ मला नको आहे ! तुझ्या प्रेमाचा प्रसाद तू ओट्यावर उभा राहून वाटतो आहेस. . . जंगलातल्या भिल्लापासून महारोगानं सडलेल्या माणसापर्यंत. . . सर्वांना. या सर्वांच्या रांगेमध्ये, हातात भिकेचा कटोरा घेऊन, मी तुझ्या प्रसादासाठी उभा राहू ? शिवा, पृथ्वीतलावरील सर्व माणसांतून मी तुला एकट्याला बाजूला काढला. माझा. . .सर्वस्वी माझा म्हणून. आणि तूही मला स्वीकारलंस. माझं जगणं मी तुझ्या जगण्यात भिरकावून दिलं होतं, आणि आता तू मला तुझ्या प्रेमाच्या सार्वजनिक भंडाऱ्यामध्ये बसवतो आहेस ?

**शिवानंद :** राजन्, मी तुम्हाला जितका हवा होतो, तितकेच तुम्हीही मला हवे होता. . . आताही हवे आहात, माझ्या मनातील तुमच्या संबंधीचा स्नेह तिळमात्र कमी झालेला

## अंक तिसरा

### प्रवेश दुसरा

डोंगरमाथा.

मागे फक्त निळे आकाश.

जमिनीवर मध्यभागी लाकडाचे दोन ओंडके पुरेसे अंतर राखून ठेवलेले.

एका ओंडक्याजवळ एक सैनिक सशस्त्र उभा आहे. दुसऱ्या ओंडक्याजवळ आकाशनंद ( रंधवा ) कफनी पेहेरलेला, पण कमरेला कोयता बांधलेला उभा आहे.

क्षणभराने एका बाजूने शिंगतुताऱ्यांचे तर दुसऱ्या बाजूने शंखांचे आवाज ऐकू येतात.

अल्पावकाशात तीन निशाणवाले येतात, त्यांच्या मागे राजा. दुसऱ्या बाजूने तीन संन्यासी आणि शिवानंद प्रवेश करतात.

राजा शिवानंद परस्परांकडे पाहात खिळल्यासारखे उभे राहतात.

निशाणवाले आणि संन्यासी बाहेर जातात.

**राजा** : ( चिडलेल्या स्वरात ) भेट आपल्या दोघांचीच व्हायची, असं ठरलेलं आहे. हा गद्दा इथे कशाला उभा राहिला आहे? आणि तुझ्या मठातले जोगडे कमरेला कोयते बांधून फिरतात?

**शिवानंद** : ( हसून ) ती त्याची एक हौस आहे. जंगलात फिरताना वाटेतली झुडपं कापायला त्याला तो हवा असतो.

**राजा** : पलीकडे पुष्कळ झाडंझुडपं आहेत. ती तोडीत बसू दे त्याला. इथे कोणीही थांबायचं नाही. त्याला जायला सांग.

**शिवानंद** : आकाश, तू–

**आकाश** : ( मानेने हातांनी खुणावतो )

**शिवानंद** : ( स्मित ) तो म्हणतो, तो सैनिक गेल्याशिवाय मी जाणार नाही.

**राजा** : तो माझा शरीररक्षक आहे.

( आकाश खुणा करतो )

**शिवानंद** : तो म्हणतो मीही आचार्यांचा शरीररक्षक आहे.

**राजा** : ( संत्रस्त ) ठीक आहे... इथेच वाद व्हायला नको... ( रक्षकाला ) तू जा तिकडे, निशाणकऱ्यांबरोबर थांब... जा...

( रक्षक अभिवादन करून जातो, तो गेल्यावर आकाशही जातो. क्षणभर स्तब्धता )

**राजा** : मी तुला प्रणाम करायचा का ?

**शिवानंद** : ( स्मित ) नाही.

**राजा** : आणि आचार्य म्हणायचं का ?

**शिवानंद** : नाही. . . तेही आवश्यक नाही.

**राजा** : हे तरी एक बरं आहे.

( ओंडक्यावर बसतो. जमिनीकडे पाहात. क्षणभर स्तब्धता.)

**शिवानंद** : महाराज, आपली प्रकृती ठीक आहे ना ?

**राजा** : मी मेलो नाही अजून. म्हणजे फार वाईट नसली पाहिजे.

**शिवानंद** : मला बरी दिसत नाही. मद्यपान वाढलंय ?

**राजा** : ( ओरडतो ) माझ्या हातातला पेला हिसकावून घ्यायला कोण उरलंय राजवाड्यात आता ? एका भकास अंधेऱ्या भुयारातून मी एकटा भटकतो आहे. . एकटा !

**शिवानंद** : शिकारीला जात नाही ?

**राजा** : मी शिकारीला जात नाही, उद्यानात जात नाही, नौकाविहाराला जात नाही, देवळातही जात नाही ! राजसभेकडेही फार निकड असल्याशिवाय फिरकत नाही ! . . . ऐकलंस ? झालं तुझं समाधान ?

**शिवानंद** : मला वाईट वाटतं, महाराज.

**राजा** : ( उसळून ) महाराज ! तू मला पूर्वीसारखं राजन् म्हणणार नाहीस ? एवढा एक धागाही जिवंत ठेवणार नाहीस ? आपलं सगळं नातं तू इतक्या निर्दयपणानं ठेचून टाकलंस ? देवाचा सेवक झाल्याबरोबर माणसांची नाती तोडून टाकावी लागतात, इतक्या कठोरपणानं ?

**शिवानंद** : नाही, राजन् , मी खूप अधिक नाती आता जोडली आहेत, माणसांशीच. किंबहुना, देवाचा सेवक हा, प्रत्येक माणसाचा नातेवाईक असतो, असावा लागतो.

**राजा** : शिवा, तुझ्या सार्वजनिक अन्नछत्रातील ही पत्रावळ मला नको आहे ! तुझ्या प्रेमाचा प्रसाद तू ओट्यावर उभा राहून वाटतो आहेस. . . जंगलातल्या भिल्लापासून महारोगानं सडलेल्या माणसापर्यंत. . . सर्वांना या सर्वांच्या रांगेमध्ये, हातात भिकेचा कटोरा घेऊन, मी तुझ्या प्रसादासाठी उभा राहू ? शिवा, पृथ्वीतलावरील सर्व माणसांतून मी तुला एकट्याला बाजूला काढला. माझा. . .सर्वस्वी माझा म्हणून. आणि तूही मला स्वीकारलंस. माझं जगणं मी तुझ्या जगण्यात भिरकावून दिलं होतं, आणि आता तू मला तुझ्या प्रेमाच्या सार्वजनिक भंडाऱ्यामध्ये बसवतो आहेस ?

**शिवानंद** : राजन्, मी तुम्हाला जितका हवा होतो, तितकेच तुम्हीही मला हवे होता... आताही हवे आहात, माझ्या मनातील तुमच्या संबंधीचा स्नेह तिळमात्र कमी झालेला

नाही, राजन्.

**राजा :** स्नेह असला तर तो पेटलेल्या दिव्यासारखा दिसायला हवा. तो आहे हे सांगावं लागत नाही.

**शिवानंद :** राजन्, तुम्ही समजून घेत नाही. आपल्यात जो विरोध निर्माण झालाय्...

**राजा :** थांब ! एवढ्यात नाही ! मंत्र्यांचा, महामंत्र्यांचा, सर्वांचा प्रतिकार झुगारून मी तुला इथे भेटायला आलोय. पुन्हा आपली भेट होईलच असा भरवसा नाही... मला थोडा वेळ, तुझ्यासमोर, तुझ्याजवळ, तुझी नजर अंगावर घेत बसू दे... तू महंत झाल्यापासून आज प्रथमतः मला दिसतो आहेस, भेटतो आहेस. या काळातील एकेक दिवस, नव्हे, एकेक क्षण मी कसा काढला असेल, हे तुला कधीच समजणार नाही. मालकाच्या हस्तस्पर्शाला पारखं झालेलं एक जनावर... इतर कोणालाही न कळणाऱ्या यातनांनी आतल्या आत तडफडणारं...

(क्षणभर स्तब्ध बसतो.)

**राजा :** (गदगदून) तुला माझी कधीच आठवण होत नाही?

**शिवानंद :** होते.... नेहमी होते. (बसतो)

**राजा :** मग तू माझ्याशी लढाई का मांडली आहेस ? का ?

**शिवानंद :** मी माझं काम करतो आहे फक्त.

**राजा :** मला चिरडायचं ? माझ्या सत्तेचा, माझ्या राज्याचा विध्वंस करण्याचं ?

**शिवानंद :** तसं मी काहीच करीत नाही, राजन्.

**राजा :** खोटं बोलतो आहेस, शिवा ! तू गावोगाव जाऊन लोकांना चिथावीत नाहीस ? राजाला कर देऊ नका म्हणून सांगत नाहीस ? शेकडो जोगड्यांचे जथे बरोबर घेऊन लोकांना बंड करण्याची चेतावणी देत नाहीस ? राजा मी पण सत्ता तुझी, सारे प्रजाजन तुझे भक्त आणि माझे वैरी... अशी परिस्थिती तू निर्माण केली आहेस ! तुमच्या लेखी सत्याला काही किंमत असली तर खरं सांग, हे सगळं तू करीत नाहीस ?

**शिवानंद :** (शांत, संथ स्वरात) होय हे सगळं मी करतो आहे. आणि विश्वास ठेवा यापुढेही करीत राहीन.

**राजा :** का-का ? माझा, माझ्या सत्तेचा नाश व्हावा म्हणून ?

**शिवानंद :** तुमच्या सत्तेशी मला काहीच कर्तव्य नाही, राजन्. मी तुमच्याशी लढत नाही, लढतो आहे, फक्त अन्यायाशी.

**राजा :** अन्याय ! कर घेणं हा राजाचा अधिकार आहे आणि तो देणं हे लोकांचं कर्तव्य आहे.

**शिवानंद :** लोकांनी कुठून द्यायचा कर, राजन् ? पावसाशिवाय उगवलेलं हे पाचवं वर्ष. आपण शिकारीला गेलो होतो आठवतं ? त्यानंतर पावसाचा एक थेंबही कुठे पडलेला नाही. भयानक दुष्काळाच्या जबड्यात लोक सापडले आहेत. खायला अन्न

नाही, आणि प्यायला पाणी नाही अशा अवस्थेत लक्षावधी लोक राहताहेत, पालापाचोळा खाऊन जगताहेत. आणि तुमचे सैनिक जाऊन लोकांची खोपटी घरं जाळताहेत, भांडीकुंडीच नव्हे तर घरातल्या बायकाही बाहेर काढून त्यांचा लिलाव करताहेत.

**राजा :** हा दुष्काळ असलाच तर तो मी निर्माण केलेला नाही. मला राज्य करायचं आहे आणि राज्य करण्यासाठी पावलापावलावर द्रव्य ओतावं लागतं. तुला माहीत आहे, तू माझा मानकरी होतास, महामंत्री होतास... आणि... ( गहिवरून ) माझा मित्रही होतास. एकटाच. तूच.

**शिवानंद :** राजन्, मी अजूनही तुमचा मित्र आहे.

**राजा :** ( त्वेषाने ओरडतो ) साफ खोटं! साता जन्मांचा वैरी झाला आहेस तू माझा. (थरथरत उठून उभा राहात ) हो खुशाल वैरी हो. पण सच्चेपणानं वैऱ्यासारखं वाग आणि वैऱ्यासारखं बोल. खोट्याचं ढोंग रचून मी तुझ्यावर केलेल्या प्रेमाची अशी विटंबना करू नकोस!

**शिवानंद :** ( उठून पुढे जात ) शांत व्हा राजन्.

**राजा :** शांतच आहे मी! तुला माहीत नाही...तू गेल्यापासून लांडग्याचे दात असलेली शांतताच कुरडते आहे मला, चहूकडून. सारंच शून्य आणि निरर्थक झालंय. एका अफाट, शांत, निःशब्द वाळवंटातून मी चाललो आहे. . .स्मशानानं नाकारलेल्या भुतासारखा. अंगावर कफनी चढवल्याबरोबर तू असा बदलशील अशी कल्पनाच त्या एका करंट्या क्षणी मला आली नाही.

**शिवानंद :** राजन्. . .

**राजा :** तुझ्या दयेची भीक मला नको आहे, शिवा. मी जाईन वाळवंट तुडवीत. पुन्हा त्या मित्रत्वाच्या गोष्टी काढू नकोस. त्याच्या प्रेतावर उभे राहून आपण एकमेकाशी बोलतो आहोत. या देशाचा राजा म्हणून मी तुला विचारतो,. . . हा ताण मला असह्य व्हायला लागलाय. . . मी विचारतो, तुला. . . संस्कृतीच्या वल्गना करणाऱ्या, धर्माध्यक्षाला. . . . महंताला, माझ्या प्रजेला पेटविण्याचा हा उद्योग तू बंद करणार आहेस की नाही?

**शिवानंद :** ( शांतपणे ) नाही.

**राजा :** नाही?

**शिवानंद :** त्रिवार नाही. राजन् मी मित्र होतो हे तुम्ही नाकारू शकाल, पण मी महामंत्री होतो हे तुम्हाला नाकारता येणार नाही. आणि मी मानकरी, महामंत्री होतो, म्हणूनच मला माहीत आहे. देशात दुष्काळ पडला, लोक अन्नावाचून तडफडत आहेत, आणि तुमचे मानकरी, मंत्री आणि देशातले सारे महाजन पक्वान्नांच्या राशी कुत्र्यांपुढे टाकताहेत, नायकिणींच्या नाचावर मोहरांची उधळण करीत आहेत, आणि

केशर कस्तुरीच्या मद्यात आपली माणुसकी बुडवीत आहेत. कुत्र्यामांजरांपेक्षा माणसाला हीन लेखणाऱ्या या तुमच्या संस्कृतीशी, राजन् माझा कधीच समेट होणार नाही. पण ही लढाई तुमच्या-माझ्यातील नाही. एकाच समाजातील दोन जगातली ही लढाई आहे. ती चालू राहणार आहे, आणि मी ती चालवणार आहे.

**राजा :** तू संन्याशी मठाधीश ! तू लोकांना कुऱ्हाडी उचलायला सांगतो आहेस, आमची धान्यभांडारं लुटायला सांगतो आहेस, धनिकांच्या कोठ्यावर, महाजनांच्या पेढ्यांवर दरोडे घालायला सांगतो आहेस—ही तुझी अहिंसा ! तू धर्माध्यक्ष आहेस की दरोडेखोरांचा नायक आहेस ?

**शिवानंद :** राजन्, अखेरच्या तळावर हिंसा-अहिंसेच्या प्रश्नापेक्षा न्यायाचा विचार अधिक महत्त्वाचा होतो. आणि मी कोणाला माणसं मारायला सांगत नाही. असंख्य माणसांची उपासमार होत असतांना, काही थोड्या माणसांनी धान्याचे साठे करून ठेवावेत आणि दुष्काळाचा फायदा घेऊन आपली संपत्ती वाढवावी... हे एक अमानुष आणि किळसवाणं पाप आहे असं मी मानतो. या पापाचा मी प्रतिकार केला नाही तर ज्या पदावर मी बसलो आहे त्याच्याशी द्रोह केल्यासारखं होईल.

**राजा :** आणि माझ्याशी... राजाशी द्रोह केल्याचं तुला सोयरसुतक नाही.

**शिवानंद :** मी राजाचा सेवक नाही. ज्या दिवशी या आसनावर मी बसलो, ही कफनी अंगावर चढवली, त्या दिवसापासून मी फक्त मला उमजलेल्या ईश्वराचा सेवक आहे.

**राजा :** देवाचं नाव घेऊन तू राजाचाच नव्हे, तर धर्माचाही द्रोह करतो आहेस. दुष्काळाच्या निवारणासाठी चार धर्मस्थळांत आमच्या पुरोहितांनी महायज्ञ सुरू केले... तर तुझ्या संन्याशांच्या नेतृत्वाखाली तुझ्या हजारो कंगाल कुत्तरड्यांनी यज्ञांचा विध्वंस करून लुटालूट केली...

**शिवानंद :** राजन, माणसांची आणि माणुसकीची अवहेलना करणारा धर्म हा धर्मच असू शकत नाही. धर्माचं आच्छादन घेऊन वावरणारा, आणि स्वार्थांध मिरासदारांची पायपूजा करणारा तो फक्त अधर्म ! पण या तात्त्विक विवेचनाशी सध्या मला कर्तव्य नाही. माझ्या मागण्या मान्य करा... माझी तुम्हाला विनंती आहे... राज्यातील सारी धान्याची कोठार लोकांसाठी तावडतोब खुली करा... ज्यांच्याकडे संपत्तीचे साठे कुजत पडले आहेत त्यांच्याकडून दुष्काळपट्टी वसूल करा... जागोजाग वसवलेली सैनिकांची ठाणी उठवा...

**राजा :** हे काहीही होणार नाही ! तुझी प्रवचनं ऐकण्यासाठी मी इथे आलो नाही माझे मानकरी, माझे महाजन, माझे अधिकारी... हे माझ्या सिंहासनाचे संरक्षक आहेत. त्यांना मी दुखवू ? झिडकारू ? आणि कोणासाठी, तर माणसाचा आकार घेऊन धरणीला भारभूत होणाऱ्या तुझ्या त्या केरकचऱ्यासाठी ? सोन्यामोत्यांची आहुती देऊन मी हा उकिरडा सांभाळणार नाही. ती सगळी माणसं मरून पडली तरी मला पर्वा नाही.

त्यांच्या रक्तामांसात... शिल्लक असेल तर... माझ्या जमिनीचा कस सुधारेल. मी हे काहीही करणार नाही. शिवा, मी तुझ्या अटी ऐकण्यासाठी आलो नाही. तू माझं ऐकणार आहेस की नाही हे विचारण्यासाठी, तुला शेवटची संधी देण्यासाठी आलो आहे. उद्या सकाळच्या आत हा सगळा विद्रोहाचा उठाव बंद झाला पाहिजे.

**शिवानंद :** नाही होणार.

**राजा :** ( अत्यंत क्षुब्ध ) मग शिवा, आपली ही भेट संपली. आपल्या संबंधाचा शेवटचा दुवा तुटला. आता आपली लढाई... लढाईच्याच मार्गानं... जातो मी ! ( एकदम भारावून ) एकदाच... शिवा... तुझा हात माझ्या हातात दे.... तू नाही तरी तुझ्या हाताचा तो स्पर्श मला पुढेही सोबत करीत राहील ! ( हात क्षणभर आवेगाने पकडतो. )

**शिवानंद :** राजन्...

**राजा :** ( असहायतेने ) जातो मी !

( निघून जातो. )

( शिवानंद त्याच्याकडे पाहात उभा राहतो. प्रकाश कमी होत फक्त त्याच्या चेहऱ्यावर केंद्रित होतो. )

## अंक तिसरा

### प्रवेश तिसरा

पूर्ण अंधार.
दोन तीन मशाली दोन्हीकडून येतात.
टाळ्यांचा आवाज.

**आवाज :** ऐका...
रानात राहणारे, शेतात राबणारे, लोहार, सुतार, गवंडी इ. कामकरी, वेशीच्या आत असणारे, वेशीच्या बाहेर बसणारे, सारे ग्रामस्थ, सारे वनस्थ सर्वांना सांगावा आहे की दुष्काळातून आणि उपासमारीतून आपल्याला वाचविण्यासाठी जिवाचं रान करणारे, सैनिक मानकऱ्यांच्या अत्याचारापासून आपलं रक्षण करणारे, आपले परमपूज्य धर्माध्यक्ष आचार्य शिवानंद यांच्याशी राजानं लढाई सुरू केली असून त्यांना मठाच्या आणि देशाच्या बाहेर घालविण्यासाठी राजाचं सैन्य मठावर चालून जात आहे. राजापासून आपल्या आवडत्या आचार्यांचं रक्षण करायचं काम आपणच सर्वांनी करायचं आहे. तेव्हा जित्या मनाच्या सर्व ग्रामस्थांनी, वनस्थांनी कुऱ्हाड, कोयता, काही घरात असेल ते शस्त्र घेऊन मठाकडे धाव घ्यावी. आचार्य शिवानंदांचा जयजयकार असो.

( टाळ्यांचे आवाज.
क्षणभराने—
आवाज तीव्र होतात.
आणि स्टेजवरील अंधारात चहूबाजूंनी अनेक मशाली,
आदिवासी वाद्यांचा गजर करीत दृश्य होतात. )

अंधार

# अंक तिसरा

## प्रवेश चौथा

राजवाडा.
वेळ : सकाळची.
राजा प्रक्षुब्ध—फेऱ्या मारीत आहे.
बाजूला सेनापती खाली मान घालून उभा.
पलीकडे तीन मानकरी पुतळ्यांसारखे नित्याप्रमाणे उभे.

**राजा** : भ्याड ! भ्याड आणि मूर्ख ! महामूर्ख आणि भेकड लोकांच्या गराड्यात मी सापडलो आहे. तो एक मला सोडून गेल्यापासून या राज्यातील सारी अक्कल आणि सारी वीरताही आम्हाला सोडून गेली आहे. ( थांबून सेनापतीकडे वळतो ) तुम्ही पाचशे शस्त्रसिद्ध सैनिक घेऊन गेलात— आणि चामडं चघळल्यासारखी थोबाडं घेऊन परत आलात. का—का नाही त्याचा मठ हस्तगत केलात ? का नाही त्याला बंदिवान करून कारागृहात पाठवलंत ? मी तुम्हाला अनुलंघ्य आदेश दिला होता... मठ आणि मठाधीश हे दोन्ही आज माझ्या ताब्यात आले पाहिजेत ! आणि तुम्ही माझे सेनापती, शेदोनशे मरतुकड्या भिल्लांच्या कुऱ्हाडी पाहून माघारी आलात...

**सेनापती** : महाराज, आपण ऐकून घ्यावं अशी विनंती आहे.

**राजा** : सांगा...सांगा तुमच्या पराक्रमाची कहाणी.

**सेनापती** : महाराज, मठाला पडलेला वेढा शेदोनशे किंबहुना हजार लोकांचा असता तरीही आम्ही मठावर हल्ला केला असता...पण पाचपंचवीस नव्हे, हजार नव्हे तर किमान तीन-चार हजार खेडूत माणसं, कुऱ्हाडी, कोयते आणि फरश्या घेऊन मठाच्या सभोवार तळ घालून बसले आहेत. आमच्या सैन्याची चाहूल लागताच, माणसांच्या प्रचंड भिंती पहाडासारख्या मठाच्या मार्गावर उभ्या राहिल्या. त्या पहाडांवर चालून जाणं म्हणजे निव्वळ आत्महत्या करण्यासारखं होतं.

**राजा** : पण गध्यांनो, तुमच्याजवळ जबरदस्त शस्त्रं होती. तलवारी, भाले, धनुष्य... त्यांच्या कुऱ्हाडी, कोयत्यांची तुम्हाला धास्ती वाटली !

**सेनापती** : क्षमा करा महाराज, पण त्यांच्याजवळ एक जबरदस्त शस्त्र होतं, जे सर्व शस्त्रांचा पराभव करू शकतं.

**राजा** : कोणतं असं शस्त्र ?

**सेनापती** : श्रद्धा.

**राजा :** श्रद्धा ?

**सेनापती :** होय महाराज, प्रत्येक माणूस म्हणजे एकेक वणवा होता. जाळण्यासाठी आणि जळण्यासाठी तयार झालेला. वेतनासाठी लढणारे सैनिक श्रद्धेसाठी लढणाऱ्यां-समोर उभे राहू शकत नाहीत.

**राजा :** पण राजावर श्रद्धा नाही सैनिकांची ? मी त्यांना वेतन देतो, खायला देतो, जगवतो...

**सेनापती :** महाराज, श्रद्धा वेतनात नव्हे तर माणसांच्या मनात उगवते. आणि म्हणून आपले निम्मेअधिक सैनिक मठाला जाऊन मिळाले आहेत. मठाविरुद्ध हत्यार उचला-यला ते तयार नाहीत.

**राजा :** ( संतप्त ) विश्वासघात ! विश्वासघात ! तुमची सेनाच नव्हे, तर हे शब्द उच्चारणारी तुमची जीभसुद्धा विश्वासघातकी, राजद्रोही आहे ! सेनापती, या क्षणापासून तुम्ही...

**सेनापती :** मी माझ्या पदाचं त्यागपत्र दिलंय महाराज, महामंत्र्यांकडे.

**राजा :** तुम्हीही त्या जोगड्यांनी उभ्या केलेल्या पहाडात सामील होणार आहात ?

**सेनापती :** इतकं धैर्य मला नाही, महाराज पण मी त्यांच्याविरुद्ध लढणार नाही. लढू शकणार नाही, म्हणूनच माझ्या अधिकारपदाचा मी त्याग करतो आहे.

**राजा :** जा–चालते व्हा ! मला कोणाचीही गरज नाही. सगळे मानकरी अधिकारी सैनिक मला सोडून गेले तरी मी शरण जाणार नाही ! मी लढेन...माझ्या शरीराच्या कातडीत शेवटचा श्वास शिल्लक असेपर्यंत...जा...चालते व्हा...

**सेनापती :** अखेरचा प्रणिपात, महाराज

( जातो )

**राजा :** ( आसनावर कोसळतो ) सारंच काही अखेरचं ! ( मानकऱ्यांकडे पाहून ) तुम्ही तिघेच माझ्या विश्वासाचे उरले आहात...का तुम्हीही...

**मानकरी :** नाही महाराज, कधीही नाही !

**राजा :** तो माझा सर्वनाश करायला ठाकलाय्. महामंत्र्यापासून द्वारपालापर्यंत... कोणावरही माझा विश्वास राहिलेला नाही. सारं राज्य राजद्रोहानं आणि फितुरीनं किडून गेलं आहे ! ( राणी येते )

**राणी :** सेनापती गेले, मंत्री आणि महामंत्री बांगड्या भरून घरात बसले आहेत... आता कपाळ बडवून घ्या नुसतं ! मी पहिल्यापासून सांगत होते, त्या हलकट माणसाला जवळ करू नका ! तो केव्हातरी तुमच्या गळयाला तात लावल्याशिवाय राहणार नाही. उकिरड्यावर वाढलेल्या अशा नीच माणसाला जवळ केलं म्हणजे....

**राजा :** महाराणी ! मी तुम्हाला पुन्हा सागतो, शिवासंबंधी अशी शिवराळ भाषा मी तुमच्याकडून ऐकून घेणार नाही. नशिबाचे फासे असे पडले आहेत की माझ्या

आयुष्याला प्रेम आणि आधार देणारा माझा एकमेव मित्र, आज माझा शत्रू झाला आहे. पण हा लढा त्याच्या-माझ्यामधला आहे. मी लढेन त्याच्याशी. पण त्यात तुम्ही आपलं नाक खुपसण्याची आणि मला सल्ला देण्याची गरज नाही. कशाला इथे आलात तुम्ही? बदाम-बेदाण्याचे मोदक खात आपल्या मंचकावर लोळत राहा... हा प्रांत तुमचा नाही !

**राणी :** का नाही? मी या राज्याची राणी आहे. राजपुत्राची आई आहे. मद्याच्या घोटांमध्ये आणि बायकांच्या मिठ्यांमध्ये आयुष्यभर तुम्ही संपत्तीची नासाडी केलीत... तरी मी शांत राहिले. पण आता तुम्ही आपल्या राज्याचा लिलाव करायला निघाला आहात, आणि तरी मी स्वस्थ राहू? राज्य तुमचं एकट्याचं नाही, जितकं तुमचं, तितकंच माझं आहे, माझ्या मुलाचं आहे, त्या भामट्याच्या घशात मी ते जाऊ देणार नाही !

**राजा :** शिवा राज्य घ्यायला येणार आहे ! आचार्यांचं पद स्वीकारल्याबरोबर ज्यानं आपली सारी मालमत्ता गुलालासारखी उधळून दिली...एक जरीची चिंधी, सोन्या-चांदीचा एक तुकडा ज्यानं जवळ ठेवला नाही...

**राणी :** ( हसते ) महाराज, मी एका सम्राटाची मुलगी आहे 'आणि आपण एका दीडवितीच्या रानटी राज्याचे राजे आहात. आपल्याला राजकारणाचे रंग अजूनही कळलेले नाहीत. वैराग्याचा वेष चढवून भामटे जगाला फसवीत असतात. शिवानंदाचा डाव तुम्हाला अजून कळला नाही. कधी कळणारही नाही.

**राजा :** कसला डाव ?

**राणी :** आज तीन-चार हजार जंगली लोक त्यानं मठाभोवती जमवले आहेत... कशासाठी ? त्याची पाखंडी प्रवचनं ऐकण्यासाठी ? नाही, महाराज, मला कळलंय... ही सारी रानटी सेना घेऊन तो उद्या परवा राजधानीवर चालून येणार आहे. आणि तुम्हाला मारून किंवा कारावासात टाकून स्वतः राजा होणार आहे. जो एका रात्रीतून महामंत्र्याचा मठाधीश झाला तो दुसऱ्या एका रात्री मठाधीशाचा राजा व्हायला काहीच प्रत्यवाय नाही. दुष्काळाचं निमित्त... मी सर्वत्र शोध घेतला. कुठेही दुष्काळ नाही ..कोणीही उपासमारीनं मरत नाही...कोणीही...

**राजा :** महाराणी...दुष्काळ असेल वा नसेल. पण ज्यांची पोटं पंचपक्वानांनी दिवसातून दोन वेळा, फाटेपर्यंत फुगत असतात, त्यांनी उपासमारीची चर्चा करू नये...जा...तुम्हाला हवं ते करा

**राणी :** तेच मी सांगायला आले आहे. मी आजच सकाळी माझ्या पिताजींकडे निरोप पाठवला आहे...की हा संदेश मिळताच वीसपंचवीस हजारांचं सैन्य घेऊन सेनापतीला तत्काल इकडे रवाना करा...मद्याच्या आणि मित्रप्रेमाच्या नशेत बुडालेले तुमचे जामात राज्याचं आणि माझं रक्षण करायला असमर्थ आहेत.

**राजा :** जा...चालत्या व्हा! क्षणभर इथे उभ्या राहिलात तर दीडवितीच्या रानटी राज्याचा हा स्वामी, तुमचा घरंदाज गळा घोटायला कमी करणार नाही...जा... माझी सहनशक्ती संपली आहे...

**राणी :** जे सांगायचं होतं ते मी सांगितलं आहे. चार दिवसांत पिताजींचं सैन्य राजधानीत येऊन पोचेल .. आणि मग... मग काय होईल ते तेव्हाच कळेल तुम्हाला... (जाते.)

(क्षणभर स्तब्धता)

**राजा :** परमेश्वरा, कोणत्या पापाचं असं भयानक प्रायश्चित्त देतो आहेस मला! वाघाच्या जबड्यात हात घालणारा मी... आज असा शेणाच्या गोळासारखा निःसत्त्व, नादान आणि निकामी होऊन पडलो आहे! विश्वासघाताचे आणि द्रोहाचे डोंगर चहूकडून माझ्या अंगावर कोसळत आहेत... सेनापती विश्वासघातकी, सेना विश्वासघातकी आणि बायकोही विश्वासघातकी! (बेहोश होऊन) कोणीच... कोणीच... माझ्याशी इमान ठेवणारे नाहीत? (तीन मानकऱ्यांकडे पाहून) तुम्ही देखील? माझे जिवाला जीव देणारे म्हणून मी तुम्हाला मानलं... (किंचाळत) का तुम्ही जात नाही आणि त्याला ठार करीत नाही? भेकड! भेकड आणि नादान! (मंचकावर डोकं आपटून आदळतो) नाही... आम्ही दोघं या पृथ्वीवर जिवंत राहणार नाही... एक तो तरी मरेल किंवा मी तरी! आणि हे जर कोणीच करणार नसेल तर...तर...

(डोके उचलून वर पाहतो, त्याचे बोलणे चालू असता तिघे मानकरी एकमेकांना संकेत करून एकामागे एक असे बाहेर गेलेले असतात. राजाच्या लक्षात येते .. तो धडपडत उठतो... आणि दोन्ही हातांनी छाती दाबून घेणाऱ्या स्वरात उद्गारतो— )

**राजा :** ते गेले?. . हाय रे देवा!... (ओरडतो) शिवा! माझा शिवा! माझा लाडका शिवा! (भिंतीवर कोसळतो.)

म. ग्रं. सं. ठाणे.
क्र. २१६४४ दि. १५.१० ९६
नाटक

# अंक तिसरा

## प्रवेश पाचवा

मठ.

आतले दालन.

छोट्या चौथऱ्यावर बुद्धाची मूर्ती.

वेळ : सायंकाळचा सुमार.

शिवानंद आणि आकाश, दोघेही सामानाची आवराआवर, बांधाबांध करीत आहेत.

बाहेरून येणारे ढोलक्याचे. तारवाद्यांचे आवाज.

**शिवानंद** : ( काही पुस्तके चाळीत ) आकाश, मला खरोखर नवल वाटतं, इतक्या थोड्या दिवसांत तू इतकं चांगलं बोलायला लागलास. तुला स्वतःला नाही आश्चर्य वाटत ?

**आकाश** : ( सर्व बोलणे अडखळत, नव्याने प्रयोग करीत असल्याप्रमाणे ) होय... आचार्य.

**शिवानंद** : हे दोन ग्रंथही बांधून घे त्या बासनात. त्या केशरी...( पुस्तक पाहताना ) आकाश, इतके नवे नवे शब्द तुला भेटायला येताहेत. तुझ्या काळजातून वर उसळाहेत. कोणता एक शब्द तुला सर्वांत अधिक आवडला... आवडतो ?

**आकाश** : तुम्ही.

**शिवानंद** : ( हसतो ) तुम्ही ? तुम्हीला तसा काही ठराविक अर्थ नाही. जो कोणी आपल्यासमोर येतो तो प्रत्येकजण तू किंवा तुम्ही असतो. सगळेच तुम्ही तुला आवडतात ?

**आकाश** : नाही... फक्त तुम्हीच तुम्ही.

**शिवानंद** : वेड्या, मी तुला कोणता माणूस आवडतो हे विचारलं नाही. कोणता शब्द?

**आकाश** : ( डोळे लाजवीत ) श–श–शब्द...

**शिवानंद** : नाही सांगता येत ?

**आकाश** : ( उत्साहाने ) हो–

**शिवानंद** : कोणता ?

**आकाश** : प्र–प्र–प्रेम.

**शिवानंद** : शाबास बेटा ! आपल्या पंथाचं सारं तत्त्वज्ञान तू एका शब्दात सांगितलंस.

IRBK-0121644

हेही ग्रंथ घे–माझी सगळी उपकरणं त्या संदुकीत ठेवलीस ?...

**आकाश :** हो... आचार्य... एक–प्र–प्र–प्रश्न...

**शिवानंद :** विचार की, काहीही मनात ठेवायचं नाही. सारखं बोलत जा... काम करताना, हालचाल करतानाही, दुसऱ्याशी नाही, तरी स्वतःशी. असंच बोलणं वाढत जाईल... तू आता बांधतो आहेस... म्हण, मी बांधतो आहे.

**आकाश :** मी बांधतो आहे.

**शिवानंद :** आता तू चालतो आहेस... म्हण, मी–

**आकाश :** मी चालतो आहे... मी बोलतो आहे... ( आनंदाने हसतो ) मी हसतो आहे.. आचार्य, मला खूप खूप....

**शिवानंद :** मजा वाटते ?

**आकाश :** मजा वाटते.

**शिवानंद :** पण तुझा प्रश्न राहिलाय. काय विचारणार होतास ?

**आकाश :** ( साभिनय ) तुम्ही रागवाल...

**शिवानंद :** नाही... विचार.

**आकाश :** ( अवघडत ) प्र–प्र–प्रेम कुठे ( हातवारे करीत ) थांबतं ?

**शिवानंद :** प्रेम परमेश्वराच्या पायाजवळ थांबतं आणि तिथंच विलीन होतं. ( त्याचे डोके हालवीत ) शिरलं का डोक्यात ?

**आकाश :** नाही.

**शिवानंद :** जाऊ दे. खरं म्हणजे माझ्याही डोक्यात ते नीट शिरलेलं नाही. आम्हा बोलणाऱ्यांच्या बाबतीत हाच गोंधळ होऊन बसतो, बेटा. आमच्या जिभा बोलत असतात. पण मनं मात्र रिकामीच राहतात. ( हसतो ) अर्थासाठी निर्माण झालेला शब्द... आम्ही अर्थशून्य केला आहे... ( हसत ) म्हणून तू निःशब्द होतास तेव्हाच खरोखर जास्त बोलत होतास... पूजेची तयारी करून ठेवलीस ? आज या मठातली ही शेवटची पूजा...

**आकाश :** ( जोराने मान हालवीत ) नाही....

**शिवानंद :** नाही ? आज रात्रीच, मृगाचं नक्षत्र माथ्यावर आल्याबरोबर आपण हा मठ सोडणार आहोत, बेटा. सर्व आश्रमवासियांनी प्रवासाची सिद्धताही केली आहे. तुला ठाऊक नाही ?

**आकाश :** आहे... पण का ?

**शिवानंद :** राजाचा आदेश आहे.

**आकाश :** नाही, मानायचा.

**शिवानंद :** नाही ? ( हसत ) मग काय करायचं ? लढायचं ?

**आकाश :** ( साभिनय ) लोक तयार आहेत.

**शिवानंद :** माझ्या रक्षणासाठी तीनचार हजार वनवासी ग्रामवासी लोक कुऱ्हाडी-काठ्या घेऊन मठाकडे धावत आले, सभोवार तळ ठोकून बसले हे माझं परम भाग्य आहे. ते होते म्हणूनच राजाचं सैन्य काल माघारी गेलं... लोकांचा माझ्यावरचा हा विश्वास पाहून मला समाधान वाटलं, अभिमान वाटला.[३] पण बेटा, या शक्तीचा मी दुरुपयोग करणार नाही. आज संध्याकाळच्या प्रवचनात मी सर्वांना आपापल्या गावी, आपापल्या घरी जायला सांगणार आहे... नव्हे आदेश देणार आहे

**आकाश :** ( हातवारे करीत ) का–का ? .. आपण शस्त्र वापरायचं नाही ?

**शिवानंद :** ( हसतो ) तसाच प्रसंग पडला तर शस्त्र वापरायला माझा आक्षेप नाही. मुळीच नाही. पूर्वीच्या मठाधीशांसारखा मी काही शस्त्राला बुजणारा, ते त्याज्य मानणारा माणूस नाही. एखादा दुर्जन घटिंगण माझ्या डोळ्यांसमोर एखाद्या स्त्रीवर बलात्कार करायला लागला, एखाद्या दुबळ्याला मारायला लागला तर आजही, मठाधीश झाल्यावरही... मी हातात शस्त्र घेईन आणि त्याचा निःपात करीन. सद्गुणांच्या आणि सज्जनांच्या रक्षणासाठी अखेरचा मार्ग म्हणून शस्त्रांचा स्वीकार करण्यात काहीही पाप नाही. ( हसतो. ) आणि माझ्यासारख्या पूर्वाश्रमीच्या लढवय्याला तर ते अशक्यही नाही पण तो मार्ग अखेरचा, आणि तशाच काही कारणासाठी मठाचं हे दगडविटांचं बांधकाम माझ्या ताब्यात राहावं म्हणून मी लढायचं आणि उपासमारीनं गांजलेल्या माझ्या मित्रांचं रक्त सांडायचं ? मुळीच नाही. मठ राजाच्या पूर्वजांनी बांधलेला, त्याच्याच मालकीचा आहे. मोठ्या लढाया मोठ्या प्रश्नावरच करायच्या असतात बेटा... आणि या प्रचंड प्रासादाची मला काय गरज आहे ? मठाचीही नाही आणि राजानं दिलेल्या उत्पन्नाचीही नाही. माझं काम एखाद्या झोपडीत राहूनही मी करू शकेन. किंबहुना तिथे राहूनच केलं पाहिजे. नाही म्हटलं तरी या अशा प्रशस्त भिंतींतून सुखासीनतेचं आणि अहंकाराचं विष शेवटी झिरपायला लागतं आणि मग आश्रमांचे राजवाडे व्हायला लागतात. ( हसतो ) मी इथेच प्रवचनाला सुरुवात केली की !– जाऊ दे ते... उद्या आपला सूर्य कर्नाटच्या जंगलात उगवणार आहे एवढं लक्षात ठेव... पूजेचं साहित्य तयार ठेवलं आहेस ?

**आकाश :** हो–

( बाहेर गलका होतो )

**शिवानंद :** कसली गडबड आहे आकाश ?

( संन्यासी येतो. )

**संन्यासी :** आचार्य, राजाधिराजांकडून तीन मानकरी आले आहेत. आपली भेट मागताहेत.

**शिवानंद :** हा गलका कसला आहे ?

**संन्यासी :** महाद्वाराजवळ असलेले लोक त्यांचा मार्ग अडवून उभे राहिले आहेत. कोणालाही आत सोडायला ते तयार नाहीत

**शिवानंद :** काय म्हणताहेत मानकरी ? कशासाठी भेट हवी आहे ?

**संन्यासी :** महाराजांनी आपल्यासाठी काही खास संदेश दिला आहे, असं म्हणतात.

**शिवानंद :** त्यांना आत घेऊन या...

**संन्यासी :** आचार्य, ते सशस्त्र आहेत.

**शिवानंद :** ( हसतो ) शस्त्र हा एक मानकऱ्यांच्या वेशभूषेचा भाग असतो. काही चिंता करायचं कारण नाही... शक्यता आहे की राजाचा विचार बदलला असेल. आपल्या मागण्या मान्य करायला तो तयार झाला असेल. काहीही असलं तरी मी त्यांना भेट नाकारणार नाही.

**संन्यासी :** पण लोकांचा प्रतिकार....

**शिवानंद :** हा आकाश येईल तुमच्याबरोबर. लोकांना माहीत आहे, आकाशाचा शब्द म्हणजे माझा शब्द. जा आकाश... कोणीही त्यांच्या अंगाला हात लावता कामा नये... जा...

( संन्यासी आकाश जातात.
क्षणभर स्तब्धता.
शिवानंद मूर्तीसमोर उभा राहतो. )

**शिवानंद :** हे सर्वात्मका,

शब्दाविना झालेला संवाद तुला समजू शकतो.

पण शब्दांचा उच्चार स्वतःच्या संकल्पांना आधार आणि बळ देण्यासाठी करावा लागतो.

परात्परा,

या प्रासादतुल्य मठातली ही आपली शेवटची भेट... शेवटची संध्याकाळ. तसे आपण विलग कधीच होणार नाही आणि कधी झालोही नव्हतो. मी राजाच्या सेवेत होतो, मद्य-मदिराक्षीच्या बाहुपाशात होतो, सुखासाठी धावत होतो, अधिकारासाठी हपापत होतो...

तेव्हाही–

काळजात घुसणाऱ्या बाणासारखा, तू मला, व्यथा वेदना होऊन भेटत होतास, माझ्या जागेपणालाही जाग देत होतास...

लाखो लोकांच्या संगतीत अस्तित्वाचा महोत्सव साजरा करीत असताना तू मला बाजूला ओढून घेत होतास...

आणि एकाकीपणाचं, अर्थशून्यतेचं एक विराट ओझं माझ्या लहानशा मस्तकावर टाकीत होतास...

तू माझ्याबरोबर नव्हतास, पण लपंडाव खेळणाऱ्या बालकाप्रमाणे एखाद्या झुडपा-आड लपून तू माझी शोधाशोध मिष्कील नजरेनं पाहात होतास- पण मी शेवटी तुला शोधून काढलं. चुकलो...माझी अगतिकता पाहून तूच लंपडाव थांबवलास आणि पुढे येऊन मला आपल्या छातीशी घेतलंस. जवळ येण्यासाठी आणि राहण्यासाठी तू फार मोठं मूल्य घेतोस....
तसा तू कठोरच... तू मागितलंस ते मी दिलं आहे, आणि देणार आहे. पण सहस्रा-वधींचे प्राण घेणारा हा दुष्काळ हाही त्या मूल्याचाच एक भाग आहे? राजाशी होणारा हा संघर्ष...
विसरलो मी... क्षमा कर, मला माहीत आहे, तुला प्रश्न विचारायचे नसतात, प्रश्न विचारणाऱ्यांच्या समोर तू महाप्रश्नांचे दावानल पेटवतोस आणि त्यात त्यांना त्या प्रश्नांसकट जाळून टाकतोस. जिथे प्रश्न संपतात, तिथेच तुझी भेट होते, आणि तिथेच तुझ्या आश्वासक हाताचा स्पर्श होतो.
पण स्वामी,
मी आता संपूर्ण आनंदाचा धनी आहे. जे शोधत होतो ते सापडलं आहे, जे हवं होतं ते मला पुरेपूर मिळालं आहे.
आता आपली साथ कधीच सुटणार नाही या पृथ्वीवरच्या मातीमधील माझा प्रवास एका क्षणाचा असो वा एका शतकाचा असो... ( नमस्कार करतो )

( संन्यासी येतो. )

**संन्यासी :** आचार्य, मानकरी आले आहेत.

**शिवानंद :** येऊ दे त्यांना आत... संन्यासी, ही धडधड कसली ऐकू येते आहे? कुणाच्या तरी काळजाचे ठोके आकाशभर पसरत असल्यासारखी ?

**संन्यासी :** आचार्य, बाहेर भिल्ल लोक नगाऱ्याच्या तालावर नाच करीत आहेत, त्याची असेल.

**शिवानंद :** असेलही. पाठव त्यांना आत.

( संन्यासी जातो. तीन मानकरी आणि आकाश येतात. मानकरी येत असताना धडधडीचा आवाज क्षणभर वाढतो. हा आवाज कमी अधिक होत प्रवेशाच्या शेवटपर्यंत चालूच राहतो. )

**मानकरी :** आचार्यांना आमचे प्रणाम असोत.

**शिवानंद :** कल्याण असो. माझ्या मित्राचं कुशल आहे ना ?

**१ मानकरी :** होय आचार्य.

**शिवानंद :** काय संदेश आहे राजाचा ?

**२ मानकरी :** क्षमा करा, आचार्य, पण तो फक्त आपल्यासाठीच आहे. इतर कोणीही तो ऐकू नये असा महाराजांचा आदेश आहे.

**शिवानंद :** या आकाशसंबंधी म्हणता ? तो माझ्यापेक्षा वेगळा नाही.

**३ मानकरी :** पण महाराजांची आज्ञा आम्हांला ओलांडता येत नाही. जे सांगायचं आहे ते फक्त आपल्यालाच.

**शिवानंद :** ठीक आहे. आकाश, तू बाहेर जा.

**आकाश :** ( मान हलवीत ) नाही.

**शिवानंद :** आकाश, ( खांद्यावर हात ठेवून) जा बेटा. हे माझ्या मित्राचे दूत आहेत, माझे मित्र आहेत. तुला काळजी करायचं काहीही कारण नाही. आणि हे बघ... प्रवचनाची वेळ होत आली आहे. बाहेरच्या जमावाला अशोकाच्या झाडासमोरील मैदानावर एकत्र जमायला आणि शांतपणाने बसायला तू सांग. मठाच्या अधिकाऱ्यांना निरोप दे...सूर्यास्त होण्याच्या आत प्रार्थनेला प्रारंभ व्हायला हवा. जा... वेळ थोडा आहे. लोक बसेपर्यंत मी तिकडे येतो. जा...

**आकाश :** आदेश आहे ?

**शिवानंद :** होय, आदेश आहे.

**आकाश :** प्रणाम.

( जातो. शिवानंद एका आसनावर बसतो. तो बसताच तिथे मानकरी त्याच्या तीन बाजूला पटकन् जाऊन उभे राहतात. )

**शिवानंद :** ( स्मित ) हा व्यूह कशासाठी ?

**१ मानकरी :** क्षमा करा आचार्य. महाराजांचा निरोप खाजगी आहे. फक्त आपल्यासाठी. इतर कोणी आत येतात की काय हे आम्हाला पाहता येईल.

**शिवानंद :** ठीक आहे. सांगा राजाचा निरोप ..

**२ मानकरी :** मठाला असलेला वनवासींचा वेढा आज सूर्यास्त होण्याच्या आत उठला पाहिजे.

**शिवानंद :** नाही उठणार.

**३ मानकरी :** उद्या सूर्योदयाच्या आत, आपल्या सर्व संन्याशांसह तुम्ही राज्याची सीमा ओलांडून बाहेर जायला पाहिजे.

**शिवानंद :** नाही जाणार.

**१ मानकरी :** राज्यातील कोणत्याही गावाला, वस्तीला, तुम्ही वा तुमच्या संन्याशांनी भेट देता कामा नये, किंवा त्यांच्याशी बोलता कामा नये.

**शिवानंद :** तेही होणार नाही... पुढे ?

**२ मानकरी :** आचार्य, राजाला शरण या...

**शिवानंद :** नाही येणार... ठीक आपली भेट संपली... माझी प्रार्थनेची वेळ झाली.

( आसनावरून उठत असताच तिघेजण तीन बाजूंनी त्याच्यावर तुटून पडतात. खाली पाडून तलवारीचे घाव घालतात आणि तलवारी म्यानबंद करून एका

पाठोपाठ एक, बाहेर जातात. रक्तबंबाळ झालेला शिवानंद धडपडत सरपटत मूर्तीजवळ जातो आणि चौथऱ्यावर हात टेकून म्हणतो–)

**शिवानंद** : हेच मोल तुला हवं होतं ? हे तर सर्वांत सोपं... सुखाचं... आता मी तुझाच...

कायमचा... सर्वस्वी तुझाच...

तमसो मा ज्योतिर्गमय...

मृत्योर्मा अमृतं गमय...

( कोसळून पडतो.... मरतो. आकाश आत येतो. ते दृश्य पाहून क्षणभर स्तंभित होतो आणि नंतर किंकाळी फोडतो...)

**आकाश** : खून ! माझ्या स्वामीचा खून !

( जवळच एक दोर घंटेचा टांगलेला असतो. तो दोराकडे धावतो आणि पिसाटपणाने दोर ओढायला लागतो. बाहेर अनेक घंटा वाजायला लागतात. घंटांचा नादकल्लोळ होत असतानाही आकाश दोर ओढतच राहतो.... हे सर्व चालू असतानाच...

अंधार

**शिवानंद :** या आज्ञाधारकांशी म्हणता ? तो माझ्यापेक्षा मोठा नाही.

**३ मानकरी :** पण महाराजांची आज्ञा आम्हांला ओलांडता येत नाही. जे सांगायचं आहे ते फक्त आपल्यालाच

**शिवानंद :** ठीक आहे. आकाश, तू बाहेर जा.

**आकाश :** ( मान हलवीत ) नाही.

**शिवानंद :** आकाश, ( खांद्यावर हात ठेवून) जा बेटा. हे माझ्या मित्राचे दूत आहेत, माझे मित्र आहेत. तुला काळजी करायचं काहीही कारण नाही. आणि हे बघ... प्रवचनाची वेळ होत आली आहे. बाहेरच्या जमावाला अशोकाच्या झाडासमोरील मैदानावर एकत्र जमायला आणि शांतपणाने बसायला तू सांग. मठाच्या अधिकाऱ्यांना निरोप दे...सूर्यास्त होण्याच्या आत प्रार्थनेला प्रारंभ व्हायला हवा. जा... वेळ थोडा आहे. लोक बसेपर्यंत मी तिकडे येतो. जा...

**आकाश :** आदेश आहे ?

**शिवानंद :** होय, आदेश आहे.

**आकाश :** प्रणाम.

( जातो. शिवानंद एका आसनावर बसतो. तो बसताच तिथे मानकरी त्याच्या तीन बाजूला पटकन् जाऊन उभे राहतात. )

**शिवानंद :** ( स्मित ) हा व्यूह कशासाठी ?

**१ मानकरी :** क्षमा करा आचार्य. महाराजांचा निरोप खाजगी आहे. फक्त आपल्यासाठी. इतर कोणी आत येतात की काय हे आम्हाला पाहता येईल.

**शिवानंद :** ठीक आहे. सांगा राजाचा निरोप ..

**२ मानकरी :** मठाला असलेला वनवासींचा वेढा आज सूर्यास्त होण्याच्या आत उठला पाहिजे.

**शिवानंद :** नाही उठणार.

**३ मानकरी :** उद्या सूर्योदयाच्या आत, आपल्या सर्व संन्याशांसह तुम्ही राज्याची सीमा ओलांडून बाहेर जायला पाहिजे

**शिवानंद :** नाही जाणार.

**१ मानकरी :** राज्यातील कोणत्याही गावाला, वस्तीला, तुम्ही वा तुमच्या संन्याशांनी भेट देता कामा नये, किंवा त्यांच्याशी बोलता कामा नये.

**शिवानंद :** तेही होणार नाही... पुढे ?

**२ मानकरी :** आचार्य, राजाला शरण या...

**शिवानंद :** नाही येणार... ठीक आपली भेट संपली... माझी प्रार्थनेची वेळ झाली.

( आसनावरून उठत असताच तिघेजण तीन बाजूंनी त्याच्यावर तुटून पडतात. खाली पाडून तलवारीचे घाव घालतात आणि तलवारी म्यानबंद करून एका

पाठोपाठ एक, बाहेर जातात. रक्तबंबाळ झालेला शिवानंद धडपडत कसाबसा
मूर्तीजवळ जातो आणि चौथऱ्यावर हात टेकून म्हणतो–)

**शिवानंद** : हेच मोल तुला हवं होतं ! हे तर सर्वांत सोपं... सुखाचं... आता मी तुझाच...

कायमचा... सर्वस्वी तुझाच...

तमसो मा ज्योतिर्गमय...

मृत्योर्मा अमृतं गमय...

( कोसळून पडतो.... मरतो. आकाश आत येतो. ते दृश्य पाहून क्षणभर स्तंभित होतो आणि नंतर किंकाळी फोडतो...)

**आकाश** : खून ! माझ्या स्वामीचा खून !

( जवळच एक दोर घंटेचा टांगलेला असतो. तो दोराकडे धावतो आणि पिसाटपणाने दोर ओढायला लागतो. बाहेर अनेक घंटा वाजायला लागतात. घंटांचा नादकल्लोळ होत असतानाही आकाश दोर ओढतच राहतो.... हे सर्व चालू असतानाच...

अंधार

**शिवानंद :** या आकाशसंबंधी म्हणता ? तो माझ्यापेक्षा वेगळा नाही.

**३ मानकरी :** पण महाराजांची आज्ञा आम्हांला ओलांडता येत नाही. जे सांगायचं आहे ते फक्त आपल्यालाच

**शिवानंद :** ठीक आहे. आकाश, तू बाहेर जा.

**आकाश :** ( मान हलवीत ) नाही.

**शिवानंद :** आकाश, ( खांद्यावर हात ठेवून) जा बेटा. हे माझ्या मित्राचे दूत आहेत, माझे मित्र आहेत. तुला काळजी करायचं काहीही कारण नाही. आणि हे बघ... प्रवचनाची वेळ होत आली आहे. बाहेरच्या जमावाला अशोकाच्या झाडासमोरील मैदानावर एकत्र जमायला आणि शांतपणाने बसायला तू सांग. मठाच्या अधिकाऱ्यांना निरोप दे...सूर्यास्त होण्याच्या आत प्रार्थनेला प्रारंभ व्हायला हवा. जा... वेळ थोडा आहे. लोक बसेपर्यंत मी तिकडे येतो. जा...

**आकाश :** आदेश आहे ?

**शिवानंद :** होय, आदेश आहे.

**आकाश :** प्रणाम.

( जातो. शिवानंद एका आसनावर बसतो. तो बसताच तिथे मानकरी त्याच्या तीन बाजूला पटकन् जाऊन उभे राहतात. )

**शिवानंद :** ( स्मित ) हा व्यूह कशासाठी ?

**१ मानकरी :** क्षमा करा आचार्य. महाराजांचा निरोप खाजगी आहे. फक्त आपल्यासाठी. इतर कोणी आत येतात की काय हे आम्हाला पाहता येईल.

**शिवानंद :** ठीक आहे. सांगा राजाचा निरोप ..

**२ मानकरी :** मठाला असलेला वनवासींचा वेढा आज सूर्यास्त होण्याच्या आत उठला पाहिजे.

**शिवानंद :** नाही उठणार.

**३ मानकरी :** उद्या सूर्योदयाच्या आत, आपल्या सर्व संन्याशांसह तुम्ही राज्याची सीमा ओलांडून बाहेर जायला पाहिजे.

**शिवानंद :** नाही जाणार.

**१ मानकरी :** राज्यातील कोणत्याही गावाला, वस्तीला, तुम्ही वा तुमच्या संन्याशांनी भेट देता कामा नये, किंवा त्यांच्याशी बोलता कामा नये.

**शिवानंद :** तेही होणार नाही... पुढे ?

**२ मानकरी :** आचार्य, राजाला शरण या...

**शिवानंद :** नाही येणार... ठीक आपली भेट संपली... माझी प्रार्थनेची वेळ झाली.

( आसनावरून उठत असताच तिघेजण तीन बाजूंनी त्याच्यावर तुटून पडतात. खाली पाडून तलवारीचे घाव घालतात आणि तलवारी म्यानबंद करून एका

पाठोपाठ एक, बाहेर जातात. रक्तबंबाळ झालेला शिवानंद धडपडत सरपटत मूर्तीजवळ जातो आणि चौथऱ्यावर हात टेकून म्हणतो–)

**शिवानंद :** हेच मोल तुला हवं होतं ? हे तर सर्वांत सोपं... सुखाचं... आता मी तुझाच...

कायमचा... सर्वस्वी तुझाच...

तमसो मा ज्योतिर्गमय...

मृत्योर्मा अमृतं गमय...

( कोसळून पडतो.... मरतो. आकाश आत येतो. ते दृश्य पाहून क्षणभर स्तंभित होतो आणि नंतर किंकाळी फोडतो...)

**आकाश :** खून ! माझ्या स्वामीचा खून !

( जवळच एक दोर घंटेचा टांगलेला असतो. तो दोराकडे धावतो आणि पिसाटपणाने दोर ओढायला लागतो. बाहेर अनेक घंटा वाजायला लागतात. घंटांचा नादकल्लोळ होत असतानाही आकाश दोर ओढतच राहतो.... हे सर्व चालू असतानाच...

अंधार

# अंक तिसरा

## प्रवेश सहावा

घंटानाद अधिक तीव्र होत असतानाच...
राजवाड्याचा सौध...
वेळ रात्रीची.
पलीकडे दिसणाऱ्या नगराचे भाग पेटलेले, त्यांच्या ज्वाला आणि प्रकाश दूरवर दिसतात.
अंधुक प्रकाशात राजा सौधाच्या कठड्याशी उभा...
समोरचा अग्निप्रलय पाहात.
खालून आरडाओरड... घोषणा... एक जखमी सैनिक (मानकरी) धावत, धडपडत येतो...

**मानकरी :** महाराज! आपण ताबडतोब राजवाडा सोडून जा! क्षणाचाही विलंब करू नका... मी जखमी आहे... जास्त मी बोलू शकत नाही... शहर भस्मसात करून जंगली लोक राजवाड्यात घुसले आहेत... आपले काही इमानदार सैनिक लढताहेत... पण बाकी सर्व... पळून गेले... महाराणीही काही स्वारांसह मंत्र्यासह सौगंधाकडे निघून गेल्या! .. महाराज माझी प्रार्थना आहे... दक्षिणदाराशी आपले पंचवीस तीस स्वार तुम्हाला घेण्यासाठी थांबले आहेत... आपण ताबडतोब जा... जंगली लोकांचे नायक तुमचा शोध घेत राजवाड्यात... (जवळपास आवाज) महाराज! ते आले! आपण... मी प्रतिकार करतो... पण .. निघून जा... कुठेही जा... (आत धावतो)

**राजा :** मृत्यूनं चहूकडून वेढा घातला आहे. मला संरक्षण आहे फक्त माझ्या सिंहासनाचं...

(आठदहा जंगली नायक रक्ताने माखलेले, हातात कुऱ्हाडी, कोयते... आघाडीला आकाश...असे सौधावर येतात....)

**सर्व ओरडतात :** हा इथे आहे! धरा... मारा त्याला...

(राजा पळतो... त्याच्या मागोमाग भिल्ल नायक ओरडत धावतात.)

# अंक तिसरा

## प्रवेश सातवा

राजसभा.
मध्यभागी सिंहासन.
सर्वत्र दिवे पेटलेले.
आवाज पूर्ववत.
राजा धावत येतो आणि सिंहासनावर बसतो.
नायक येतात आणि कुऱ्हाडी परजीत धावतात... थबकतात.
सिंहासनाच्या समोर.

**राजा :** खबरदार कोणी पुढे सरकाल तर ! मी या राज्याचा राजा, या राज्याच्या सनातन सिंहासनावर बसलेला तुमचा अधिपती, तुम्हाला आज्ञा देतो आहे... मागे व्हा आणि या महालाच्या मागे चालते व्हा...

( नायक मागे सरकतात )

**एकजण :** आमच्या शिवानंदाचा तुम्ही खून केला आहे. त्याचा जाब विचारायला आम्ही आलो आहोत.

**राजा :** मी शिवानंदाचा खून केला नाही, आणि मी राजा आहे. मला कोणीही जाब विचारू शकत नाही...

**आकाश** : ( गर्दीतून एकदम कुऱ्हाड परजत पुढे येतो. ) मी विचारू शकतो...

**राजा :** ( भयभीत ) तू– तू– तो मुका जंगली...

**आकाश :** मी आता मुका राहिलो नाही. आणि भाषेतला सर्वांत शक्तिशाली शब्द माझ्या सगळ्या अंगात संचार करतो आहे... प्रायश्चित्त !....

( पुढे सरकतो... लोकही त्याच्या मागोमाग पुढे होतात )

**राजा :** ( किंचाळत ) मागे व्हा ! मी परमेश्वराचा पृथ्वीवरील प्रतिनिधी आहे... मला माराल तर...

**आकाश :** ज्याला आम्ही परमेश्वर मानलं त्याचाच तू खून केला आहेस ! या खुनाला क्षमा नाही...

**राजा :** ( उठून सिंहासनाच्या मागे जातो )
मी–मी– शिवाचा खून केला नाही– तो माझा मित्र होता...खबरदार...शिवा !

( तेवढ्यात जवळ पोचलेला आकाश त्याच्या अंगावर पहिला घाव घालतो... राजा " शिवा, माझा शिवा " असे किंचाळत खाली कोसळतो. सर्वजण त्याच्या अंगावर, ( पाठमोरे, ओणवे ) कुऱ्हाडीचे कोयत्यांचे घाव घालतात. पहिला घाव पडत असताना "राजन् राजन्" असे शब्द वातावरणात उठतात आणि कल्लोळतात. )

**पडदा**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २१६७४ नों. दि. १५.१०.८६
वि. नाटक

# महंत